# अध्याय २७ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः।।

प्रियव्रत राजावंशांत । भगवंत अवतार घेत ॥
ऋषभयोगी कृपावंत । प्रजेस पाळी समत्वें ॥१॥

त्यांचें शंभर पुत्रांत । नव योगेश्वर विख्यात ॥
सर्वत्र संचार करीत । वासुदेवांश लोकहिता ॥२॥

योगेश नवनारायण । कवि हरि चमस करभाजन ॥
अंतरिक्ष प्रबुद्ध पिप्पलायन । द्रुमिल आविर्होत्र हे ॥३॥

वसुदेवास द्वारकेंत । नारदमुनी प्रेमें सांगत ॥
परम धर्म भागवत । सर्वां नमस्कार असो ॥४॥

जनक निमि यज्ञसत्रांत । नवयोगेश्वर अकस्मात ॥
प्रेमें प्रकटले त्यांचें होत । आदरातिथ्य उत्तम ॥५॥

सुर सिद्ध साध्य गंधर्व । यक्ष किन्नर नागमानव ॥
मुनिचारणादिक सर्व । लोकीं संचार त्यांचा असे ॥६॥

त्यांसी नसे विषयासक्ति । म्हणून खुंटेना त्यांची गति ॥
जीवन्मुक्त-गमनशक्ति । लोकोद्धार करीतसे ॥७॥

निमिविदेह करी विनंति । भगवंतपदीं आसक्ति ॥
आत्यंतिक कल्याणप्राप्ति । कशी साधेल सांगणे ॥८॥

भूपतीचा प्रश्न अैकून । महंत संतोष पावून ॥
ऋत्विज राजा सभाजन । यांचें अभिनंदन करिती ॥९॥

कथिती कविनारायण । मुक्तीचें सुलभ साधन ॥
भागवत धर्म महान । श्रीभगवंत सांगती जो ॥१०॥

भक्तिमार्ग सोपा उपाय । नसे मार्ग-भ्रष्टता भय ॥
नारायण अज अव्यय । अखंड त्याचें प्रेममनीं ॥११॥

कायावाचा इंद्रियें मन । बुद्धिपूर्वक आत्मवर्तन ॥
किंवा प्रारब्धानुसार घडून । आणि स्वाभाविक सर्व कर्म ॥१२॥



नारायणा अर्पण करितां । सकळ गळतसे अहंता ॥
आपोआप ये विरक्तता । परम भागवत हा असे ॥१३॥

भक्तिरसांत डुंबे भक्त । हांसे रडे गात नाचत ॥
ओरडूनही ओसंडत । आत्मरस जगतीं दिसे ॥१४॥

सर्वत्र त्याला दिसे ईश्वर । सर्वां करी तो नमस्कार ॥
ईश्वरमय त्याचें शरीर । साक्षात्कारी सदावृत्ती ॥१५॥

गुरुदेवतात्मा एकभक्ति । भागवता अखंड शांति ॥
त्यांच्या संनिध वसे मुक्ति । साकार मूर्ति ब्रह्माची ॥१६॥

राजा वंदून विचारीत । कसा जाणावा भागवत ॥
ऐकून प्रेमें उत्तर देत । हरिनारायण आनंदें ॥१७॥

सर्व प्राणिमात्र आपणांत । आणि आपण सर्वभूतांत ॥
तोच उत्तम भागवत । ज्ञानी भक्त त्या म्हणती ॥१८॥

सर्व विश्व ईश्वरी माया । हर्ष विषाद टाकी काया ॥
हरिस्मरणें आत्मठाया । वळे मन दुःख कैचें ॥१९॥

निर्भयस्थान वासुदेव । मनीं असतां कर्म-उद्भवा ॥
होत नसे मग मानव । देहासक्त कसा होई ॥२०॥

भेदबुद्धि मावळून । सर्वांशीं समत्वें वर्तन ॥
अैश्वर्य भोगी उदासीन । हरिस्मरण सर्वकाळ ॥२१॥

मनस्तापाचें निरसन । होऊन पापें जाती जळून ॥
हृदयीं स्थिर रमारमण । किती किती सांगू तुला ॥२२॥

हें अैकून राजा पुसत । संसारीतापीं असतों तप्त ॥
मोठेमोठे होती मोहित । विष्णुमाया स्वरूप सांगा ॥२३॥

त्रिविध तापें न तापे मन । असें हरिकथा-संकीर्तन ॥
भाषणामृत करावें पान । पुन्हां पुन्हां वाटे मनीं ॥२४॥

मग अंतरिक्ष नारायण । भूपा करिती निरूपण ॥
मूळपुरुष आदिकारण । पांच-भौतिक विश्व रची ॥२५॥



मन इंद्रियरूपें त्यांत । शिरून उपभोग घेत ॥
सदा आसक्त होई त्यांत । पिंडब्रह्मांड समान ॥२६॥

ज्या क्रमानें सृष्टि घडत । त्याच्या उलट प्रलय होत ॥
कारण कार्य सदा चालत । ही हरीची माया असे ॥२७॥

त्यांत जीव गुरफटून । धरी देहाचा अभिमान ॥
आत्मरूपाचें विस्मरण । त्यामुळें जीव सुखी दुःखी ॥२८॥

मग राजा पुन्हां विचारी । दुस्तर माया परमेश्वरी ॥
कशी तरावी या संसारीं । कृपा करून मार्ग सांगा ॥२९॥

प्रबुद्ध नारायण सांगती । दुःखनाश व सौख्यप्राप्ती ॥
होण्या संसारांत झटती । सहज वृत्ति ही असे ॥३०॥

गृह दारा सुत संपत्ति । हीं कोणा शाश्वत नसती ॥
त्यांपासून सुखाची प्राप्ती । पुण्यें कांहीं काळ मिळे ॥३१॥

पुण्यपापाचा असे मेळ । तशीच सुखदुःखाची माळ ॥
स्वर्गांतही मनाचे मळ । स्पर्धा मत्सर भीती असती ॥३२॥

व्हावया परम कल्याण । सद्गुरूसी जावें शरण ॥
साक्षात्कारी वेदांतनिपुण । शांतिनिधान जो असे ॥३३॥

आपला आत्मा इष्टदैवत । असा मानावा गुरु सतत ॥
गुरुमुखानें भागवत । धर्म श्रवण करावे ॥३४॥

भक्तिपूर्वक तशी सेवा । करून माधवा तोषवावा ॥
विषयवैराग्य संत विसावा । अनाथीं दया धरावी ॥३५॥

अंतर्बाह्य देहशुद्धता । मिळतें त्यांत संतुष्टता ॥
अनासक्ति सहनशीलता । श्रद्धा भागवत शास्त्रांत ॥३६॥

तप अहिंसा अध्ययन । शरीरमनाचें नियमन ॥
सर्वत्र ईश्वर अधिष्ठान । सरळ वर्तन वाद नको ॥३७॥

समानाशीं स्नेह असावा । श्रेष्ठांकडे आदर हवा ॥
हरिमहिमा ऐकत जावा । करावें कर्म हरीसाठीं ॥३८॥

तें त्याला करावें अर्पण । गुरुआज्ञा मानून प्रमाण ॥
तसें सर्वच समर्पण । परमेश्वरास करावें ॥३९॥

स्थिर चर साधु मानवीं । सेवावृत्ति आचरावी ॥
कृष्णभक्तमैत्री करावी । परस्पर संतोष निर्मावा ॥४०॥

हरिभक्ति उत्पन्न होत । हरिवृत्ति अंगीं चढत ॥
हरिमाया भक्त तरत । नारायणप्राप्ति घडे ॥४१॥

राजा नम्रतेनें पुसत । नारायणा ब्रह्म म्हणत ॥
त्याचें स्वरूप सांगून शांत । चित्त माझें करा म्हणे ॥४२॥

मग सांगती पिप्पलायन । सदा चाले देहजीवन ॥
त्याला सत्ता तशी देऊन । नारायण बघीतसे ॥४३॥

उत्पत्ति पोषण संहार करी । तशी सत्ता परमेश्वरी ॥
इंद्रियें मग अहंकारीं । निद्रेमध्यें लीन होती ॥४४॥

त्रिगुण कार्यें नित्य चालती । अज अमर आत्मज्योती ॥
निद्रेमधून ये जागृती । तेव्हां साक्षी आत्मा पटे ॥४५॥

वासनारहित निरंतर । मनबुद्धि चित्त अहंकार ॥
अनासक्ति वैराग्य प्रखर । नारायणीं दृढभाव ॥४६॥

आत्म्या नाहीं जन्ममरण । ज्ञानी सदा सर्वकारण ॥
कूटस्थ आत्मा नारायण । निर्मळ चित्तीं प्रकटतो ॥४७॥

नृप विचारी हें अैकून । नैष्कर्म्य सिद्धीचें साधन ॥
सांगा आपण सिद्ध महान । नम्र आहें तव पायीं ॥४८॥

आविर्होत्र उत्तर देत । करावें कर्म वेदविहित ॥
हरिचरणीं अर्पून प्राप्त । नैष्कर्म्यसिद्धि होतसे ॥४९॥

विषयासक्त ज्याचें मन । त्या फलश्रुति आवडून ॥
करितो वेदोक्त वर्तन । स्वर्गप्राप्ति घडतसे ॥५०॥

जो मनांत अनासक्त । त्याचा लिंगदेह नुरत ॥
निष्कामता करते मुक्त । ब्रह्ममय सदाच तो ॥५१॥



आपुले गुरुजी आचार्य । सांगती तसें करुन कार्य ॥
इष्टमूर्तीचें स्थान हृदय । हरि अर्चन भावें हवें ॥५२॥

अग्निसूर्य अतिथि तोय । यांत वसे अजित अद्वय ॥
त्या पूजून आपलें हृदय । करी हरिमय मुक्त तो ॥५३॥

राजा विचारी नमस्कारुन । भूत भविष्य वर्तमान ॥
हरि अवतार वर्तन । लीला मजला सांगाव्या ॥५४॥

दुर्मिळ नारायण सांगती । भगवंताचे अवतार होती ॥
त्यांची होऊं न शके गणती । सर्वच एक नारायण ॥५५॥

हरि आपण निर्माण करी । ही ब्रह्मांडरूपी नगरी ॥
त्यांत स्वत: प्रवेश करी । आदि देवांश नारायण ॥५६॥

कर्ता पालक संहारक । एकच ब्रह्मांडनायक ॥
नरनारायण नामक । विश्व कल्याणा तप करिती ॥५७॥

हंत संत सनकादिक । कपिलदत्त ऋषभ जनक ॥
हयग्रीव मधु अंतक । मत्स्य वराह श्रीहरी ॥५८॥

कूर्म मंदरधारक । वालखिल्य ऋषि तारक ॥
वृत्रांतक इंद्रपातक । विष्णु निवारी भक्त सखा ॥५९॥

नरसिंह साधुरक्षक । वामन बळीचा याचक ॥
परशुराम दर्पहारक । रावणहंता रामचंद्र ॥६०॥

जगद्गुरु कृष्णावतार । पांडुरंग बुद्धावतार ॥
दुष्टांचा करील संहार । कल्कि अवतार शेवटीं ॥६१॥

कांहीं नावें कथिलीं तुला । किती वर्णाव्या त्यांच्या लीला ॥
साधुजनांचा आश्रय भला । दुर्जनांतक परमेश्वर ॥६२॥

त्रिकालीं अेकच विश्वेश्वर । त्याला करावा नमस्कार ॥
परमात्मा जीवनाधार । त्याला नमून हित साधे ॥६३॥

मग राजा पुन्हां विचारी । हरिभक्ति नसे अंतरीं ॥
ज्यांची वासना सदा अपुरी । त्यांची गति कशी असे ॥६४॥



सांगती चमस नारायण । विराटपुरुष नारायण ॥
त्याचे अवयव चारवर्ण । सर्व अेकच परमात्मा ॥६५॥

विश्वरचना त्रिगुणात्मक । आत्मज्योति प्रकाशक ॥
नरयोनी सर्वांत निक । सर्वजनक परमेश्वर ॥६६॥

व्हावया मानवकल्याण । विष्णु करी धर्म निर्माण ॥
तसें करून आचरण । मानव मुक्त होतसें ॥६७॥

त्रिगुणात्मक नरवासना । वळवावयास आत्मस्थाना ॥
दिलें विधीस वेदज्ञाना । योगक्षेम चालवी तो ॥६८॥

जो आपणां करी निर्माण । त्याला जावें सदा शरण ॥
आत्मोद्धाराची जाणून खूण । वेदार्थ मनीं आणावा ॥६९॥

सकळ कर्म ब्रह्मार्पण । करून ब्रह्मपरायण ॥
त्याचें चुके जन्ममरण । ब्रह्म निर्वाण अखेर ॥७०॥

याकडे नाहीं ज्यांची मति । त्यांना चुकते आत्मज्योति ॥
अंधकारांत त्यांची गति । व्यर्थ बुडती अज्ञानी ॥७१॥

भगवंताकडे वळावें मन । असें असतें बुधवर्तन ॥
जन तारावे स्वयें तरून । प्रकाशमार्ग हा असे ॥७२॥

हें अैकून राजा पुसे । कोणत्या युगीं भजणें कसे ॥
कृपेनें सांगून उत्तमसें । समाधान माझें करावें ॥७३॥

मग करभाजन सांगती । कृतयुगांत पुण्यमति ॥
सर्वसमान शांतवृत्ती । निर्वैर मैत्री सत्त्वगुणी ॥७४॥

यजन तप शम दम । आणि गाती हरीचें नाम ॥
दंड कमंडलु मृगचर्म । हरि शुभ्र चतुर्भुज ॥ ७५॥

हंस सुपर्ण वैकुंठधर्म । योगेश्वर पुरुषोत्तम ॥
अमळ ईश्वर मनोरम । अव्यक्त परमात्मा श्रीहरी ॥७६॥

ब्रह्मचारी वेष धरी । वल्कलें परिधान करी ॥
रूद्राक्षमाला जटाधारी । यज्ञोपवीत झळकतसे ॥७७॥

त्रेतायुगांत रक्तवर्ण । चतुर्बाहु त्रिवेद प्राण ॥
यज्ञीय त्रिमेखला-धारण । सुवर्णी केस हरीचे ॥७८॥

आहुतिदान-पात्र हातीं । श्रीभगवंत यज्ञमूर्ती ॥
धार्मिक ब्रह्मवादी पूजिती । हरीची भक्ति यज्ञमय ॥७९॥

सुतपस प्रजापतिसुत । पृश्निगर्भ देव विख्यात ॥
सदा विजयी श्रीजयंत । महा पराक्रमी उरुक्रम ॥८०॥

विष्णु सर्वगामी यज्ञेश्वर । सर्व देवमय देवेश्वर ॥
वृषाकपि इष्ट देणार । क्लेश सर्व निवारी तो ॥८१॥

द्वापारांत भगवंत श्याम । चतुर्भुज पुरुषोत्तम ॥
शंखचक्र गदा पद्म । पीतांबर-धारी हरी ॥८२॥

श्रीवत्सादिक लक्षण । कौस्तुभ कंठांत धारण ॥
जिज्ञासु जन-आचरण । वेदतंत्र यजनानें ॥८३॥

श्रीवासुदेव संकर्षण । पद्युम्न अनिरूद्धा नमन ॥
ऋषिपुरुष नारायण । विश्वेश्वरास वंदिती ॥८४॥

सर्व भूतात्मा विश्वंभर । महात्मा जो जगदीश्वर ॥
त्याच्या भक्तीचे तंत्र प्रकार । भक्तलोक आचरिती ॥८५॥

कलियुगांत कृष्णवर्ण । पण तेजानें दैदीप्यमान ॥
सांगोपांग अस्त्रें घेऊन । पार्षदगण जवळी असे ॥८६॥

त्यांचेसह पूजा नमन । चाले सदा हरिकीर्तन ॥
भगवंत-नाम उच्चारून । भक्त रंगती कथेमाजी ॥८७॥

दास्य स्मरण पाद सेवन । सर्वस्व देवा समर्पण ॥
मित्रत्वानें सर्व सांगून । मन:पूर्वक आळविती ॥८८॥

भक्तांची भगवंत प्रार्थना । श्रीभगवंता दयाघना ॥
तूंच आधार संसारीजना । तव चरणां नमन असो ॥८९॥

अनुरूप यज्ञ करून । भगवंता भावें स्मरून ॥
भक्तकार्य पूर्ण होऊन । वेद वचनें सिद्धि मिळे ॥९०॥



भगवंत भक्ताभिमानी । कलींत अवतरे मोक्षदानी ॥
ठायीं ठायीं भगवच्चरणीं । भजून भक्त भवपार ॥९१॥

भक्तगणांचे हरून क्लेश । भक्तां तारी श्रीपरमेश ॥
हें ऐकून नृप मिथिलेश । योगेश्वरांस पूजीतसे ॥९२॥

उपाध्यायही संतोषून । भक्तिमार्गे श्रीभगवान ॥
उद्धार करी हें ऐकून । चित्तीं पूर्ण सुखावती ॥९३॥

योगी देती आशीर्वचन । अदृश्य होऊन केलें गमन ॥
ऐकून नारद वचन । वसुदेवही सुखावले ॥९४॥

भगवंता पुरुषोत्तमा । तव नामाचा थोर महिमा ॥
दीन दयाळा तुला उपमा । तुझीच योग्य सदा असे ॥९५॥

सर्वभावें तुला नमन । तूं झालासी नवनारायण ॥
जगदोद्धारा तुला नमन । कृपाकटाक्षें सांभाळीं ॥९६॥

आपुलें मिळे आशीर्वचन । हेंच सौभाग्य लक्षण ॥
नरनारी भाव धरून । तुझ्या कृपेनें तरताती ॥९७॥

भक्तकार्य-कल्पद्रुम । श्रीपुराण पुरुषोत्तम ॥
सर्वाधार भक्तकाम । तुला नमन प्रेमभरें ॥९८॥

श्रीरामा करुणा करा । श्रीकृष्णदेवा दयाधरा ॥
दयासागरा कृपाकरा । विठ्ठला हरी पाव गा ॥९९॥

दत्ता तवगुण चरित्र । देई सौख्य इहपरत्र ॥
सत्ताविसावा अध्याय पवित्र । श्रीदत्तहातीं भक्तसुखा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणामस्तु



# अध्याय २८ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

इच्छून सर्व जनकल्याण । मेरू-पर्वतीं तप करून ॥
सदा राहती नवनारायण । त्यांना नमस्कार असो ॥१॥

यदुराजा श्रीदत्तभक्त । त्याचे वंशीं श्रीभगवंत ॥
कृष्णरूपें अवतरत । सर्वभूत हितासाठीं ॥२॥

व्यासमहर्षि सर्वज्ञानी । लिहून ठेविती पुराणीं ॥
श्रीकृष्णसाधु-संरक्षणीं । दक्ष नित्य जगद्गुरु ॥३॥

श्रीदत्त व्यास यदु कृष्ण । यांसी असो भावें नमन ॥
नवनारायण चिंतन । द्वारकेंत कृष्ण करिती ॥४॥

ते प्रकटतां कृष्ण सांगती । कलियुगांत पाप अती ॥
नानाविद्या उपलब्ध होती । लोकनाश अमानुष ॥५॥

व्हावें सर्व जनकल्याण । असें पाहिजे आचरण ॥
म्हणून केलें तव स्मरण । लोकहित साधावया ॥६॥

आपण वैराग्यसंपन्न । येथें यावें अवतरून ॥
दुष्ट कृतींचें निरसन । करून धर्म चालवावा ॥७॥

श्रीकृष्ण नवनारायण । त्यांना भिन्न म्हणेल कोण ॥
त्यांच्या चरणीं लोटांगण । घालितां क्षेम इहपर ॥८॥

आध्यात्मिक आधिदैविक । आधिभौतिक अलौकिक ॥
ज्ञानसंपन्न परंतु लोक । स्वार्थी बहुत होतील ॥९॥

त्यांना हवा सर्वदा धाक । नियतीचा धर्म असे एक ॥
विजयाचा मार्ग विवेक । विधायक तत्त्व सत्य ॥१०॥

त्रिविध तापनिरसन । होऊन व्हावे सुखीजन ॥
देवता येती अवतरून । नवनारायणांसह ॥११॥

यापरी योजना करून । श्रीकृष्ण अवतार पूर्ण ॥
नवनारायण अवतरून । नाथपंथ प्रकाशविला ॥१२॥

श्रीदत्तशिष्य नवनाथ । मत्स्येंद्र गोरक्ष गहिनीनाथ ॥
जालिंदर कानिफ नागनाथ । रेवण भर्तरी चर्पटी ॥१३॥

योग-तंत्रमंत्र साधून । भक्तिमार्गा जन लावून ॥
संतसज्जना सुखवून । गुप्त प्रकट नाथ वसती ॥१४॥

उत्थान पावतां इंद्रिय । उपरीचर वसुवीर्य ॥
गगनांतून गळून जाय । यमुनाजळांत अंश पडे ॥१५॥

तें एक मच्छी गिळित । कविनारायण तयांत ॥
शिरून अवतार घेत । शिवपार्वती बोध अैक ॥१६॥

गर्भ पावे नरशरीर । मच्छी बालक तीरावर ॥
पाहातां संतोष धीवर । घरीं नेऊन पाळी तया ॥१७॥

तेजस्वी बालक पाहून । सर्वांचें प्रसन्न वदन ॥
केलें लालनपालन । वर्षे पांच जाहलीं ॥१८॥

मच्छी मारण्या कोळी जात । बाळा अेके दिवशीं नेत ॥
तीरावर त्या बसवीत । आपण जळीं मत्स्य मारी ॥१९॥

मासे मारून कांठावर । ठेवून पाण्यांत धीवर ॥
पुन्हां मारी मत्स्य तोंवर । बाळ टाकी जळीं मासे ॥२०॥

बाळकृत्य पाही धीवर । आणि कोपून म्हणे सत्वर ॥
आमुचा आहार माशावर । कसें पोट भरे बाळा ॥२१॥

पुन्हां मारी कोळी मासे । बाळाचे मनांत उत्तमसें ॥
माशांचें प्रेम वसतसे । परत ढकली मत्स्य जळीं ॥२२॥

कोळी फारच रागावला । बाळास टाकून बोलला ॥
जासी भिक्षा मागावयाला । अशा गुणें तूं बाळका ॥२३॥

बाळा उपजे मनीं ज्ञान । म्हणे पवित्र असे भिक्षान्न ॥
धीवर-डोळा चुकवून । बाळ निघून गेलासे ॥२४॥

बद्रिकाश्रमीं तो पोंचला । तीव्र तप करूं लागला ॥
द्वादश वर्षे काळ झाला । अस्थिपंजर उरलासे ॥२५॥



एकदां शिवदत्तात्रेय । यांचें तेथून गमन होय ॥
बालकावर दृष्टि जाय । भाग्यक्षण पातलासे ॥२६॥

बालकास दत्त पुसती । काय कामना असे चित्तीं ॥
बाळनमी शिवदत्तांप्रती । आणि म्हणे नाम सांगा ॥२७॥

सांगती स्वनाम श्रीदत्त । मच्छीपुत्रा इच्छा पुसत ॥
देहक्षीण म्हणून येत । ग्लानि अपार बालका ॥२८॥

सगद्गद जोडी हस्त । आनंदानें क्षीण स्वरांत ॥
देव भेटावा हीच आर्त । म्हणे पूर्ण तवकृपें ॥२९॥

शिवाज्ञें सद्गुरु दत्तात्रेय । आत्मज्ञानबोधी सदय ॥
शरीरकांति ब्रह्ममय । मत्स्येंद्र शिष्य दत्ताचा ॥३०॥

नाथपंथाची दीक्षा दिली । कान फाटुनी शिंगी शैली ॥
लोकहितासी मंत्रावळी । मच्छिंद्रनाथा लाभतसे ॥३१॥

मंत्रदेवतांचें दर्शन । मिळून लाभे आशीर्वचन ॥
शिवदत्त जाती निघून । नाथ चालले तीर्थाटना ॥३२॥

नानातीर्थायात्रा करिती । सप्तश्रृंगीस भगवती ॥
तेथें येऊन तिला स्तविती । अनुष्ठान केलें सप्तदिन ॥३३॥

अंबा जाहली सुप्रसन्न । नाथ प्रार्थिती तिला नमून ॥
मम कवित्वा आशीर्वचन । कसें मिळेल सांगावें ॥३४॥

देवी म्हणे मग नाथास । चल मार्तंडपर्वतास ॥
नागाश्वत्थ महावृक्षास । हवनें पाहातां येतसे ॥३५॥

तसें करून नाथा दिसत । बहु दैवतें तेजवंत ॥
बावन्नबीरही बळवंत । नागाश्वत्थीं विराजती ॥३६॥

अंबा म्हणे दक्षिणेकडे । नदी अंजनपर्वताकडे ॥
कालीदेवीस नमून पुढें । शतकुंडें दिसतील ॥३७॥

पूजा करून भावें विमल । प्रत्येकीं टाकावा शुक्लवेल ॥
माघारा वळून ज्यांत वेल । सजीव त्यांत स्नान करीं ॥३८॥



आणि जलप्राशन करावें । मग मूर्च्छा येई स्वभावें ॥
तेव्हां आदित्यांस जपावें । सूर्यदर्शन देईल ॥३९॥

उदक आणून कुपीतून । बारा आदित्यमंत्र जपून ॥
नागाश्वत्था घालणें स्नान । मग दैवतें वर देती ॥४०॥

अेका खेपेस न देती वर । पण सहामास असें कर ॥
एक अेक दैवत वर । देईल प्रत्येक खेपेसी ॥४१॥

अंबादेवी असे सांगून । सप्तश्रृंगीस गेली निघून ॥
मत्स्येंद्र करी मागाहून । देवी निवेदी त्यापरी ॥४२॥

दैवतांचें आशीर्वचन । शाबरी कवित्वा मिळवून ॥
जनपीडेचें निरसन । नाथ करिती आनंदें ॥४३॥

पुन्हां तीर्थाटन करिती । विविध लोकां अभय देती ॥
चंद्रागिरि ग्रामा जाती । भिक्षा मागती विप्रगेहीं ॥४४॥

ब्राह्मणदंपत्य आनंदलें । आदरातिथ्य उत्तम केलें ॥
मत्स्येंद्रनाथ संतोषले । विचारिती त्यां काय हवें ॥४५॥

विप्रकांता सरस्वती । पुत्राकरितां कष्ट चित्तीं ॥
पतिपत्नी धार्मिक असती । ठरविती पुत्र मागावा ॥४६॥

सांगती नाथांस नमून । पुत्रइच्छा करावी पूर्ण ॥
नाथचित्त गेलें द्रवून । देती प्रसाद विभूति ॥४७॥

विप्रकांतेस सांगती । शयनकाळीं खावीं रात्रीं ॥
होईल उत्तम पुत्रप्राप्ती । येईन द्वादशवर्षांनीं ॥४८॥

तेव्हां पुत्रा उपदेशीन । आणि गेले नाथ निघून ॥
दिव्य पुत्र होणार म्हणून । सरस्वती आनंदली ॥४९॥

शेजारी बायांस सांगत । त्या तिला उलट वदत ॥
वशीकरण केलें म्हणत । भुलशील गे जोग्यास त्या ॥५०॥

सरस्वती मनीं शंकली । विभूति गोवरीं टाकिली ॥
होणार तशी बुद्धि झाली । दैवीं पुत्र नसे तिच्या ॥५१॥

गोवरीं बाळ वाढतसे । हरिनारायण तो असे ॥
गोरक्षनाथ उत्तमसे । मत्स्येंद्रशिष्य प्रसिद्ध ॥५२॥

आदित्यतेजाचा प्रसाद । विभूति दिव्यमंत्र सिद्ध ॥
देऊन मत्स्येंद्र समोद । जगन्नाथ क्षेत्रा पातलें ॥५३॥

भगवंता नमस्कारून । पुढें चाले तीर्थाटन ॥
रामेश्वरक्षेत्रीं स्नान । करितां कपीस पाहिलें ॥५४॥

सानरूप वृद्ध वानर । कोरीतसे गुहा सत्वर ॥
पावसानें भिजें शरीर । म्हणून घर करीतसे ॥५५॥

तें देखोनी मच्छिंद्र बोले । काय मर्कटा आरंभिलें ॥
पूर्वीं घर कां न बांधिलें । महामूर्ख दिसतोसी ॥५६॥

वानर म्हणे अरे तूं कोण । बोलतोस अुर्मट वचन ॥
नाथ सांगती नामाभिधान । गुरूंनीं नाथ ठेविलें ॥५७॥

नाथ म्हणतां रागावून । मारुति सांगे दे टाकून ॥
नाहीं तरी बळ दावून । नाथनाम सार्थ कर ॥५८॥

मग दोघांचें युद्ध झालें । वानरें पर्वत फेंकिले ॥
नाथें गुरुस्मरण केलें । पर्वत अडवी मंत्रानें ॥५९॥

पर्वत फेकितां हनुमंत । तेथेंच झाला निचेष्टित ॥
वायु कळवळून धांवत । सांगे पुत्रा हनुमंता ॥६०॥

हा नाथ श्रीदत्तभक्त । त्याचें सामर्थ्य असे अमित ॥
नाथा सांगे वायुदैवत । सावध करीं हनुमंता ॥६१॥

श्रीरामभक्त हनुमान । मारुति सावध होऊन ॥
नाथा पित्यासह भेटून । सांगे शक्ति पाहिली ॥६२॥

पूर्वीं मार्तंडपर्वतावर । तुजला दिला आहे वर ॥
मत्स्येंद्रनाथें नमस्कार । करून दोघां प्रार्थिलें ॥६३॥

जेव्हां करीन आपुलें स्मरण । तेव्हां करावें कार्य येऊन ॥
वायुमारुति संतोषून । नाथा आशीर्वाद देती ॥६४॥



नाथ मारुतिहनुमंत । एकमेकां प्रेमें भेटत ॥
निरोप घेऊन नाथ निघत । लोकहितार्थ तीर्थाटना ॥६५॥

बलुचिस्थानांत पोंचले । हिंगलजा मंदिरीं गेले ॥
देवीद्वारीं भैरव दिसले । नाथा पुसती काय काम ॥६६॥

नाथ म्हणती देवालयांत । देवीदर्शनासाठीं जात ॥
भैरव सांगती पुण्यवंत । मानवा आंत सोडितों ॥६७॥

पातक्यास शिक्षा करून । आम्ही लावितों परतवून ॥
तरी पुण्यपाप सांगून । आपण जावें दर्शना ॥६८॥

पुण्यपाप यांची गणती । जाणत नाहीं नाथचित्तीं ॥
ऐकतां भैरव ओळखती । पण ते घेती परीक्षा ॥६९॥

नाथा भैरव आज्ञापिती । सरळ बोलावें म्हणती ॥
नातरी शिक्षा तुजप्रती । करूं निश्चित समजावें ॥७०॥

हें ऐकून भैरवभाषण । नाथ करिती गुरुस्मरण ॥
भैरवांना सांगती रण । केल्याशिवाय राहूं नका ॥७१॥

नाथांचें अैकून आव्हान । प्रचंड आयुधें सरसावून ॥
गेले एकदम धांवून । आठही भैरवनाथावर ॥७२॥

नाथ करिती दत्तस्मरण । भस्म लाविती मंत्रवून ॥
भैरवांचा व्यर्थ प्रयत्न । मग ते नागास्त्र सोडिती ॥७३॥

गरुडास्त्र नाथ सोडीत । त्यामुळें नागास्त्र झालें शांत ॥
भैरव वातास्त्र सोडीत । नाथ फेंकिती पर्वतास्त्र ॥७४॥

भैरव सोडिती काळास्त्र । नाथ जपती संजीवनास्त्र ॥
अेकमेकांवर मंत्रास्त्र । परम क्रोधें फेंकिती ते ॥७५॥

मग नाथें वाताकर्षण । जपून कवळिले भैरवप्राण ॥
भैरव भूमीवर पडून । नाथ विजयी जाहले ॥७६॥

बाहेर चाले युद्ध सबळ । तें वृत्त आणण्या सकळ ॥
आंतून देवीदासीमेळ । पाठवी शंखिणी डंखिणी ॥७७॥



पाहून भैरव गतप्राण । त्यांना आला क्रोध दारुण ॥
नाथाशीं करावया रण । चंडामुंडादि सर्व येती ॥७८॥

त्यांवर नाथांनीं कामास्त्र । सोडून केलें त्यांना विवस्त्र ॥
पुन्हां सोडून पुरुषास्त्र । कामास्त्र मागें घेतलें ॥७९॥

शुद्धीवर सर्व येऊन । आंत पळाल्या त्या लाजून ॥
देवीस सांगती वर्तमान । गति बरवी दिसेना ॥८०॥

अेक जोगडा येथें आला । देवी ज्ञानें ओळखी त्याला ॥
म्हणे कविनारायण भला । वस्त्रें पुरवी दासींना ॥८१॥

स्वत: मग बाहेर आली । नाथा प्रेमें पोटीं कवळी ॥
अंकीं घेऊन नाथा बसली । म्हणे बळिया थोर तूं ॥८२॥

भैरवा आण शुद्धीवर । नाथ करिती तसें सत्वर ॥
सर्वां संतोष सुंदर । आनंदपूर वर्धतसे ॥८३॥

प्रेमें नाथा देवी सांगत । समोर दिसे हा पर्वत ॥
उचलून होता तसा परत । ठेवून दाखव प्रियबाळा ॥८४॥

नाथ मग मंत्र जपत । सहज उचले तो पर्वत ॥
देवी पर्वता दडपी गुप्त । परन्तु कांही न चाललें ॥८५॥

देवी सांगे तूं बळवंत । ठेव खालीं पुन्हां पर्वत ॥
नाथे केलें तसें त्वरित । माता आशीर्वाद देई ॥८६॥

तीन दिवस ठेवून घेत । मग देवी निरोप देत ॥
हिंगळजा देवी प्रख्यात । सर्वां नमन भावें असो ॥८७॥

नाथ निघून पुढें जाती । बारा मल्हार तीर्थाप्रती ॥
जवळ देवालयीं वस्ती । रात्रीं केली नाथांनीं ॥८८॥

मध्यरात्र जेव्हां झाली । तेव्हां भूतें दिसूं लागलीं ॥
दिवट्या घेऊन निघाली । वेताळाचे दर्शनाला ॥८९॥

नाथ म्हणती भुतावळ । लोकां पीडते सदाकाळ ॥
त्यांचा मालक जो वेताळ । त्याची कृपा मिळवावी ॥९०॥

नाथ जपती मंत्रावळीं । भूतें भूमीस तेव्हां डसलीं ॥
वेताळा न दिसती सगळीं । मग तो शोधार्थ भूतें धाडी ॥९१॥

त्यांनीं नाथास ओळखून । कथिलें भूतां द्या सोडून ॥
नाथ सांगती न सोडीन । तुमचा वेताळ येऊं दे ॥९२॥

भूतांचा निरुपाय झाला । त्यांनीं वृत्तांत कळविला ॥
वेताळ फार क्रोधावला । भुतावळ सर्व जमवी ॥९३॥

वीरविद्येस जे कारक । तेही जमले अष्टनायक ॥
सर्व घालती नाथा धाक । दत्तस्मरण नाथ करिती ॥९४॥

अंगा लाविलें भस्म मंत्रून । सोडिलें स्पर्शअस्त्र जपून ॥
वासवशक्ति मंत्रवून । वेताळावर टाकिली ॥९५॥

मूर्च्छेमधून लवकर । सावध वेताळ प्रखर ॥
वाताकर्षण अस्त्र सत्वर । सोडिती नाथ सर्वांवर ॥९६॥

सकळ विकल होऊन । नाथ चरणीं झाले लीन ॥
नाथ म्हणती व्हावें प्रसन्न । लोकहितास सज्ज व्हा ॥९७॥

वेताळ कथी स्वसाधन । नाथा देई आशीर्वचन ॥
सर्वांची समजूत होऊन । शेवट गोड झालासे ॥९८॥

हें सकळ वर्तमान । करी भूतबाधा निरसन ॥
नाथ-वेताळ आशीर्वचन । देती त्यांना नमन असो ॥९९॥

सर्वतारक श्रीदत्तनाथ । अठ्ठाविसावा अध्याय येथ ॥
स्वीकारिती दत्त समर्थ । जनकल्याण करावया ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय २९ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:॥

मत्स्येंद्रनाथें बारा मल्हार । क्षेत्रीं करून तीर्थाचार ॥
केलें गमन देवकुमार । दर्शनासाठीं प्रेमभरें ॥१॥

सदा व्हावा परोपकार । म्हणून घेतला अवतार ॥
त्रिविध ताप व्हावे दूर । म्हणून मंत्र सिद्ध करी ॥२॥

शक्ति आदित्यकिरणांत । तीच सर्व भूतमात्रांत ॥
मंत्रसाधन यथारीत । अनुभव दावी प्रत्यक्ष ॥३॥

पापपुण्य कर्मविपाक । ज्ञानबळें जाणून निक ॥
ईशमार्गा लावणें लोक । देवकार्य ओळखावें ॥४॥

नमुनी भावें ईश्वरा मग । नाना विद्यांचा उपयोग ॥
जनसुखासाठीं सवेग । करून असक्त असावें ॥५॥

सारासारता न पाहून । मंत्र तंत्र यंत्र साधन ॥
वाटेल तसें उपयोगून । पातक मात्र वाढतसे ॥६॥

विधायक वृत्ति असावी । मोह बुद्धी टाकून द्यावी ॥
सर्व सुखा उपयोगावी । गवसे आपणां जी विद्या ॥७॥

त्याचें नांव सदाचरण । आदर्श हवें अंत:करण ॥
अज्ञ करिती अनुकरण । श्रेष्ठ वर्तन ज्यापरी ॥८॥

ज्या गम्य नसे ज्या विद्येंत । तेथें कधीं न द्यावें मत ॥
सदा साधावें लोकहित । आत्मसंस्कृति पाळून ॥९॥

झाला तर करा उपाय । परन्तु न करावा अपाय ॥
अयोग्य वर्तनें पुण्य क्षय । श्रेष्ठ पंथीं बुद्धि हवी ॥१०॥

कर्मगति असे गहन । बुद्धीपेक्षां कर्म सान ॥
म्हणून मति शुद्ध राखून । वागणें कल्याणकारक ॥११॥

त्याला न मिळे अधोगति । आत्ममार्गीं घडे प्रगति ॥
ईश्वर कृपेनें परिणति । मोक्षप्राप्तींत होतसे ॥१२॥



लोककल्याण इच्छी मन । म्हणून नाथांचें तीर्थाटन ॥
कुडाळ प्रांतीं केलें गमन । दुर्गादेवी आडिवरीं ॥१३॥

शिवहस्तीं कालिका अस्त्र । दुष्ट दुर्जनातें काळास्त्र ॥
अति कडक त्याचें शस्त्र । फडशा पाडी दैत्यांचा ॥१४॥

त्याला शंकर झाले प्रसन्न । दिलें कालिके वरदान ॥
विश्रांति हवी तिला म्हणून । आडूळ ग्रामीं स्थापिली ॥१५॥

तें दैवत फार प्रखर । त्या देवीचा घ्यावया वर ॥
तिला करिती नमस्कार । मत्स्येंद्रनाथ प्रेमभरें ॥१६॥

देवी म्हणे मच्छिंद्रनाथा । नको त्रासवूं मजला वृथा ॥
विश्रांति घेण्यास सर्वथा । राहिलें स्वस्थ मी येथें ॥१७॥

नाथ सर्व खरें म्हणती । परी लोकहिता स्तविती ॥
देवी म्हणे तूं भ्रष्ट जती । वरदान माझें न मिळेल ॥१८॥

नाथ म्हणे न करीं गर्व । दत्तकृपेनें हरीन सर्व ॥
तुझ्यापदीं आदरभाव । ठेवून तुला प्रार्थितों ॥१९॥

दोघांचें चाले संभाषण । त्यांतून उद्भवे भांडण ॥
त्याचें झालें पर्यवसान । रण तुंबळ पेटलें ॥२०॥

काळाचा काळ महेश्वर । त्याची शक्ति ही अनिवार ॥
परी तो नाथ धुरंधर । मुळीं न डरे तेधवां ॥२१॥

नाथ अस्त्रें देवी गिळित । देवी भयंकर दिसत ॥
नाथा भक्षावया धांवत । नाथ दत्तस्मरण करी ॥२२॥

वाताकर्षण मंत्र जपून । फेकी भस्म चिमटीमधून ॥
देवीं झाली विकलप्राण । शिवस्मरण ती करी ॥२३॥

शिवशंकर आगमन । होऊन झालें निरीक्षण ॥
कौतुकें नाथास कवळून । म्हणे प्रताप थोर तुझा ॥२४॥

आतां उठव या देवीला । नाथें नमिलें शंकराला ॥
म्हणे देवा ही तुझीच लीला । देवीस उठवी नाथ त्वरें ॥२५॥

नाथ हेतु शिव जाणती । आणि कालिकेस सांगती ॥
माझ्या हातीं तुझी वसती । पण नाथा प्रसन्न हो ॥२६॥

मग दुर्गा शिवा नमून । प्रेमें नाथा पोटीं धरून ॥
दिला वर इच्छेसमान । नाथ आनंदी जाहले ॥२७॥

शिव आणि मत्स्येंद्रनाथ । राहती देवीच्या आग्रहार्थ ॥
तीन दिवस आदरातिथ्य । करुन देवी निरोप दे ॥२८॥

नाथ कालिका दुर्गाशंकर । कृपा करोत सर्वांवर ॥
त्यांना करुया नमस्कार । आशीर्वाद असे त्यांचा ॥२९॥

मागील हिम कालानंतर । घडामोडी या पृथ्वीवर ॥
बहुत झाल्या आजवर । त्यापूर्वींच्या बहु गुप्त ॥३०॥

परशुराम काळापासून । सह्य सागर मध्यजमीन ॥
मानववस्ती सुसंपन्न । होऊन ख्याति पावते ॥३१॥

कश्यप असुर सिंधुरक्त । भूमध्य मर्मर कृष्णव्याप्त ॥
या सप्तसिंधु प्रदेशांत । वैदिक संस्कृति नांदली ॥३२॥

सप्तसूर्य दशभास्कर । तेथून खालीं वर्षभर ॥
द्वादशादित्य प्रदेशावर । वैदिक संस्कृति विस्तरें ॥३३॥

प्राचीन वैदिक वाङ.मयांत । सूर्यांचा तसा उल्लेख येत ॥
गणना तारा अभिजित । मग धनिष्ठा जाहली ॥३४॥

दाशराज्ञ युद्धप्रसंग । वेदांत त्याचें वर्णन सांग ॥
दशराजांचा युद्धावेग । सप्तसागर परिसरीं ॥३५॥

अरवली अर्बुद्ध पर्वत । अचलेश्वर सुविख्यात ॥
वसिष्ठ आश्रम दिव्य शांत । विजयी वसिष्ठ ब्रह्मर्षि ॥३६॥

त्यांना असो भावें नमन । भारत भूमि पुण्यवान ॥
दुर्लभ येथील जनन । देवही जन्म वांछिती ॥३७॥

उत्तर पूर्व दक्षिण पश्चिम । भारत संस्कृति मनोरम ॥
ब्रह्म क्षत्र तेज अनुपम । सुवर्णभूमि धन्य असे ॥३८॥



भारत पश्चिम पर्वत । सागरलाटा आदळत ॥
उंचावला सह्यपर्वत । सागरभूमि कोंकण ॥३९॥

पूर्वीपासून पर्यटन । चाले पश्चिम समुद्रांतून ॥
मग कोंकण भूमि नवीन । परशुराम प्रथम वसवी ॥४०॥

विघ्ननिवारक गणपति । भार्गवरामा परशु देती ॥
परशुराम विजयहस्ती । कोंकण संपन्न नांदतें ॥४१॥

पश्चिम सागरामधील । द्वीप प्रदेश बुडाला खोल ॥
भूगोलावर सदाकाळ । अशा घटना चालती ॥४२॥

नदीचें समुद्रमीलन । तेथून भरतीजल वाढून ॥
जेथपर्यंत करी गमन । त्याला खाडी नांव लोकीं ॥४३॥

कोंकणांत नद्या लहान । सागरपाणी त्यांत शिरून ॥
व्यापार चाले जहाजांतून । कांहीं बंदरें उत्तम ॥४४॥

कोंकणांत कुडाळप्रांत । त्याखालीं भाग गोमंत ॥
परशुराम यज्ञ करीत । हरमलीं डोंगर भस्माचा ॥४५॥

कुडाळाजवळ प्राचीन । रेवती निवती बंदरें दोन ॥
त्यांचे सह्यगिरीमधून । रामहनुमंत घांट जुने ॥४६॥

दोन्ही घाटांमधील घांट । पारपोली अरुंद वाट ॥
आतां आंबोली चांगला घांट । सह्य पायथा दाणोली ॥४७॥

मस्त वारा वर आंबोली । घनदाट अंबुदावली ॥
ग्रामदेवता श्रीमाउली । डोंगरीं दीर्घ गुहा असे ॥४८॥

आंत महर्षि मुनीवर । असती घडे साक्षात्कार ॥
हिरण्यकेशी उगम सुंदर । पवित्र उदक वाहतसे ॥४९॥

श्रीगुरुदेवदत्तस्थान । सह्यगिरी अतिप्राचीन ॥
पूर्व पश्चिम मोठ्या लहान । नद्यांत दत्ततीर्थ वसे ॥५०॥

हिरण्यकेशीनदीतोय । परिसर वाटे वेदमय ॥
यजुर्वेद शाखा तैत्तिरीय । अंतर्गत हिरण्यकेशी ॥५१॥



आनंदांत जीव जन्मती । आनंदांत सदा वसती ॥
आनंदांत शेवटीं जाती । वेदवाणी चिरंतन ॥५२॥

सह्यसागर दैवतें दत्त । नद्या तीर्थस्थानें अमित ॥
वेद ऋषिमुनी साधुसंत । सर्वां प्रणिपात असो ॥५३॥

रेवतीद्वीप गेलें बुडून । कांहीं रेवती पत्तन ॥
आजवर असे टिकून । रेडीपाटण त्या म्हणती ॥५४॥

त्याचेजवळ आद्यग्राम । रेवती परिसर उत्तम ॥
विद्या संपत्ति पराक्रम । रेडी किल्ला यशवंत ॥५५॥

सह्यपर्वत पूर्वप्रदेश । तेथें नांदे असुर महिष ॥
त्याला मारून केला वास । लक्ष्मीनें कोल्हापुरीं ॥५६॥

कोल्हापुरी फार प्राचीन । अंबा महालक्ष्मीस्थान ॥
ज्योतिबादेव अश्ववाहन । साह्यकर्ता लक्ष्मीचा ॥५७॥

हींच दैवतें कोंकणांत । प्रत्येक गांवीं विराजत ॥
पूर्वी सातेरी भूमिका म्हणत । श्रीरवळनाथ जोतिबा ॥५८॥

लक्ष्मी महिषासुरमर्दिनी । काली मधुकैटभनाशिनी ॥
सरस्वती चंडमुंडमथिनी । महादेवी भगवती ॥५९॥

सागरकन्या लक्ष्मीदेवी । आदिमाया श्रीमाउली पूर्वी ॥
सदा सफळ भूमि बरवी । योगेश्वरी यश देतसे ॥६०॥

वारूळ धातु कष्ट पाषाण । वृक्षादि नाना देवता खूण ॥
लोक त्यांना जातीं शरण । फणिदर्शन भाग्याचें ॥६१॥

गणपति लक्ष्मीनारायण । आदित्य दुर्गा उमारमण ॥
पंचायतन देवतास्मरण । भजन पूजन चालतसे ॥६२॥

परशुरामक्षेत्र कोंकण । भार्गवराम रामकृष्ण ॥
पुंडलीकवरद समचरण । दत्तनाथ फिरती इथें ॥६३॥

रघुपति राघव राजाराम । पतित पावन सीताराम ॥
वसुदेव देवकी बळराम । कृष्ण भगवंत प्रिय भूमि ॥६४॥

जरासंध गोमांतकांत । फसून निघाला परत ॥
कालयवन भस्म होत । कृष्णदर्शन मुचकुंदा ॥६५॥

कृष्ण परशुराम भेटत । नानाविध गोष्टी करीत ॥
द्वारकेंत नांदे भगवंत । भारतभूमि भरभरे ॥६६॥

श्रीराम कृष्ण हरी विठ्ठल । रुक्मिणी पांडुरंग प्रेमळ ॥
प्रकटून वाढे भक्त मेळ । मूर्ति मोहक साजिरी ॥६७॥

परम न्यायी दयाघन । सर्वव्यापक बलवान ॥
सर्वसाक्षी श्रीभगवान । ज्ञानी कर्तुमकर्तुम् ॥६८॥

सह्यशाखा मोठ्या लहान । श्रीगुरूदत्त वसतिस्थान ॥
वैदिक संस्कृतिजीवन । सह्य परिसरीं शाश्वत ॥६९॥

पुण्याचरणें देवतातेज । वाढून कल्याण सहज ॥
प्राचीन थोर संस्कृति निज । प्रेमळ उत्कर्ष होतसे ॥७०॥

ग्रामदेवता इष्ट देवता । सर्व प्रार्थाव्या नित्य हिता ॥
शुद्धभावें नमस्कारितां । आनंदें आशीर्वाद देती ॥७१॥

सर्व देवता साधुसंत । दत्ता करूया प्रणिपात ॥
त्यांच्याकृपें सर्वभूतहित । आशीर्वचन लाभतसे ॥७२॥

आपण करितां संसार । पाळीत जावे यथाचार ॥
श्रीदेवदत्त दिगंबर । स्मरण मनांत असावें ॥७३॥

श्रीगुरूदत्त दयाघन । नाथांसह सदा स्मरून ॥
चालवावें नित्य जीवन । सुख भोगून मोक्ष मिळें ॥७४॥

कुडाळाजवळ माणगांव । तेथें अवतरे श्रीदत्तदेव ॥
टेंब्ये कुळांत वासुदेव । वैदिक आचार उत्तम ॥७५॥

श्रीशके सत्राशेंशाहात्तर । श्रावण कृष्ण षष्ठी रविवार ॥
धनलग्नीं गणेशकुमार । श्रीवासुदेव अवतरले ॥७६॥

आद्यग्राम आजगांवांत । दिव्य ब्राह्मण स्वप्नीं सांगत ॥
नृसिंहवाडीस जावें त्वरित । वासुदेव सुखावती ॥७७॥



जातां नरसिंहवाडींत । दक्षिण द्वारीं भेटले दत्त ॥
पुढें वासुदेव प्रख्यात । सर्वभूतहित करिती ॥७८॥

दिगंबरा दिगंबरा । श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥
भक्तां सांगती भजन करा । भावें तरा ही भवनदी ॥७९॥

गरूडेश्वरीं नर्मदातीरीं । वासुदेव जडदेहधारी ॥
साठ वयांत आनंद वत्सरीं । आषाढारंभीं समाधिस्थ ॥८०॥

श्रीवासुदेवानंद सरस्वती । भगवान योगी चक्रवर्ती ॥
त्यांना सदा भावें प्रणती । आशीर्वाद लाभतसे ॥८१॥

श्रीदत्त अवतार नूतन । भारतीं प्रवास पायीं करून ॥
नानापरी उपदेशून । जन सन्मार्गा लाविले ॥८२॥

श्रीदत्त यति सतेज दिसती । दत्त संभाषणें चालती ॥
लोक-पापें स्वयें भोगिती । सुख अर्पिती भक्तजना ॥८३॥

शरीर चिंता मुळींच नाहीं । कष्टला देह काळजी नाहीं ॥
वैदिक यति पवित्र राही । शुद्धाचार प्रथम धर्म ॥८४॥

विविध ग्रंथरचना झाली । अपार त्यांची भक्तमंडळी ॥
वासनादेही जीवां चांगली । गति देती तीर्थोदकें ॥८५॥

वैदिकधर्म सनातन । पाळून लावणें दत्तीं ध्यान ॥
होऊन बाधा-निरसन । लाभे सुख मोक्ष अंतीं ॥८६॥

श्रीदत्त दयाळु कृपाघन । करी नित्य सफल जीवन ॥
नाथपंथ उद्धरी जन । नमन असो सकलांना ॥८७॥

महाकाली महासरस्वती । महालक्ष्मी अेक त्रिमूर्ती ॥
माते नमनू नाथ निघती । हरेश्वर तीर्थाटना ॥८८॥

गदातीर्थीं स्नान करून । घ्यावया हरेश्वर दर्शन ॥
जात असतां हाक ऐकून । मच्छिंद्रनाथ थांबले ॥८९॥

मानवी शरीर धरून । वीरभद्र करण्या स्नान ॥
जात असतां क्रोधावून । दरडावून पुसे नाथा ॥९०॥



तव दीक्षा असे कोणती । नाथपंथ मच्छिंद्र सांगती ॥
वीरभद्र पाखंडी म्हणती । टाकून द्यावा हा पंथ ॥९१॥

असें उद्धवलें भांडण । चाले दोघांचें युद्ध दारुण ॥
ब्रह्मा विष्णु पार्वतीरमण । येऊन रण मिटविती ॥९२॥

मग वीर कवळी नाथा । वरदहस्त ठेवी माथां ॥
वीर मान्यता नाथपंथा । नाथा आशीर्वाद मिळे ॥९३॥

सर्व जाहले आनंदित । विष्णुसह नाथ निघत ॥
नाथ राहिले वैकुंठांत । मन कर्णिका-स्नान घडे ॥९४॥

पूर्व योगेश-समाधि नव । दहावी समाधि वासुदेव ॥
मेरूपाठारीं लक्ष्मीधव । दाविती नाथा आनंदें ॥९५॥

कैलासांत इंद्रलोकांत । ब्रह्मलोकीं पितृगणांत ॥
गंधर्व किन्नर यक्षपुरींत । सर्वत्र नाथा गौरविलें ॥९६॥

तीन रंगांचा हिमालय । पैलत्रिविष्टप देवमय ॥
धर्ममार्गांत जगत्रय । श्रीविष्णु पाळी नमन सर्वां ॥९७॥

श्रद्धा मैत्री दया शान्ति । तुष्टि पुष्टि क्रिया उन्नति ॥
बुद्धि मेधा तितिक्षा मूर्ति । ऱ्ही दक्षकन्या धर्मभार्या ॥९८॥

विधिपुत्र धर्म अधर्म । धर्म मार्गांत योगक्षेम ॥
अधर्मांत दुर्गति परम । विचारपूर्वक वागावें ॥९९॥

सर्व देवता साधुसंत । मत्स्येंद्रनाथासहित दत्त ॥
अेकोणतिसावा स्वीकारीत । गोड अध्याय लोकहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय ३० वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

स्वर्गादि लोकांमधून । भूलोकीं नाथआगमन ॥
होऊन चाले तीर्थाटन । केकडा देशीं पातले ॥१॥

श्रीवज्रेश्वरी वज्रवनीं । तीनशें साठ कुंडीं पाणी ॥
नाथें उष्ण जल पाहोनी । पुजाऱ्यासी पुसती कथा ॥२॥

तो सांगें कथा प्राचीन । वसिष्ठें केला यज्ञ महान ॥
तेव्हां देव करिती स्नान । उष्णोदकाचे तीर्थानें ॥३॥

आणि स्वनामें कुंडां देती । नाथ तसें आणिती चित्तीं ॥
कुंड निर्मून स्नान करिती । स्नानही घालिती देवीला ॥४॥

देवी झाली नाथां प्रसन्न । घेतसे एक मास ठेवून ॥
नाथ पुसती तिला प्रश्न । वज्रेश्वरी कां म्हणती ॥५॥

भगवती नाथा सांगत । वसिष्ठाचें यज्ञसभेंत ॥
ऋषितापसी येती बहुत । इंद्रस्वागता गौणत्व ॥६॥

मग तो सोडी वज्र आपुलें । रामाचें तिकडे लक्ष गेलें ॥
त्वरें मंत्रें दर्भास्त्र सोडिलें । दर्भशक्ति वज्र गिळी ॥७॥

हें पाहून रामस्तवन । इंद्र करी होऊन लीन ॥
मग रामाचें द्रवलें मन । परत वज्र दे देवी ॥८॥

यज्ञ झाला सांग समाप्त । स्वठाया सर्व निघून जात ॥
वज्रेश्वरी मला म्हणत । येथें स्थापना राम करी ॥९॥

सर्व महिमा नाथ ऐकत । देवीस केला प्रणिपात ॥
द्वारकातीर्थाकडे निघत । नमन नाथां देवीसह ॥१०॥

द्वारकेंत कृष्णदर्शन । होऊन पावले समाधान ॥
तीर्थविधीही योग्य करून । गेले नाथ अयोध्ये ॥११॥

शरयूंत स्नान करून । घ्यावया श्रीरामदर्शन ॥
राममंदिराकडे निघून । जातां सांगती द्वारपाळ ॥१२॥



श्रीरामवंशज नृपति । पाशुपत पूजी रामाप्रति ॥
म्हणून आंत प्रवेश जती । यावेळीं तुला न मिळेल ॥१३॥

दर्शना अटक नसावा । म्हणून राजास दंडावा ॥
कोप सेवकां न करावा । असे नाथ ठरविती ॥१४॥

स्पर्शअस्त्रमंत्र जपून । मच्छिंद्रनाथ गेले निघून ॥
मंदिरीं भूप साष्टांग नमन । करितां भूमीस डसलासें ॥१५॥

उपय कांहीं न चालला । प्रधान तेव्हां गडबडला ॥
बाहेर येऊन सेवकांला । विचारी कांहीं घडलें का ॥१६॥

दूत सांगती झाला प्रकार । प्रधान होता फार चतुर ॥
नाथांस शोधून सत्वर । विनवी कृपा करावी ॥१७॥

मग त्यांनी मंत्र जपून । केली राजाची सोडवण ॥
नाथकरणी अवलोकून । सर्व विस्मित जाहले ॥१८॥

भक्ति भावें श्रीरामदर्शन । घेऊन संतुष्ट नाथमन ॥
राजादिक नाथां नमून । ठेवून घेती आदरें ॥१९॥

नाथसेवा करी भूपती । प्रसन्न होऊन नाथ पुसती ॥
सांग इच्छा तुझी कोणती । भूप कथी आनंदें ॥२०॥

सीतारामदर्शन व्हावें । वंशदेवा सूर्या पहावें ॥
नाथ म्हणती अवश्य बघावें । बाहेर अंगणीं पातले ॥२१॥

भस्म फेकी मंत्र जपून । थांबलें नभीं सूर्यगमन ॥
सकळ देव घाबरुन । म्हणती काय घडलें हें ॥२२॥

ब्रह्मा विष्णु शंकर येती । प्रेमें मच्छिंद्रनाथा पुसती ॥
नाथ नमून त्यांना म्हणती । राजा सज्जन हा असे ॥२३॥

सूर्य आणि रामदर्शन । घ्यावया इच्छी राजमन ॥
त्याच्या सेवेनें चित्त द्रवून । जातसे माझे कृपा करा ॥२४॥

त्रैमूर्ती तथास्तु म्हणती । सूर्यासह श्रीराम येती ॥
पाशुपता दर्शन देती । वंशज राजा सुखावला ॥२५॥



इच्छेसम आशीर्वचन । देऊन केलें रामसांत्वन ॥
नाथासहीं गहिंवरून । आशिर्वाद लाभतसे ॥२६॥

सर्व देव स्वठाया जाती । सर्वत्र पसरे नाथकीर्ती ॥
नाथ कृपें तरे भूपती । तशी सर्वा कृपा मिळो ॥२७॥

ईश्वरलीला असे अगाध । घडवी घटना नानाविध ॥
त्या गाऊन मिळतो बोध । सर्वां नमन प्रेम भरें ॥२८॥

द्वादश वर्षे तीर्थाटन । लोकसंग्रहासाठीं करून ॥
ठायीं ठायीं आपुली खूण । लोकरक्षणा ठेविती ॥२९॥

शरीरशुद्धीसाठीं स्नान । वाणी सांगे स्नेहाळ वचन ॥
मानसीं विचरमंथन । सर्वभूतहित व्हावें ॥३०॥

शुद्धाचार तसा विचार । मच्छिंद्रनाथ साधु थोर ॥
हरि नारायण कुमार । उपदेशिण्या त्वरें जाती ॥३१॥

चंद्रगिरींत विप्रघर । काढिलें शोधून सत्वर ॥
सांगती दाखवा कुमर । बारां वर्षांनी मी आलों ॥३२॥

सरस्वतीस खूण पटली । आणि पायां पडूं लागली ॥
म्हणे विभुति नाहीं खाल्ली । नाथा शाप नका देऊं ॥३३॥

मग म्हणती मनांत नाथ । विभूति जाणार नाहीं व्यर्थ ॥
सूर्यवीर्यपुत्र समर्थ । हरि नारायण होईल ॥३४॥

बाईस दिलें आश्वासन । म्हणती दाखव भस्मस्थान ॥
म्हणे गोवरीं दिलें टाकून । नाथें हाक मारिली ॥३५॥

गोवरढीग डोक्यावर । सुखरूप असें येथवर ॥
पण न येववे मला बाहेर । आतून स्पष्ट बाळ वदे ॥३६॥

नाथें केला गोवर दूर । नांव ठेविलें गोरक्षकुमर ॥
बाई विनवी वारंवार । तिला सपुत्रा हो म्हणती ॥३७॥

अनुग्रह दिला गोरक्षास । आणि सवें घेतला त्यास ॥
चालले जगन्नाथ क्षेत्रास । मार्गीं कनक ग्राम मिळे ॥३८॥

नाथ सांगती गोरक्षास । घे ही झोळी लाव कांखेस ॥
भूक लागली यावेळेस । भिक्षा मागून आणावी ॥३९॥

गोरक्ष फिरे गांवांतून । एका घरीं मिळे श्राद्धान्न ॥
बहुविध बहुत भिक्षान्न । घेऊन जाई नाथाकडे ॥४०॥

नाथ जेविती पोटभर । सांगती वडे आवडले फार ॥
पुन्हां जाऊन मिळाले तर । घेऊन सत्वर ये बाळा ॥४१॥

गोरक्ष विप्रघरा परत । येऊन सांगे गुरुजी तृप्त ॥
पण आणखी वडे मागत । तरी असल्या द्या मला ॥४२॥

बाई म्हणे असत्य भाषण । वडे फुकट न मिळती जाण ॥
गोरक्ष सांगती सत्यभाषण । काय पाहिजे सांग मला ॥४३॥

ती गोरक्ष-डोळा मागत । तो तसें खरेंच करीत ॥
बाई क्षमा करा म्हणत । नमस्कारून वडे दिले ॥४४॥

गोरक्षें दिलें आश्वासन । घेऊन निघाला भिक्षान्न ॥
कपाळा वस्त्र गुंडाळून । बुबुळ हातीं दडविलें ॥४५॥

नाथापुढें झोळीं ठेवीत । आणि माघारा सरे त्वरित ॥
शिष्यपरीक्षा नाथ पहात । म्हणती नेत्रा काय झालें ॥४६॥

गोरक्ष म्हणे कांहीं नाहीं । गुरु म्हणती जेवणार नाहीं ॥
आधीं सांगावें सकळ कांहीं । मग गोरक्ष सर्व कथी ॥४७॥

पोटीं कवळून शिष्याला । म्हणती तूंच शिष्य भला ॥
लगेच केला डोळा चांगला । आदित्यमंत्र-विभूतीनें ॥४८॥

शिष्यासह प्रेमें बसून । केलें मग स्वस्थ भोजन ॥
तेथेंच राहिले कांहीं दिन । त्यांना नमस्कार असो ॥४९॥

मच्छिंद्र शिष्या शिकवीत । वेदशास्त्रादि विद्या समस्त ॥
गोरक्षशिष्य पाठ करीत । नाथ मनीं संतोषती ॥५०॥

गांवातील मुलें जमत । गोरक्षाची मैत्री करीत ॥
नाथांस मुलें आवडत । एकदां बाहेर ते गेले ॥५१॥



गोरक्षाला मुलें सांगती । आम्ही आणिली चिकणमाती ॥
गाडा करून आम्हां प्रती । द्यावा प्रेमें खेळावया ॥५२॥

गाडा कसा करावा नकळे । तुम्ही जमून करा सगळे ॥
असें सांगून गोरक्ष वळे । आपला पाठ करावया ॥५३॥

मग मुलें गाडा करिती । आणि गोरक्षातें सांगती ॥
सारथी हवा गाड्यावरती । तो करून दे आम्हां ॥५४॥

गोरक्षाला बुद्धि सुचली । सारथी करितां मंत्रावळी ॥
दैवयोगें असे चालली । मुखांतून संजीवनी ॥५५॥

पुतळ्यांत जीव भरला । बाळ फार रडूं लागला ॥
मुलांचा गोंधळ उडाला । भूत म्हणून पळताती ॥५६॥

गोरक्षही भयें दडाला । बालकाचा टाहो चालला ॥
मच्छिंद्रनाथ येतां जमला । वाटेंत घोळका मुलांचा ॥५७॥

सांगती मुलें रडे भूत । नाथबाबा आश्चर्यचकित ॥
येऊन आश्रमीं पहात । खरेचं बाळ रडतसे ॥५८॥

नवनारायणांमधील । करभाजन झाला बाळ ॥
परन्तु गोरक्ष प्रेमळ । शिष्य कोठेंही दिसेना ॥५९॥

म्हणून मारी त्याला हांक । म्हणे मुलाचा नाहीं धाक ॥
करभाजन अलौकिक । पद्धतीनें जन्मलासे ॥६०॥

लोकही जमले इतक्यांत । नमून शिष्य कथी समस्त ॥
गुरुजी आनंदें डोलत । धन्य सामर्थ्य मंत्राचें ॥६१॥

जयजयकार प्रवर्तला । लोक नमिती गुरुशिष्यांला ॥
मातीचा बाळ जिवंत केला । म्हणती प्रत्यक्ष देव तुम्ही ॥६२॥

लोकहित आपुल्या चित्तीं । बाळ पाळण्या कष्ट अती ॥
तरी कोणा गृहस्था प्रती । वरदपुत्र द्यावा हा ॥६३॥

लोकांचा विचार ऐकून । बोलाविला मधु ब्राह्मण ॥
दंपती सज्जन असून । संतान पोटीं न जाहलें ॥६४॥



नाथ आशीर्वचन देती । बालका ओंटींत घालिती ॥
आनंदानें नमी दंपती । पान्हा फुटे ब्राह्मणीला ॥६५॥

सांगती नाथ दिव्यसुत । होईल उत्तम कीर्तिवंत ॥
बारा वर्षांनीं गोरक्षनाथ । येऊन उपदेश देईल ॥६६॥

विप्र स्त्री पुसे नमनू । बाळा जाणार का घेऊन ॥
नाथ म्हणती करा जतन । तुमचा पुत्र तो असे ॥६७॥

जन्मरीती याची गहन । गहनी नांव ठेवी म्हणून ॥
नित्य पावाल समाधान । भाग्य तुमचें धुरंधर ॥६८॥

प्रसाद-विभूति आशीर्वाद । मिळतां सर्वांस आनंद ॥
नाथचरण सदा सुखद । त्यांना नमस्कार असो ॥६९॥

मच्छिंद्रनाथ महाबळी । गोरक्ष विद्या शिकविली ॥
शिष्या म्हणे गुरुमाउली । मंत्रसिद्ध करावे ॥७०॥

मंत्र देवता आशीर्वाद । लाभतां गोरक्षा आनंद ॥
मच्छिंद्रगुरुचा प्रसाद । शिष्या संपूर्ण लाधला ॥७१॥

मच्छिंद्र शिष्यासमवेत । बद्रिकाश्रमीं निघून जात ॥
शिवालयीं शिवा स्तवीत । भवानीशंकर प्रसन्न ॥७२॥

गोरक्षास कुरवाळून । सांगती प्रेमळ वचन ॥
विद्या सतेज व्हावी म्हणून । तपश्चर्या पाहिजे ॥७३॥

मत्स्येंद्रनाथमनोगत । महेश मुखें उघड होत ॥
पाहून उत्तम मुहुर्त । तपा बसविलें गोरक्षा ॥७४॥

पार्वतीरमण प्रत्यक्ष । गोरक्षाकडे ठेवी लक्ष ॥
हरिनारायण गोरक्ष । तपीं दक्ष आज्ञेसम ॥७५॥

मग मच्छिंद्र तीर्थाटन । करण्यासाठीं गेले निघून ॥
नाना स्थानीं नाथ फिरून । रामेश्वरीं पातले ॥७६॥

नाथ हनुमंत भेटती । परस्परां क्षेम पुसती ॥
उभयतांची मनोवृत्ती । उचंबळून येतसे ॥७७॥

मग नाथा म्हणे मारुती । ऐकून घ्यावी झाली स्थिती ॥
घडावी हनुमंतरती । असें चिंती मैनाकिनी ॥७८॥

स्वमांसाची आहुति देऊन । बारा वर्षें करी हवन ॥
गेली फार कृश होऊन । मला करुणा येतसे ॥७९॥

सांगितलें देऊन दर्शन । मी ब्रह्मचारी हनुमान ॥
मच्छिंद्र कविनारायण । तुझी इच्छा पुरवील ॥८०॥

भविष्य जाणून वचन । देतां पावली समाधान ॥
स्त्रीराज्यांत राणी म्हणून । आतां राज्य करीतसे ॥८१॥

दैवी घटना आणी योग । स्त्रीराज्यांतला प्रसंग ॥
मनीं ध्याऊन रमारंग । दिला होकार नाथांनीं ॥८२॥

मल्याळ राज्य स्त्रीप्रधान । तिकडे मारुतिनाथ गमन ॥
त्यांना पाहतां आनंदून । राणी स्वागत करीतसे ॥८३॥

मैनाकिनीनाथ संगतीं । घडवून परतले मारुती ॥
नाना विलास नित्य चालती । मैनाकिनीसह नाथांचे ॥८४॥

आनंदाचा प्रेम उमाळा । गर्भ राहिला त्या राणीला ॥
शुभ दिवशीं पुत्र जन्मला । उत्सव झाला राज्यांत ॥८५॥

नीतीन्याय शास्त्र विचार । दानधर्म परोपकार ॥
स्त्री राज्यांत निरंतर । गृहस्थनाथ चालविती ॥८६॥

मुलाचें नांव मीननाथ । ठेविती मैनाकिनीनाथ ॥
सर्व ज्ञानी नाथसमर्थ । नमस्कार त्यांस असो ॥८७॥

हस्तिनापुरीं पांडववंश । पावलासे फार उत्कर्ष ॥
त्यांत बृहद्रवा सहर्ष । सोमयाग करीतसे ॥८८॥

थोरथोर ऋत्विज ब्राह्मण । सांगती तसें भूपाचरण ॥
होतां झाला सांग संपूर्ण । एका वर्षांत सोमयाग ॥८९॥

अग्निप्रसाद झाला प्राप्त । पुत्रा पाहून राजा तृप्त ॥
ब्राह्मणहस्तीं देतां गुप्त । अग्निनारायण होतसे ॥९०॥



कामअंतरिक्ष नारायण । जन्मला अग्नींत तेजपूर्ण ॥
स्वाधीन करिती ब्राह्मण । बृहद्रवा संतोषला ॥९१॥

शंकर जाळिती कामदेव । तोचि हा पुत्र अभिनव ॥
त्यांत मिसळे रमाधव । अंतरिक्ष नारायण ॥९२॥

अयोनिसंभव अग्निसुत । परम दीप्त डोळे दिपत ॥
राजमहिषी संतुष्टत । सुलोचना नृपभार्या ॥९३॥

मीनकेतु नृपतिसुत । त्याचा सखा वरदसुत ॥
राजदंपती आनंदत । द्विजसत्कार बहु झाला ॥९४॥

पुत्र जन्मे अग्निज्वालेंत । जालंदर नाम ठेवीत ॥
पुत्रोत्सव चाले अमित । विस्मय आनंद चहूंकडे ॥९५॥

बाळ होतसे वृद्धिंगत । सर्व लोक आनंदभरित ॥
उपनयनसंस्कार होत । विद्येत प्रगति उत्तम ॥९६॥

राजाराणी प्रजाजन । सर्व पावती समाधान ॥
पांडववंश पुण्यवान । श्रीकृष्णकृपा अपार ॥९७॥

नव नारायण प्राचीन । अवचित येती अवतरून ॥
वेद, यज्ञ पुरुषब्राह्मण । सर्वां नमस्कार असो ॥९८॥

कर्ता करविता ईश्वर । त्याची लीला अगम्य फार ॥
त्याला करावा नमस्कार । म्हणजे सौख्य होतसे ॥९९॥

सर्व समर्थ श्रीगुरुदत्त । तिसावा अध्याय स्वीकारीत ॥
सर्वजन पावती हित । सर्वात्मका नमन असो ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय ३१ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:॥

राजमंदिरीं जालिंदर । वर्धतां संतोषे नृपवर ॥
गुण विद्या तेज अपार । पाहून आनंद सर्वांना ॥१॥

त्यांचे करावें आतां लग्न । असें भूपें मनीं योजून ॥
चालविलें वधुशोधन । राणी कथी हें जालिंदरा ॥२॥

तो पुसे मग मातेला । भार्या म्हणती सांग कोणाला ॥
ती म्हणे मजसम तुजला । लग्न करून पत्नी मिळे ॥३॥

जालिंदर सांगे हें मित्रांस । आणि पुसे उपयोग त्यांस ॥
हसून सांगती सोबती त्यास । सुरतक्रीडावर्णन ॥४॥

ऐकून विटला जालिंदर । म्हणे घेतला कां अवतार ॥
जसे वागती नारीनर । तसलें जीवन माझें नव्हे ॥५॥

अग्निकृपेचा राजसुत । तडक चालला तो रानांत ॥
नगररक्षक झाले सचिंत । राजाराणी गडबडती ॥६॥

गुप्तरक्षक सांगती वार्ता । न लागे त्यापुढचा पत्ता ॥
प्रधानादिक अग्निसुता । भीति निश्चित नसे म्हणती ॥७॥

भूपा कथिती करतो शोध । मिळेल मुलगा केला बोध ॥
गोष्टी अैकतां नानाविध । राजसांत्वन होतसे ॥८॥

पाहून शांत गिरिकंदर । निजे तृणावर जालिंदर ॥
पण वणवा भयंकर । लागतां पर्वत पेटला ॥९॥

बाळा पाहातां वैश्वानर । म्हणे असे हा माझा कुमर ॥
शांत होऊन झाला नर । जागृत करी जालिंदरा ॥१०॥

आणि विचारी बाळा वृत्त । पित्या पुत्र सांगे समस्त ॥
पोटीं धरून अग्नि वदत । चिंता कांहीं न करावी ॥११॥

श्रीदत्तात्रेय भगवान । त्याचेकडे केलें गमन ॥
हुताशन करी नमन । करी स्वाधीन जालिंदरा ॥१२॥

श्रीदत्त आनंदे कृपाकर । अर्पितां तोषला वैश्वानर ॥
दत्त सांगती देऊन वर । बारा वर्षे रहा इथें ॥१३॥

श्रीदत्तांची वरदवाणी । ऐकून आनंदी झाली अग्नी ॥
जालिंदर श्रीदत्तचरणीं । लीन होऊन सेवा करी ॥१४॥

श्रीदत्त अग्नि जालिंदर । यांना असो नमस्कार ॥
त्यांच्या कृपेनें निरंतर । इहपर क्षेम लाभतसें ॥१५॥

दत्ता नमुनी अग्नि जाय । जालिंदरा श्रीदत्तराय ॥
विद्या शिकवी मंत्रमय । वेद शास्त्रादिक सर्व ॥१६॥

मंत्रदैवत प्रकटून । जालिंदरा दे वरदान ॥
दत्तकृपेनें पूर्णज्ञान । लाभलें द्वादश वर्षांत ॥१७॥

वैश्वानरा दत्त बोलावी । सांगे विद्या झाली बरवी ॥
सर्व दैवतांना भेटवीं । घेऊन जावें जालिंदरा ॥१८॥

श्रीदत्तात्रेय भगवान । चरणां भावें करी नमन ॥
पुत्रा जालिंदरा घेऊन । जातसे अग्नि आनंदें ॥१९॥

मच्छिंद्रानें प्रसन्न केलीं । वर देतीं तीं दैवतें सगळी ॥
सांगती विद्या सतेज चांगली । व्हावया हवी तपश्चर्या ॥२०॥

प्रेमळ पिता द्विमूर्धनी । पुत्रा पाहून तोषला मनीं ॥
घेऊन जात आनंदोनी । बद्रिकाश्रमीं तपा बसवी ॥२१॥

बारा वर्षे तप उत्कृष्ट । होतां देवता सर्व संतुष्ट ॥
जालिंदरा वरदान स्पष्ट । लाभून श्रेष्ठनाथ बने ॥२२॥

अग्निसहित गौरीशंकर । भेटून दाविती प्रेमादर ॥
जालिंदरनाथ नमस्कार । करून त्यांना संतोषवी ॥२३॥

भवानी शंकर सांगती । विधीची कन्या सरस्वती ॥
सुंदर पुष्ट लावण्यवती । पाहून ब्रह्मा चंचल ॥२४॥

ब्रह्मदेववीर्य गळालें । दिग्गजाचे कानीं पडलें ॥
त्यांत प्रबुद्ध प्रवेशले । गजकर्णांत नारायण ॥२५॥



तेथें बालरूप घेऊन । असे त्यास तू आणून ॥
कर्णकानिफ नांव ठेवून । बोधून विद्या शिकवावी ॥२६॥

पण तो हत्ती असे उन्मत्त । जालिंदर म्हणे श्रीदत्त ॥
प्रसन्न त्याचा वरदहस्त । म्हणून निर्धास्त, नको चिंता ॥२७॥

जाऊन येतों त्या घेऊन । पित्या शंकरा करी नमन ॥
मोहन स्पर्श अस्त्रें जपून । पोंचला सत्वर गजाकडे ॥२८॥

गज झाला शांत सुस्थिर । नाथ करिती नमस्कार ॥
हाक मारून ये बाहेर । कर्ण कानिफ ते वदती ॥२९॥

कानांतून मिळे उत्तर । येतसें सत्वर बाहेर ॥
असें ऐकतांच कुमार । गजकर्णांत दिसतसे ॥३०॥

जालिंदर उतरून घेत । अग्नि शंकर संतोषत ॥
कानिफ नमस्कार करीत । अग्नि शंकरा जालिंदरा ॥३१॥

त्यांचा मिळाला आशीर्वाद । अग्नि शंकर मग समोद ॥
नाथा सांगती हा प्रबुद्ध । शिकव यासी प्रेमभरें ॥३२॥

जालिंदर कानिफा शिकवी । त्याची विद्या झाली बरवी ॥
दोन अस्त्रें राखून ठेवी । वाताकर्षण संजीवनी ॥३३॥

दांभिक बुद्धि दिसे, कांहीं । भावी प्रसंग गुरुजी पाही ॥
तोपर्यंत उपयोग नाहीं । म्हणून राखी गुप्तता ॥३४॥

अस्त्र देवांचे वर मिळावे । कानिफ मंत्र सिद्ध व्हावे ॥
असें योजून भक्ति भावें । स्तवनें देवता बोलावी ॥३५॥

इंद्र चंद्र सूर्य भैरव । वरुण नाग यक्ष दानव ॥
विविध देवता गंधर्व । येती सत्वर नाथाकडे ॥३६॥

त्यांना प्रार्थून जालिंदर । सांगे शिष्य कानिफ थोर ॥
त्याला अर्पावा कृपाकर । म्हणून आतां बोलाविलें ॥३७॥

जालिंदरविनंति ऐकून । सांगती त्याला देवगण ॥
दत्त अग्नीचा आग्रह म्हणून । तुला पूर्वी वर दिला ॥३८॥



परंतु कानिफा आतां वर । आम्ही कदापि न देणार ॥
असें सांगून देव सत्वर । स्वस्थानाकडे निघाले ॥३९॥

देवतावर्तन पाहून । नाथा चढला कोप दारुण ॥
म्हणे तुमचें आचरण । मुळींच बरें न जाहलें ॥४०॥

नाथ करिती दत्तचिंतन । करीं पवित्र भस्म घेऊन ॥
वातास्त्र सोडिलें मंत्रवून । सुटला वारा भयंकर ॥४१॥

सोसाट्याचा तो समीर । सुटतां हैराण झाले अमर ॥
रमापति उमाशंकर । कौतुकें मौज बघती नभीं ॥४२॥

सर्व देवता संतापून । देती अस्त्रें प्रखर सोडून ॥
पण जालिंदर बलवान । निवारण करी सर्वांचें ॥४३॥

शस्त्रें घेऊन करावें रण । असें इच्छिती देवगण ॥
नाथांची ती उलटीच खूण । कामिनी अस्त्र सोडिलें ॥४४॥

देवांपुढें बायका येती । पुन्हां कामास्त्र नाथ सोडिती ॥
त्यामुळें त्यांच्या चेष्टा अती । रतिक्रिडा करण्याच्या ॥४५॥

कामानळें देव गुंगले । युद्ध करण्यास विसरले ॥
नारींकडे धावूं लागले । स्त्रिया काननीं पळताती ॥४६॥

त्यांचे मागून देवही जाती । वृक्षांवर त्या चढून बसती ॥
देव मग तसेंच करिती । नाथें स्पर्शास्त्र सोडिलें ॥४७॥

देव चढले झाडांवर । नारी उतरल्या भूमीवर ॥
त्यांचे मागें खालीं अमर । येतां पाय वर डसले ॥४८॥

खालीं डोकीं वरते पाय । देवांचा हरे सर्व उपाय ॥
त्यांचा गर्व जिरून जाय । धुळींत पडतीं मुकुटादि ॥४९॥

देव लोंबती झाडांवर । स्त्रिया करिती नग्न सत्वर ॥
वस्त्रादि सर्व अलंकार । काढून घेती खिजवून ॥५०॥

नारींचे नादीं जो लागला । तो केवढाही असूं दे भला ॥
दुर्दशा लज्जा अवकळा । त्याला प्राप्त होत असे ॥५१॥

गौरीशंकर रमापती । देवादिकांची अशी गती ॥
अभिमानानें झाली म्हणती । वृथा गर्व करूं नये ॥५२॥

अस्त्र नायिका फार चतुर । वस्त्रें भूषणें अलंकार ॥
त्वरित जालिंदरासमोर । ठेवून गुप्त त्या होती ॥५३॥

नाथ करिती कानिफा खूण । मग कानिफ वस्त्र भूषण ॥
घेऊन वंदी देवगण । ज्यांचे त्याला लेववी तो ॥५४॥

भक्तिभावें सांगे नमून । गुरुजी कोपले दारुण ॥
आलों गुरूंस मी चोरून । त्यांना कांहीं सांगू नका ॥५५॥

देव संतोषले अपार । आणि कानिफा देती वर ॥
हें लक्षून जालिंदर । विभक्त अस्त्र सोडीतसे ॥५६॥

वृक्षांवरून देव सुटले । जालिंदराकडे पातले ॥
सांगती कानिफा वर दिले । निरोप घेती प्रेमानें ॥५७॥

जालिंदराची थोर शक्ति । त्यांची करिती देव स्तुति ॥
आपुल्या स्थानीं निघून जाती । त्यांना नमस्कार असो ॥५८॥

भवानी शंकर लक्ष्मीवर । कर्ण कानिफ जालिंदर ॥
त्रिरात्र तेथेंच सुस्थिर । तत्पदीं नमस्कार असो ॥५९॥

शिव सांगती जालिंदरा । तुम्ही साबरी मंत्र करा ॥
नागाश्वत्थ देवतावरा । मिळविणें जन कल्याणा ॥६०॥

पूर्वीं मच्छिंद्रनाथें केलें । साबरी कवित्व महाभलें ॥
तसेंच करावें चांगलें । सन्मार्गे जनसुखासाठीं ॥६१॥

कानिफाला तें शिकवावें । आणि तपास बसवावें ॥
विद्येला तेज प्राप्त व्हावें । म्हणून हवी तपश्चर्या ॥६२॥

कमलापतीही देती वर । आणि निघाले हरिहर ॥
साबरी विद्या जालिंदर । रची शिकवी शिष्याला ॥६३॥

दैवतें करून प्रसन्न । मिळवीतसे वरदान ॥
कानिफा तपा बसवून । बद्रिकाश्रमीं हर्ष नाथा ॥६४॥



जालिंदरनाथ नंतर । तीर्थाटना फिरती भूवर ॥
आणि करावा लोकोद्धार । असें मनांत योजिती ॥६५॥

गवत कापून डोक्यावर । भारा वाहाती जालिंदर ॥
गायींस चारा निरंतर । घालून तीर्थे आचरिती ॥६६॥

वाऱ्याचा पुत्र वैश्वानर । अग्नीचा सुत जालिंदर ॥
त्याला नसावा तृणाचा भार । असें समीर चिंतीतसे ॥६७॥

जसे नाथ फिरत जाती । तसा गवतभारा वरती ॥
वायुदेव वाहून नेती । लोकां आश्चर्य वाटतसे ॥६८॥

नाना तीर्थयात्रा करीत । गौडबंगालीं नाथ जात ॥
हेला पट्टणीं ते राहात । राज्यांत गोपीचंदाचे ॥६९॥

वरचेवर भारा चालत । थोर साधु लोक म्हणत ॥
भक्तिभावें शरण जात । नाथमना नावडे तें ॥७०॥

गाईंना चारिती गवत । भिक्षा-अन्नें भोजन होत ॥
घाण जागा केली पसंत । राहाती सुखें त्या ठायीं ॥७१॥

राजकामिनी कांहीं शत । गोपीचंदही बळवंत ॥
राजैश्वर्य भोगी अमित । विषयासक्त नेहमीं ॥७२॥

राजमाता मैनावती । माडीवरून सभोंवतीं ॥
पाहातां देखे नाथाप्रती । गवत-मोळी अधांतरीं ॥७३॥

मानसीं म्हणे दिव्यसिद्ध । याचा घ्यावा आशीर्वाद ॥
त्यामुळें शाश्वत सुखानंद । मिळेल मला वाटतसे ॥७४॥

शोधार्थ दासी पाठविली । तिनें नाथ जागा पाहिली ॥
राणीला येऊन सांगितली । ती म्हणे रात्रीं जाऊया ॥७५॥

दासीसह वेष पालटून । रात्रीं राणी गेली निघून ॥
नाथापुढें उत्तम अन्न । ठेवून प्रार्थी कृपा करा ॥७६॥

तिला खडे नाथ मारिती । परी तिची अढळ वृत्ती ॥
प्रसाद करा हीच विनंती । नमून करी न हालतां ॥७७॥



मग नाथांना दया आली । पुसती माहिती सगळी ॥
राणी म्हणे हो गुरुमाऊली । गोपीचंदाची मी माता ॥७८॥

त्रिलोचन भूपतिजाया । मृत्यूनें नेली राजछाया ॥
तशी पडेल माझी काया । तरी उद्धार करावा ॥७९॥

मी पिसा नाथ सांगती । तुझी इच्छा न पुरे म्हणती ॥
अनर्थ करील नृपती । इकडे येसी कळे तर ॥८०॥

मैनावती निघून जात । रात्रीं येतसे पूर्ववत ॥
अेकदां नाथ मनीं द्रवत । निजती अंकीं राणीच्या ॥८१॥

मायेचा भुंगा खालीं ठेविला । तो पोखरी तिच्या मांडीला ॥
राणीचा अंक न हालला । रक्त पसरे भूमीवर ॥८२॥

जालिंदरनाथ जागृत । होऊन सगळें तें पाहात ॥
तिचा भाव दिसे अत्यंत । म्हणून केला बोध तिला ॥८३॥

ती ब्रह्मसुखासी पोंचली । नाथें जपुन मंत्रावळीं ॥
राणीची मांडी केली भली । धन्य मंत्र संजीवनी ॥८४॥

नाथा नमून सुखी झाली । पुत्रा म्हणे राजमाउली ॥
तव पित्याची काया पडली । तुझीही पडेल तशीच ॥८५॥

तरी जन्म-सार्थक कर । राज्यांत नाथ जालिंदर ॥
त्याचा उपदेश घेऊन तर । दत्त शिष्य नाथ असती ॥८६॥

गोपीचंद सांगे नमून । आई मी तसेंच करीन ॥
मैनावती सुखी होऊन । म्हणे चिरायु हो बाळा ॥८७॥

राजमहिषी लुमावंती । गुप्तपणें ऐकत होती ॥
म्हणे काढिली पाहिजे युक्ती । राजकामिनी मुख्य जमवी ॥८८॥

सांगे त्यांना हें वर्तमान । त्या सर्व गेल्या ओशळून ॥
काहींतरी मार्ग काढून । म्हणती संकट टाळूया ॥८९॥

पट्टराणी जी लुनावंती । म्हणे सांगतें राजाप्रती ॥
तव मातेला नाथ आसक्ती । म्हणून सांगे जोगी हो ॥९०॥

जालिंदर राजा होईल । मैनावती भोग भोगील ॥
असा ऐकतां डाव कुटिल । खरें मानील भूपती ॥९१॥

सर्वां युक्ति पसंत पडली । लुमावंती हर्षित झाली ॥
रात्रीं सांगतां भूपतत्काळीं । कोपून निघाला सत्वर ॥९२॥

अश्वलिदीच्या ढिगाऱ्यांत । जालिंदरा पुरून टाकित ॥
सेवकां सांगे ठेवा गुप्त । नातरी जाल यमसदना ॥९३॥

आनंदल्या राजअंगना । लोक म्हणती तीर्थाटना ॥
नाथ जाती विविध स्थाना । मैनावती दु:ख करी ॥९४॥

भूगर्भी वा भूमीवर । सदा सुखांत जालिंदर ॥
राजवर्तन भयंकर । तरी दयाळु थोर ते ॥९५॥

त्यांना भावें असो नमन । बद्रिकाश्रमीं तपा बसवून ॥
गोरक्षा, कानिफा गेले निघून । मच्छिंद्र आणि जालिंदर ॥९६॥

बारा बारा वत्सरें होतां । शिव करिती तपा पूर्णता ॥
आणि धाडिती त्यांना तीर्था । परस्परांना नकळे तें ॥९७॥

गोरक्षनाथ तीर्थे करी । म्हणे गुरुजी गेले दूरी ॥
कुठें भेटती चिंता भारी । हेलापट्टनीं पातलासे ॥९८॥

अलख निरंजन बोलून । स्वीकारीती नाथ भिक्षान्न ॥
एका ठायीं बोल ऐकून । उत्तर मिळालें गोरक्षा ॥९९॥

नाथकरणी असे गहन । नाथांसह दत्तां नमून ॥
अेकतिसावा अध्याय पूर्ण । दत्तप्रिय हा क्षेम करी ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ३२ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

हेलापट्टणीं गोरक्षनाथ । पुसती लोकां इथें नाथ ॥
पूर्वी कोणी तीर्थाटनार्थ । आले असल्यास सांगावें ॥१॥

दहावर्षांपूर्वी लोक । सांगती नाथ अलौकिक ॥
जालिंदर नामें एक । येऊन गेला कुठें न कळे ॥२॥

गोरक्ष म्हणती मनांत । हे कोण नाथ येथें येत ॥
गुरुजी नवीन नांव घेत । किंवा अन्य असती हे ॥३॥

गोरक्षनाथ चिंताग्रस्त । मच्छिंद्रगुरुसाठीं झुरत ॥
भिक्षान्न घ्यावया फिरत । उत्तर गुप्त ओळखिलें ॥४॥

नाथसंकेत नाथ जाणती । जालिंदरनाथ माहिती ॥
ऐकून गोरक्ष सांगती । आपलें वृत्त जालिंदरा ॥५॥

आणि गोपिचंदा दंडून । आत्तांच करतों उत्खनन ॥
असें म्हणतां कृपावचन । अैकत जालिंदराचें ॥६॥

मम शिष्य कानिफनाथ । येथें येऊन टाळी अनर्थ ॥
दया धरिली राजहितार्थ । कानिफ भेटतां सांगावें ॥७॥

हें ऐकून निरोप घेती । गोरखनाथ पुढें जाती ॥
बद्रिकाश्रमीं कानिफ जती । शिवा नमून तीर्था निघे ॥८॥

नानास्थानीं असे फिरत । तीर्थविधि योग्य करीत ॥
लोकांनाही बोध सांगत । जनसागर सुखावती ॥९॥

कोणी विरक्त होऊन । सवें राहती शिष्य बनून ॥
कानिफ करी तीर्थाटन । स्त्रीराज्येसीमे पातला ॥१०॥

जाणार आतां स्त्रीराज्यांत । पाहून शिष्यां शंका येत ॥
कानिफशिष्य शतें सात । गुरु म्हणे हे अज्ञानी ॥११॥

सीमे स्पर्शास्त्र सोडून । शिष्यांना सांगती वचन ॥
आम्हांसवें इच्छिती गमन । त्यांनींच येथें रहावें ॥१२॥



इतरांनीं निघून जावें । वेळींच सावध रहावें ॥
म्हणून सांगतों ऐकावें । मग राहती सात शिष्य ॥१३॥

बाकीचे निघून गेले । सीमेवर भूमीस डसले ॥
हातें पाय सोडवितां सगळे । होती ओणवे ओरडती ॥१४॥

कानिफ सातांना सांगती । धोंडे ठेवून पाठीवरती ॥
सत्वर या म्हणून धाडिती । धांवून सात करिती तसें ॥१५॥

ओणवे शिष्य स्तुति करिती । गुरुजीधावा संशय चित्तीं ॥
कधीं घेणार नाहीं म्हणती । खात्री झाली शिक्षा पुरे ॥१६॥

मग कृपा कानिफ करिती । ओणवे शिष्य येऊन नमिती ॥
सातशें शिष्यांसहित जती । सिद्ध जावया स्त्रीराज्यीं ॥१७॥

हनुमंत पाठवी मच्छिंद्राला । म्हणून मारुति जपे त्याला ॥
कानिफ आला न्यावयाला । शिष्य त्याचा कीं काय ॥१८॥

असा संशय काढून । युद्ध करीत हनुमान ॥
परी कानिफनाथ महान । रणीं मारुति भागला ॥१९॥

नाथें सोडिलें अग्यस्त्र । मारुति तें पुच्छीं घेत ॥
शेपटी भिजवी समुद्रांत । जलचर मरूं लागलें ॥२०॥

समुद्र येतसे धांवून । वारा पुत्रप्रेम धरुन ॥
उभय सांगती वचन । युद्ध नाथाशीं न करावें ॥२१॥

तिघेही नाथाकडे जाती । त्यांना नमी कानिफजती ॥
तिघेही आशीर्वाद देती । नाथमारुति सख्य होत ॥२२॥

कानिफनाथ शपथ वाही । मच्छिंद्र मला ठाऊक नाहीं ॥
मी त्याला नेणार नाहीं । मारुति म्हणे युद्ध बंद ॥२३॥

तिन्ही देव स्वठाया जाती । कानिफा स्त्रीराज्यीं प्रवेशती ॥
नाना स्थानें पाहून जती । आनंद चित्तीं पावतसे ॥२४॥

श्रृंग मुरुडीं राजधानींत । मच्छिंद्रनाथ भोग भोगीत ॥
ज्ञानें जाणून सर्व मात । आदर करी कानिफाचा ॥२५॥

पुष्कळ स्त्रिया सेवा करिती । शिष्यांसह कानिफ जती ॥
अढळ राखून मनोवृत्ती । राजआतिथ्य स्वीकारी ॥२६॥

उभयनाथ गोष्टी करीत । मच्छिंद्र सांगती ठेवीं गुप्त ॥
गोरक्ष सांगूं नको ही मात । जर भेट कुठें झाली ॥२७॥

कांहीं दिवस स्त्रीरार्जयांत । राहून कानिफ पुढें जात ॥
तीर्थयात्रा करीत करीत । गौडबंगालीं पातले ॥२८॥

म्हणे पुष्कळ तीर्थाटन । केलें शोधिले गुरुचरण ॥
परी पत्ता नाहीं अजून । काय करावें म्हणे न कळे ॥२९॥

गौडबंगालीं शिष्यनाथ । गोरक्ष कानिफ फिरत ॥
एका ठिकाणीं अकस्मात । भेट जाहली दोघांची ॥३०॥

परस्पर पूस तपास । होऊन पावले संतोष ॥
मंत्रें आणून फळें सुरस । भोजन करिती आनंदें ॥३१॥

गोरक्ष वदे कानिफासी । फळें करून होतीं तशीं ॥
पुन्हां डसविणें तीं झाडांसी । पूर्वीं समान उत्तम ॥३२॥

कानिफ म्हणे हें न घडेल । गोरक्ष सांगे मग तत्काळ ॥
तुझा गुरु दिसे दुर्बळ । नाथ म्हणजे सर्वबळी ॥३३॥

कानिफ म्हणे मग कोपून । आलों तुझा गुरु पाहून ॥
स्त्रीराज्यांत गेला रमून । गुरुथोरवी न वदावी ॥३४॥

गोरक्ष सांगे गर्व नसावा । तव गुरु मजसी ठावा ॥
अश्वलिदींत त्यास पुरावा । काय गोपीचंदानें ॥३५॥

आणि जपून मंत्रावळी । पूर्वींसम करून सगळीं ॥
फळें झाडांना डसविलीं । कानिफताठा गळाला ॥३६॥

गोरक्ष नमून स्तवन । करून सांगे तुम्ही महान ॥
मजला घ्यावें सांवरून । क्षमा करा लीन असें ॥३७॥

गोरक्ष पावून संतोष । गुरुवार्तेनें झाला हर्ष ॥
गर्वाचा मना नसावा स्पर्श । असें कानिफा सांगतसे ॥३८॥



बुद्धिदांभिक तव पाहून । वाताकर्षण संजीवन ॥
गुप्त राखिती अस्त्रें दोन । गुरुजी पुढें शिकविती ॥३९॥

एकमेंका प्रेमें भेटती । परस्परां सांगून माहिती ॥
आपल्या गुरुच्या शोधाप्रती । गोरक्ष कानिफ निघाले ॥४०॥

कानिफाचे शिष्य अपार । भूपतिसमान संभार ॥
देखून सकळ नारीनर । भूपही मानिती नाथाला ॥४१॥

जेथें जेथें कानिफ जात । तेथें तेथें आदर होत ॥
हेलापट्टणीं नाथ जात । राज्यांत गोपीचंदाचे ॥४२॥

चिंती गोपीचंद भूपती । योग्य गुरु कानिफ जती ॥
नातरी पूर्वीं भिकार जती । गुरु करावा माता म्हणे ॥४३॥

गोपीचंदा नाथ वदती । तुझें उज्वल दैव अती ॥
म्हणून गुर न दंडिती । त्यांना पुरतां लिदीमधें ॥४४॥

ऐकून राजा पस्तावला । ही माहिती गुप्त सकळां ॥
शरण जाऊन कानिफाला । तारा म्हणे नम्रपणें ॥४५॥

मातेस राजा अगदीं लीन । सगळें सांगे वर्तमान ॥
मैनावती थक्क होऊन । स्फुंदून रडे गुरुसाठीं ॥४६॥

राजा अपराधी भयंकर । म्हणून नाथा राग अपार ॥
पण भक्तीनें नरेश्वर । सत्कार करी नाथाचा ॥४७॥

गोपीचंद करी विनंती । मी अन्यायी आई अती ॥
सर्वत्र दिसे मला भीती । वांचव मला कृपेनें ॥४८॥

कानिफनाथ मैनावती । जालिंदरशिष्य असती ॥
एकमेकां नमस्कारिती । विचार करिती पुढील ॥४९॥

गुरूंना कोप फार चढला । जाळिती गोपीचंद राजाला ॥
पांच पुतळे पांच वेळां । भस्म होती नाथ म्हणती ॥५०॥

मग ते राजास सांगती । तुझे पुतळे पांच जळती ॥
करून आण नको धास्ती । मैनावतीही संतोषली ॥५१॥



सुवर्ण रौप्य तांबें पितळ । पांचवा लोखंडाचा सबळ ॥
पुतळे घेऊन नाथ सकळ । सिद्धता करिती कृपेनें ॥५२॥

सांगती राजास उकर । पण आंतून प्रश्न प्रखर ॥
येतां सांगून नांव सत्वर । उडी मारावी पलीकडे ॥५३॥

उत्खनना आरंभ झाला । पुढें केला सुवर्णपुतळा ॥
आंतून क्रोधी प्रश्न आला । कोण उकरीं बोलावें ॥५४॥

भूपति देऊन उत्तर । पळून येतसे बाहेर ॥
आंतून ध्वनि तीव्रतर । गोपीचंदा भस्म हो तूं ॥५५॥

सुवर्ण पुतळा जळून गेला । अशा भरतां पांच वेळा ॥
कानिफ सांगती राजाला । आतां तुला भीती नसे ॥५६॥

सहावें उत्तर द्यावें भलें । कानिफशिष्य गहिंवरले ॥
त्यांच्या कृपें उत्खनन चाले । गोपिचंदाकरवीं इथें ॥५७॥

मग खणे राजा परत । जालिंदर मनीं म्हणत ॥
पांचवेळ राजा जिवंत । तरी आशीर्वाद द्यावा ॥५८॥

असा विचार ठरवून । विचारिती उकरी कोण ॥
राजा वदे अपराधी दीन । गोपीचंद कानिफाझें ॥५९॥

नरेंद्रउत्तर ऐकून । जालिंदरनाथ आंतून ॥
देती कृपें आशीर्वचन । चिरायुभव गोपीचंदा ॥६०॥

मग सर्वां आनंद झाला । बाहेर येतां जालिंदराला ॥
जनसमूह शरण गेला । जयजयकारें गर्जती ॥६१॥

गुरुशिष्य प्रेमें भेटती । गोपीचंद विनम्र अती ॥
गुरुभूपा कुरवाळिती । मैनावती धरी चरण ॥६२॥

सकळां आशीर्वाद मिळे । राजैश्वर्यें उत्सव चाले ॥
नाथकृति नाथास कळे । त्यांना नमस्कार असो ॥६३॥

गोपीचंद नृपति लीन । त्याला उपदेश करुन ॥
सांगती विरक्तता धरुन । माग भिक्षा राणीकडे ॥६४॥

मग बद्रिकाश्रमीं जाऊन । बद्रिकेदारा करीं नमन ॥
बारा वर्षे तप करून । आत्मरूपीं रहा स्थिर ॥६५॥

सदा करावा परोपकार । ऐकून राजा नमस्कार ॥
करुन सांगे निरंतर । वर्तेन गुरुआज्ञेसम ॥६६॥

गुरुजी आपली कृपा थोर । म्हणून झाला मम उद्धार ॥
असें सांगून निघे सत्वर । भिक्षा मागे राणीवशीं ॥६७॥

जय अलख निरंजन । मुखीं सवाल हा बोलून ॥
माई भिक्षा घाल म्हणून । दारोदारीं हिंडतसे ॥६८॥

सगळीकडे वर्तमान । लगेच पसरे तें ऐकून ॥
हळहळती सर्वजन । राजगुण आठविती ॥६९॥

राणी कुटिल लुमावंती । जिणें कळ लाविली होती ॥
गेली विरघळून चित्तीं । म्हणे प्राणेशा टाकूं नका ॥७०॥

गोपीचंदाचे सभोंवती । दाटी करोनी राणी जमती ॥
धन्य गोपीचंद नृपती । विरक्तपूर्ण जाहला ॥७१॥

किती विनविती त्या राजाला । परंतु निर्धार ठरला ॥
म्हणे माई भिक्षा घाला । जय अलख निरंजन ॥७२॥

कुबडीनें त्या दूर लोटून । मातेकडे गेला निघून ॥
मैनावती हर्ष पावून । भिक्षा घाली गोपीचंदा ॥७३॥

गोपीचंद राजा सत्वर । गुरु जालिंदरा समोर ॥
भिक्षा ठेवून नमस्कार । करून सांगे झाली कथा ॥७४॥

मैनावतीही म्हणे येऊन । गोपीचंद विरक्त पूर्ण ॥
जालिंदर गहिंवरुन । कुरवाळिती कृपें राजाला ॥७५॥

मुक्तचंद लुमावंतीसुत । राज्याधिकारी नाथ करीत ॥
सर्व मंत्री हातीं देत । सांगती राज्य चालवा ॥७६॥

मुक्तचंद राजपुत्राला । मैनावतीच्या करीं दिला ॥
गुरु म्हणती मान तूं याला । आनंदानें पुत्रा सम ॥७७॥



सर्व गोपीचंदकामिनी । आणि प्रजेस जमवुनी ॥
सांगती नाथ समजावोनी । नरजन्माचें सार्थक ॥७८॥

मुक्तचंद राजाकडून । दानधर्म खूप करुन ॥
गोपीचंदा तपा धाडून । राहिले नाथ सहा महिने ॥७९॥

राजा नाथ गोपीचंद । मिळवी आनंदाचा कंद ॥
बद्रिकाश्रमीं तपानंद । सेवावया गमन करी ॥८०॥

धन्य शिष्य कानिफनाथ । जालिंदर गुरु समर्थ ॥
दत्त शंकर आदिनाथ । सर्वां नमस्कार असो ॥८१॥

पृथुराजा ध्रुववंशांत । वेनपुत्र कमलाकांत ॥
अवतरून जन तारीत । त्याचा बोध प्रसिद्ध असे ॥८२॥

प्रजेपासून कारभार । घेऊन भोगी राजसंभार ॥
परी प्रजेपासून दूर । धारणाधर्म न शिकवी ॥८३॥

तो भोगी प्रजेचें पातक । ऐश्वर्य-भ्रष्ट गति नरक ॥
निर्दोष अंत:करणपूर्वक । ईश्वरार्पण बुद्धि हवी ॥८४॥

मत्सर टाकून वागावें । आपापलें कर्म करावें ॥
पुण्याचरणें सौख्य पावे । राजा इहपर निश्चयें ॥८५॥

कर्म फलदाता ईश्वर । त्याला करावा नमस्कार ॥
कर्मकर्ता शिक्षण देणार । अनुमोदक तिन्ही सम ॥८६॥

भगवंत चरण कमळ । मनोरथ पुरवी सकळ ॥
परमेश्वर भक्तकुल । आदरें भूपें रक्षावें ॥८७॥

सहनशीलता विद्या तप । असे विप्रकुळीं निष्पाप ॥
त्यांचा कैवारी मायबाप । श्रीहरी त्यांना वंदावें ॥८८॥

त्यामुळें मिळे लक्ष्मी यश । अंतींहीं तारी परमेश ॥
पितरां उद्धरी रमेश । वृद्ध जनांतें सेवावें ॥८९॥

गोब्राह्मण संतवृद्ध । यांना सेवणें धर्म शुद्ध ॥
श्रीविष्णु पुराण प्रसिद्ध । त्याचें त्यालाच अर्पावें ॥९०॥



वेदपुरुष श्रीभगवान । पृथुरूपें अवतरून ॥
करी चरित्रें ती गाऊन । लोक तरती सदोदित ॥९१॥

परस्परांचा सहकार । देव-नर-यज्ञ सुंदर ॥
पृथु यज्ञास नमस्कार । सदत्त विष्णु कृपाकरी ॥९२॥

प्रियव्रत राजवंशांत । ऋषभदेव नाभिसुत ॥
महाविष्णु अवतरत । बोध करिती लोकहिता ॥९३॥

जगन्निवास परमेश्वर । सर्व घडवी निरंतर ॥
त्याला करावा नमस्कार । देह सौख्य न गणावें ॥९४॥

पुत्र शिष्य प्रजाजन । यांना सांगावें समजावून ॥
नकळतांही प्रेम धरून । सत्त्वगुणानें रक्षावें ॥९५॥

शमदम वेदपालन । सत्य अनुग्रह तप महान ॥
सहनशीलता सत्त्वजीवन । अनुभवी गुण विप्रांचे ॥९६॥

त्यांना करावा नमस्कार । मग मी संतुष्ट ईश्वर ॥
आत्मस्वरूप सत्य सुंदर । इतर सर्व अशाश्वत ॥९७॥

देव कार्य देवा अर्पण । करून असक्त हवें मन ॥
सर्व कांहीं श्रीभगवान । त्याला अखंड भजावें ॥९८॥

नवनारायण ऋषभसुत । लोकोद्धार नाथ बनत ॥
प्राचीन तत्त्व अनुसरत । मुक्तचंदा उपदेशिती ॥९९॥

ऋषभ पृथु नाथ दत्त । सर्वां जोडून दोन्ही हात ॥
बत्तीसावा अध्याय अर्पित । श्रीदत्त घेती लोकहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय ३३ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:।।

ऋषभपुत्र भरत ज्येष्ठ । जंबुद्वीपीं भूपति श्रेष्ठ ।।
होतसे त्याची कीर्ती वरिष्ठ । भारत नाम या देशा ।।१।।

संकर्षणसूर्य भूसंबंध । अनादि नित्य स्वयंसिद्ध ।।
त्रिणाभि देश प्रसिद्ध । सूर्यकिरण लंब येती ।।२।।

उत्तरायण दक्षिणायन । यांचा मध्य विषुवदिन ।।
लंबकिरण वृत्तें तीन । या तीन नाभि पृथ्वीच्या ।।३।।

स्वयंसिद्ध म्हणून अज । नाभिप्रदेशीं भारत निज ।।
मेरूखालीं असे सहज । अजनाभ नाम प्राचीन ।।४।।

नाभिप्रदेशाचे वर । मेरू पर्वत पाठार ।।
त्याचेखालून निरंतर । नभीं सूर्यमार्ग दिसे ।।५।।

मेरूपाठार उत्तरेस । प्राचीन वस्ती बहुवस ।।
त्यामुळे सदा दक्षिणेस । तेथून सविता दिसतसे ।।६।।

रवि चालतां नभांतरीं । दिसे प्रदक्षिणा मेरूस करी ।।
पर्वतशिखरें पृथ्वीवरी । उंच पामीरपठारीं ।।७।।

जेव्हां उत्तरायण संपत । उत्तुंग आदित्य आकाशांत ।।
त्या नाभीच्या भूवलयांत । उंच पर्वत येत पूर्वीं ।।८।।

म्हणून त्याला मेरू पर्वत । प्राचीनकाळीं लोक वदत ।।
या नाभीचा प्रदेश तूर्त । उत्तर भारतीं येतसे ।।९।।

गंगा यमूना सरस्वती । सिंधु, पश्चिम सरस्वती ।।
भारता जीवन अर्पिती । समृद्ध करिती सदैव ।।१०।।

पूर्वपश्चिम सरस्वती । यांचे प्रवाह गुप्त होती ।।
हिमालयीं मेरूपर्वतीं । देवता वसती अखंड ।।११।।

मानवांसम जडशरीर । धरिती केव्हां केव्हां अमर ।।
परंतु त्यांचें दिव्यशरीर । जडातीत सदा असे ।।१२।।



मेरू हिमालयांत दत्त । ऋषिमुनी योगी देव संत ।।
सकळां विनम्र प्रणिपात । भारत आवडे सर्वांना ।।१३।।

सूर्यकिरणीं आत्मशक्ति । विलसते पृथ्वीवरती ।।
तेथें नर स्वतंत्र नसती । सूत्रचालक परमात्मा ।।१४।।

म्हणून गर्व मनीं नसावा । ईश्वरलीला खेळ लक्षावा ।।
स्वत: सम अन्य मानावा । माणुसकीनें वागावें ।।१५।।

स्वत:चे कर्तव्यकर्म । करणें हें आपुलें काम ।।
बरें वाईट सकळ कर्म । ब्रह्माचें ब्रह्मास अर्पावें ।।१६।।

कर्मफल कसें कोणतें । कोणास केव्हां प्राप्त होतें ।।
भक्तपाप धुपून जातें । त्याच्याकडे सर्व सत्ता ।।१७।।

म्हणून त्याला शरण जावें । कुठें मना न गुंतवावें ।।
हरिचरण आठवावे । प्रपंचीं संतुष्ट रहावें ।।१८।।

भरतराजा ईश्वरभक्त । राज्य करितां झाला विरक्त ।।
दूर जाऊन लावी चित्त । हरिचरणीं सर्वदा ।।१९।।

परंतु देह सोडतांना । मृगबाळाची दया मना ।।
ग्रासी म्हणून विधिघटना । मृगजन्म त्या देतसे ।।२०।।

हरिभक्ति देतसे ज्ञान । हरिण योनीही सावधान ।।
राहून टाकिली भोगून । पूर्ण आसक्त नारायणा ।।२१।।

मृगशरीर गळतांना । नरवाणीनें करी प्रार्थना ।।
सर्वांतर्यामी दयाघना । तूला माझा नमस्कार ।।२२।।

नंतर आला विप्रजन्म । परंतु सर्वदा निष्काम ।।
अंतरीं ज्ञानें जाणून मर्म । पिशा समान वागतसे ।।२३।।

आप्तस्वकीय अन्यजन । त्याचा करिती अपमान ।।
परी गुणातीतजीवन । त्याचें सहज चालतसे ।।२४।।

चोर बळी देण्यास नेती । कोपे भद्रकाळी भगवती ।।
भरता सोडून चोरांप्रती । देवी मर्दी कठोरपणें ।।२५।।



पालखीस भोई म्हणून । रहूगण भूपें लावून ।।
करितां उर्मट वर्तन । भाग्य त्याचें प्रकाशलें ।।२६।।

सिंधुभूपति रहूगण । भरता घाली लोटांगण ।।
म्हणे कृपा करावी पूर्ण । भरतमुनी उद्धरी त्या ।।२७।।

सकळ असे अशाश्वत । हरिभक्तांचे संगतींत ।।
हरिकथांनीं शुद्धचित्त । होऊन लाभे दृढभक्ति ।।२८।।

ब्रह्म म्हणजे वासुदेव । त्याचेपदीं अखंड भाव ।।
ठेवितां जीव होतसे शिव । असक्त असावें संसारीं ।।२९।।

भरतबंधु नवनारायण । निवारिती कष्ट दारुण ।।
त्यांचें प्रेमळ आचरण । भरतनाथ कृपाळू ।।३०।।

ऋषभ विष्णुअवतार । जडभरत मुनीश्वर ।।
त्यांपासून भारत अमर । नांव पावे मनोरम ।।३१।।

भारतीं जन्म इच्छिती देव । सर्वगुरु श्रीदत्तदेव ।।
सर्व एकच वासुदेव । सर्वां नमस्कार असो ।।३२।।

गोपीचंद करी प्रयाण । प्रजेचें विविध भाषण ।।
परी सर्वांचें अंत:करण । प्रेमें असे राजावर ।।३३।।

जेथें जेथें करी गमन । तेथें तेथें प्रजा लीन ।।
राजा सांगे मनापासून । ईशभक्ति करून तरा ।।३४।।

पुढें कौलबंगाल लागत । पौलपट्टणीं राजधानींत ।।
पाणवठ्यावरी बैसत । ईशगुण गात प्रेमानें ।।३५।।

भगिनीदास ओळखती । राजकुटुंबीं दिली माहिती ।।
तेथें टिळकचंद नृपति । चंपावती सून त्याची ।।३६।।

तीच गोपीचंद बहीण । भाऊ जोगी झाला म्हणून ।।
निंदा फार गृहीं ऐकून । तिचे कान किटती सदा ।।३७।।

राजा म्हणे द्यावें भोजन । अश्वशाळेंत बोलावून ।।
चंपावतीस भेटवून । पाठवा परत माघारा ।।३८।।

मग दासी जाऊन सांगती । बोलावी भगिनी चंपावती ॥
गोपीचंद मनीं म्हणती । कोण बहीण, पण गेले ॥३९॥

अश्वशाळेंत बसवून । दासी म्हणती करा भोजन ॥
मग दाखवूं इथे आणून । तव भगिनी चंपावती ॥४०॥

गिळून मानापमान । गोपीचंद उरकी भोजन ॥
त्याच्याकडे गवाक्षांतून । राजकुटुंब पाहतसे ॥४१॥

आणि केली खूप टवाळी । सासुरवासी सून विटली ॥
वेगें स्वमहालीं धांवली । खंजीर भोसकी पोटांत ॥४२॥

अश्वशाळेंत न्यावयासी । इतक्यांत पातल्या दासी ॥
पाहून तिच्या त्या प्रेतासी । रडारड त्या करिती ॥४३॥

त्वरें फांकलें वर्तमान । नानाप्रकारें बोलती जन ॥
गोपीचंद वदे वचन । माझ्यासाठीं मरण नको ॥४४॥

सांगे स्मशानांत जाऊन । मी हिला जिवंत करीन ॥
हिचा हात द्या काढून । जाऊन येतों गुरूकडे ॥४५॥

प्रेत राखावें तोंपर्यंत । आणि प्रेताकडे बैसत ॥
टिळकचंद खवळत । क्रोधें खोंचून बोलला ॥४६॥

ठीक आहे, कर जिवंत । हात घेऊन राजा निघत ॥
पीडा गेली असें म्हणत । जाळिलें प्रेत सत्वर ॥४७॥

हा सर्व प्रसंग जाणून । जालिंदर नाथ निघून ॥
येती मार्गांत कवळून । प्रेमें भेटती गोपीचंदा ॥४८॥

गुरुशिष्य दोघे निघून । राज्यीं पातले त्यां पाहून ॥
टिळकचंद करी नमन । नाथ आशीर्वाद देती ॥४९॥

संजीवनीमंत्र जपून । हातावर भस्म घालून ॥
जिवंत केली नाथें सून । पहातां भूपति शरमला ॥५०॥

वारंवार करी नमन । म्हणे अपराधी महान ॥
परंतु आपण दयाघन । क्षमा करून सांभाळा ॥५१॥



सगळा आनंदप्रसंग । दुष्ट जनांची जिरे रग ॥
राजैश्वर्ये उत्सव मग । अपार झाला त्याकाळीं ॥५२॥

नाथ वदती आशीर्वचन । सुखी व्हावे संपूर्ण जन ॥
अशाश्वत देह जाणून । ईशस्मरण भावें करा ॥५३॥

गोपीचंद नाथ बनून । बद्रिकाश्रमीं करी गमन ॥
जनकल्याणा तप करून । चिरंजीव बनेल तो ॥५४॥

त्याचा पुत्र मुक्तचंद । राजा असे करा आनंद ॥
ऐकून डोले टिकळचंद । जालिंदर कृपा करिती ॥५५॥

टिळकचंद प्रजाजन । म्हणती नाथा धन्य धन्य ॥
नाथबोधानुसार वर्तन । करून सुखी जाहले ॥५६॥

गोपीचंद जात निघून । चिरायु होत तप करून ॥
जालिंदर गुरु गमन । करिती लोकहितार्थ ॥५७॥

गुरुजीनाथ गोपीचंद । करिती सर्वत्र आनंद ॥
त्यांना नमुया परमानंद । देती दयाळू थोर ते ॥५८॥

आतां मागील अवधान । कानिफा गोरक्ष भेटून ॥
गुरुशोधा जात निघुन । स्त्रीराज्य सीमे पातला ॥५९॥

परी म्हणत मनामाजी । मच्छिंद्र रंगले स्त्रीराज्यीं ॥
ओळख न दाविती माझी । किंवा घात करतील ॥६०॥

म्हणून वेष पालटून । तिकडे करावें गमन ॥
गुरुजींसाठीं माझें मन । एकसारखें उचंबळतें ॥६१॥

गोरक्षा जाणती हनुमंत । आणि प्रतिकार करीत ॥
गोरक्ष मंत्रावळी जपत । रक्षण करण्या आपुलें ॥६२॥

मारुतीचें कांहीं न चाले । श्रीरामाचें स्तवन केलें ॥
रामप्रभु सांगूं लागले । नाथही भक्त माझेच ॥६३॥

गोरक्ष नेईल गुरूस । तुझें वचन पाळिलेंस ॥
पुत्र झाला मैनाकिनीस । नाथा युद्ध न करावें ॥६४॥



श्रीरामासह हनुमंत । गोरक्षाला दर्शन देत ॥
नाथें नमितां ते वदत । आशीर्वचन प्रेमानें ॥६५॥

मग गुप्तपणें मारुती । मैनकिनीस सांगे माहिती ॥
येतसे गोरक्षनाथ जती । नेईल मच्छिंद्रा सावध ॥६६॥

राणी होतसे चिंताक्रांत । म्हणे उपाय नाहीं सुचत ॥
इकडे गोरक्षा दिसत । वेश्या निघाली स्त्रीराज्यीं ॥६७॥

राजसभेंत नृत्यगायन । करून मिळवावें धन ॥
म्हणून संचासह गमन । करी कलिंग वेश्या ती ॥६८॥

गोरक्ष भेटून सांगत । माझें काम स्त्रीराज्यांत ॥
गायन वादन मला येत । तरी न्यावें तुमच्यासह ॥६९॥

तें ऐकून वेश्या म्हणाली । दाखव मला कला सगळी ॥
गोरक्षें जपून मंत्रावळी । भस्म लावून गातसे ॥७०॥

गायन वादन ऐकून । वृक्ष घोडे होत तल्लीन ॥
सूरही निघती त्यांतून । वेश्या थक्क सहजची ॥७१॥

याचेमुळें लाभ अपार । होईल, जाणून उत्तर ॥
वेश्या सांगे चल सत्वर । श्रृंगमुरुडीं पोंचती ॥७२॥

वर्दी दिली दरबारांत । आपली किर्ति ऐकून येत ॥
त्यांना ठरवून मिळत । दिवस नृत्यगायनाचा ॥७३॥

गोरक्ष म्हणे मला न्यावें । ती म्हणे पुरुषा न न्यावें ॥
स्त्रीवेष घेऊन स्वभावें । नाथ जातसे तिच्यासह ॥७४॥

राज सभेंत सर्व मंडळी । आपापल्या स्थानीं बसली ॥
सिंहासनीं गुरुमाउली । पाहून मनीं नमी शिष्य ॥७५॥

वाद्य वाजवी गोरक्षनारी । सभा गुंगली ऐकून सारी ॥
मच्छिंद्रनाथ अस्वस्थ भारी । सूर ऐकून वाद्याचें ॥७६॥

चलो मच्छिंदर गोरख येत । शिष्यपरीक्षा गुरुजी घेत ॥
त्याच गुरूचा शिष्य पहात । त्यांना नमस्कार असो ॥७७॥

मच्छिंद्र सांगे मैनाकिनीस । ऐकावे वाद्यसूर विशेष ॥
उभय म्हणती येथें वास । करी निश्चिंत गोरक्ष ॥७८॥

कलिंग वेश्येला सांगत । तुझीं वाद्यें छान असत ॥
परंतु आम्हांकडे असत । तीं घेऊन वाजवावीं ॥७९॥

गोरक्षनारी त्यांमधून । सूर काढी पूर्वी समान ॥
नादलहरी त्या ऐकून । सांगती सखी चांगली ॥८०॥

आतां वाजव दुसरीकडून । दुसरीही वाजवी छान ॥
पण सूचकसूर त्यांतून । पूर्वीप्रमाणें न येती ॥८१॥

कलिंग वेश्येचा गौरव । करिती दावून सद्भाव ॥
ओळखून गोरक्ष भाव । राणी पुसे एकीकडे ॥८२॥

फिटली शंका गोरक्षनाथ । नमी सद्गुरुपद समर्थ ॥
गहिंवरून दोन्ही नाथ । भेटती प्रेमें एकमेकां ॥८३॥

गोरक्षा तपा बसवून । मछिंद्र करिती तीर्थाटन ॥
कथी शिष्या तेथपासून । गोरक्षही सर्व सांगे ॥८४॥

मैनाकिनी करी आदर । गुरुशिष्य तोषती फार ॥
राणी म्हणे न जावें दूर । येथेंच दोघांनी रहावें ॥८५॥

आधींच असे तें स्त्रीराज्य । स्वागतासिद्ध राजैश्वर्य ॥
परी मनांत लोककार्य । विरक्त गोरक्ष पूर्णपणें ॥८६॥

म्हणे गुरो माझी परीक्षा । पुरे, आपण दिलीत दीक्षा ॥
मागावी जगीं सर्वदा भिक्षा । आणि यात्रा कराव्या ॥८७॥

लोकांलागीं सुख मिळावें । भक्तिमार्गा जन लावावे ॥
नाथपंथ कार्य करावें । तरी चलावें लवकर ॥८८॥

मच्छिंद्रनाथ मैनाकिनीला । सांगती पुरे सुख सोहळा ॥
आम्ही जाणार स्वकार्याला । मारुति-वचन पूर्ण झालें ॥८९॥

ऐकून झाली ती हिंपुटी । प्रजाजन दिसती कष्टी ॥
म्हणती गोरक्ष खटनटी । कोठून येथेंच पातला ॥९०॥



राणी सांगे मागील वृत्त । उपरीचरवसूला हंसत ॥
त्याच्या शापानें इकडे येत । सिंहलद्वीपीं मी होतें ॥९१॥

पश्चात्तापें प्रार्थना केली । उःशापवाणी लाभे भली ॥
मागील राणी वृद्ध झाली । वारस ठरवी युक्तीनें ॥९२॥

गजशुंडीं माळ दिधली । तीच माझ्या गळीं पडली ॥
किळोतळा राणी वारली । स्त्रीराज्य मला मिळालें ॥९३॥

मग तीव्रतप करुन । हनुमंत मला प्रसन्न ॥
त्यांचें मिळालें वरदान । आपुले चरण लाभले ॥९४॥

संगतीचा घडे वियोग । जाणितें सर्वही प्रसंग ॥
परी चित्त होत दुभंग । नाथा सुकृपा करावी ॥९५॥

मैनाकिनी अपार रडे । पाही नाथाच्या मुखाकडे ॥
मच्छिंद्र सांगती अगे वेडे । विचार करून वागावें ॥९६॥

ती म्हणे सिंहलद्वीपांत । मी जाणार सांभाळा सुत ॥
जावें मीननाथासहित । तयारी करून देतसे ॥९७॥

नाथपदीं शिर ठेविलें । आणि तिघांसी बोळविलें ॥
स्त्रीराज्यलोक रडूं लागले । नाथ आशीर्वाद देती ॥९८॥

सर्व घडवी जगन्नाथ । माना जगीं देव समर्थ ॥
नका घालवूं काळ व्यर्थ । आणि निघाले यात्रेला ॥९९॥

सर्वां असो भावें नमन । दत्ता तव लीला गहन ॥
तेहतिसावा अध्याय पूर्ण । श्रीदत्तार्पण लोकहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ३४ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः॥

मैनकिनी नाथा सांगत । येथून भिक्षा न्यावी सतत ॥
गोरक्ष तिजला सांगत । दुपारीं झोळी येईल ॥१॥

ती भरून देत जावी । तशी सिद्धता राणी ठेवी ॥
गोरक्ष मंत्रवून बरवी । झोळी धाडी राणीकडे ॥२॥

भिक्षा घेऊन झोळी येई । श्रीदत्त सह्यपर्वतीं पाही ॥
तेथेंच झोळी पडून राही । इकडे गोरक्ष चिंतावती ॥३॥

गोरक्षनाथ तेथें येती । श्रीदत्तमहिमा न जाणती ॥
दत्तासह विवाद करिती । आणि हरती सत्वर ॥४॥

मच्छिंद्रनाथ हें जाणून । येऊन करिती दत्तां नमन ॥
गोरक्षा सांगती वचन । अत्रिसुत हा दत्त असे ॥५॥

सर्व सोडून अभिमान । त्याला कर आधीं नमन ॥
मग होईल समाधान । गोरक्ष लीन दत्तपदीं ॥६॥

दत्त देती आशीर्वचन । मंत्रबळें तारावे जन ॥
सर्वदा निरिच्छ राहून । जनकल्याण करावें ॥७॥

दत्तांचा आशीर्वाद घेऊन । पुढें चाललें तीर्थाटन ॥
हेलापट्टणीं ते जाऊन । दंडूं इच्छिती गोपीचंदा ॥८॥

मैनावती करी स्वागत । मुक्तचंद भावें नमित ॥
वर्तमान जाणून घेत । नाथ आशीर्वाद देती ॥९॥

मैनावतीस मच्छिंद्र सांगती । श्रीदत्त मला उपदेशिती ॥
मग जालिंदरा बोधिती । धाकटा बंधु जालिंदर ॥१०॥

स्वस्ति सांगून पुढें जाती । श्रीजगन्नाथ क्षेत्राप्रती ॥
यथाचार तिथे करिती । सर्वां नमन प्रेमभरें ॥११॥

मैनाकिनीस स्त्रीराज्यांत । उपरिचरवसु भेटत ॥
तिला शांतवून सांगत । मग संशय न राहिला ॥१२॥

दैर्भामा तिचे दासीप्रती । नीतिन्याय सर्व सांगती ॥
तिला सकळ राज्य देती । जाती सिंहलद्वीपांत ॥१३॥

मैनाकिनीचें तेथें स्थान । मच्छिंद्रा मनीं आठवून ॥
राहातसे तिला सांगून । वसु गेले स्वस्थानाकडे ॥१४॥

जगथाथक्षेत्रीं राहून । नाथ पुढें करिती गमन ॥
एका गांवीं वस्ती करून । राहिले नित्याप्रमाणें ॥१५॥

गोरक्ष भिक्षेसाठीं गेले । मीननाथ बाळ झोंपलें ॥
त्यासी उठवून पोंचविलें । नाथें शौच करावया ॥१६॥

इतक्यांत गोरक्ष येत । मच्छिंद्रनाथ त्या सांगत॥
मीननाथ शौच करीत । त्यास धुवून आणावें ॥१७॥

गोरक्ष गेले नदीवर । बाजारीं जाती गुरुवर ॥
नश्वर जाणून शरीर । कुमारा गोरक्ष धूतसे ॥१८॥

वस्त्रासमान आपटून । अंतर्बाह्य मळ काढून ॥
मांसादिक जळीं फेंकून । कातडें वाळत घातलें ॥१९॥

शांभवी गांजा गुरु आणिती । शिष्या बाळ कोठें पुसती ॥
गोरक्ष सांगे केली स्थिति । गुरु शोकांत बुडाले ॥२०॥

गोरक्षें भारली विभूती । बाळ चर्मावरी टाकीती ॥
मीननाथ हांक मारिती । पितापुत्र भेट झाली ॥२१॥

मच्छिंद्रनाथ थोर ज्ञानी । परी गोरक्षाची करणी ॥
पहाती वेड पांघरूनी । शिष्य कच्चा पक्का कसा ॥२२॥

असो मग ते पुढें जाती । गोदासमुद्रसंगम क्षेत्रीं ॥
तीर्थाचार करून निघती । परळीं वैजनाथ क्षेत्रा ॥२३॥

अरण्य थोर मिळे वाटेंत । काननीं भिल्लादि रहात ॥
भय वाटे गुरु म्हणत । शिष्य मुकाट चालतसे ॥२४॥

निर्झर लागला वाटेंत । गुरुजी शौचास थांबत ॥
झोळी शिष्याकडे देत । आणि सांगतीं जापुढें ॥२५॥



झोळी जड फार लागली । आंत कनकवीट दिसली ॥
मैनाकिनीनें गुप्त ठेविली । नसे माहित शिष्याला ॥२६॥

धोंडा ठेवी वीट टाकून । गोरक्ष करी पुढें गमन ॥
औदुंबर वृक्ष पावन । व पाणी पाहून थांबला ॥२७॥

मीननाथसहित स्नान । करी उरकी जप ध्यान ॥
गुरुजीही मग येऊन । नित्यकर्म आचरितीं ॥२८॥

गुरु म्हणतीं पुढें रान । भीतीप्रद दिसे महान ॥
गोरक्ष म्हणे जडाधीन । मना भीति दिसतसे ॥२९॥

मग सांगती नाथगुरुजी । सुवर्णवीट झोळीमाजी ॥
शिष्य म्हणे अहो गुरुजी । भय मागेंच राहिला ॥३०॥

तेथें गर्भगिरी पर्वत । पाहून पुढें तिघे निघत ॥
पाषाण दिसला झोळींत । गुरुशोक अपार दिसे ॥३१॥

गोरक्ष करी समजूत । मच्छिंद्रनाथ त्या सांगत ॥
स्त्रीराज्यांतून आणीत । वीट जपून ठेविली ॥३२॥

गुरुजींचा हात धरून । शिष्य गेला गिरी चढून ॥
मूत्र करी तेथें गहन । मंत्र जपून सिद्धीचा ॥३३॥

सोन्याचें मग झालें शिखर । सांगे घ्यावें सोनें अपार ॥
गुरु म्हणती तूं शिष्य थोर । मला सुर्वण मुळीं नको ॥३४॥

शिष्य गुरुलागीं पुसत । कशासाठी वीट झोळींत ॥
गुरुजी सांगती साधुसंत । पूजनभोजन इच्छितों ॥३५॥

गोरक्षशिष्य आनंदून । म्हणे करितों इच्छेसमान ॥
गंधर्वराजा चित्रसेन । मंत्रें बोलावी सत्वर ॥३६॥

येऊन पुसे चित्रसेन । काय कामना इच्छी मन ॥
येस म्हणे पूजा भोजन । द्यावें म्हणतों देवादिकां ॥३७॥

तरी धाडीं सगळीकडे । इतर गंधर्वां रोकडे ॥
बोलावून सर्वां इकडे । घेऊन यावें त्वरेनें ॥३८॥



त्यापरी चित्रसेनें केलें । साधु गुप्त प्रकट सगळे ॥
देव सिद्ध महर्षि आले । त्यांना नमन प्रेमभरें ॥३९॥

परस्पर गोष्टी करिती । आपापल्या स्थानीं बसती ॥
त्यांचा आदर नाथ करिती । दत्त लक्षिती सानंदें ॥४०॥

गोरक्ष अष्टसिद्धी आणी । सांगे करा पक्वान्नें झणीं ॥
साधुसंत अमर मुनी । षडरस अन्नें जेवणार ॥४१॥

सडासंमार्जन करावया । बोलाविल्या त्यानें सटव्या ॥
प्राणी जन्मल्यानंतर या । वाचिती विधिअक्षरें ॥४२॥

मानव पशुपक्षी जलचर । सर्वांच्या सटव्या सत्वर ॥
येऊन स्वकाम तत्पर । राहून करिती आदरें ॥४३॥

जलदेवता नव आणून । सांगे वाढा पात्रीं अन्न ॥
गंधर्वीं करणें पाचारण । समाचारिती अष्टवसु ॥४४॥

अष्टदिशांना अष्टभैरव । पहारा करिती सदैव ॥
प्रदक्षिणा करून गुरुदेव । मच्छिंद्र प्रार्थिती सर्वांना ॥४५॥

गुरुजनक उपरीचर । वांटिती दक्षिणा भरपूर ॥
चित्रसेन गंधर्व सुंदर । तांबूल सर्वां देतसे ॥४६॥

गंगादि तीर्थे पुरवून पाणी । उष्टावळी काढिती तत्क्षणीं ॥
किन्नर अप्सरांचे गायनीं । संतोष झाला अपार ॥४७॥

महानुभाव उमापती । सर्वांचा सन्मान करिती ॥
वर्णन करावें किती किती । कर जुळती आनंदें ॥४८॥

मधुब्राह्मणा बोलावून । नाथ आणिती बाळ गहन ॥
नारायण करभाजन । अवतार देखिला सर्वांनीं ॥४९॥

शंकर सांगती गोरक्षसी । हा शिष्य योग्य तुजसी ॥
याला आतांच उपदेशीं । गोरक्ष करिती तसेंच ॥५०॥

ब्रह्मरूप गहिनीनाथ । गोरक्षनाथ गुरुसमर्थ ॥
मोक्ष पुरुषार्थ चतुर्थ । क्षणांत पूर्ण कृपाहस्तें ॥५१॥

एकमास उत्सव होत । सर्वांसी आनंद बहुत ॥
कुबेरा गोरक्ष सांगत । सुवर्णगिरी मोल ध्यावें ॥५२॥

कराया गौरव आणणें । अनुरूप सर्वां भूषणें ॥
कुबेर देई त्याप्रमाणें । कनकगिरी न घेतां ॥५३॥

नाथ करिती नमस्कार । अपूर्व जाहला सत्कार ॥
सर्व संतोषले अपार । स्वस्ति सांगून निघाले ॥५४॥

पद्मिनीमैनाकिनी वृत्त । उपरिचर नाथा सांगत ॥
तिच्याकडे धाडून देत । मीननाथा मच्छिंदर ॥५५॥

वसु त्याला घेऊन जात । मैनाकिनीपाशीं देत ॥
तिला कथी सकळवृत्त । अैकतां आनंदी जाहली ॥५६॥

स्वस्थानीं गेले उपरीचर । गर्भागिरी हेमशिखर ॥
अदृश्य अस्त्र त्याचेवर । कुबेर घाली नाथाज्ञें ॥५७॥

धनपति स्वठायीं जात । मच्छिंद्र तपा तेथें रहात ॥
त्यांना नमून शिष्य निघत । गोरक्षनाथ तीर्थाटना ॥५८॥

नाथांची करणी गहन । त्यांना असो सदा नमन ॥
सर्वस्वरूपी दयाघन । भगवंता नमन असो ॥५९॥

गर्भगिरी पर्वतावर । नाथां भजती नाना नर ॥
त्यांना दिसती चमत्कार । क्लेश हरून सुखी होती ॥६०॥

गोरक्ष आणि इतर नाथ । अंश रूपानें समाधिस्थ ॥
पुरवून चारी पुरुषार्थ । लोकोद्धार करिताती ॥६१॥

नाथपंथी साधु अमित । भक्तिमार्गी प्रसिद्ध संत ॥
सर्व अेक श्रीगुरुदत्त । त्यांना नमन नम्रपणें ॥६२॥

मंदर पर्वतगुहेंत । दीर्घकाळचें सूर्यरेत ॥
त्यांत द्रुमिल अवतरत । भर्तरीनाथ प्रसिद्ध ॥६३॥

तेथें एक सवत्सहरिणी । बाळा पाजी लहानपणीं ॥
मनुष्य नाहीं तेथें कोणी । ईश्वर रक्षी बाळका ॥६४॥



जन्मच झाला त्याचा रानीं । वन्य पशूंच्या भाषा जाणी ॥
हरिणीसह फिरे अरण्यीं । एकदां रस्ता लागला ॥६५॥

त्यावेळीं जयसिंग भाट । त्या वाटेनें जातां भेट ॥
होतां म्हणे चुकलें वाट । बाळ चांगलें कोणाचें ॥६६॥

त्याची पत्नी  रेणुका म्हणे । बाळ दिसतें गोजिरवाणें ॥
नेऊन ज्यांचें त्यांना देणें । गवसल्या मातापिता त्याचे ॥६७॥

बाळा आणितां ती हरिणी । हैराण झाली आरंबळोनी ॥
बाळ तसेंच वळवळूनी । हरिणीपरी ओरडे ॥६८॥

जयसिंगरेणुका प्रेमळ । त्यांना नव्हतें मूलबाळ ॥
भिक्षान्न सेवून सदाकाळ । काशीत गेलीं बाळासह ॥६९॥

काशीविश्वनाथदर्शन । होतां शब्द पिंडीमधून ॥
ये ये भर्तरी तो ऐकून । डोले जयसिंग आश्चर्यें ॥७०॥

म्हणती बाळ अवतारी । शंभुकृपा दिसे अपारी ॥
विश्वेशा नमस्कार करी । आनंदें काशींत राहिलीं ॥७१॥

मुलां जमवी भर्तरीबाळ । सदा चालवी नाना खेळ ॥
लुटुपुटूचा राजखेळ । राजा भर्तरी होतसे ॥७२॥

लटक्या घोड्यावर बसे । हो हो म्हणून धांवतसे ॥
मुलांसह तो पळतसे । रानापाशीं पोंचला ॥७३॥

तेथे ठेंच लागली त्यासी । मूर्च्छित पडे भूतळासीं ॥
मुलें पळालीं सोडून त्यासी । म्हणती भूत होणार तो ॥७४॥

बाळा पाहून निचेष्टित । पुत्र प्रेमें भास्कर येत ॥
मित्रावरुणी वीर्यसुत । सावध झाला पूर्वीसम ॥७५॥

सूर्य ब्राह्मण घरीं पोंचवी । रेणुकामाता उपकार दावी ॥
गोडवाणी वदे बरवी । ऐकून रवि तोषला ॥७६॥

आणि तिला सर्व सांगत । पूर्वी घडली जी जी मात ॥
माझाच हा पुत्र असत । तुम्ही पाळा तया लागीं ॥७७॥



दिनदैवत संतोषून । देतसे प्रेमें आशीर्वचन ॥
बाळासह माता नमन । वारंवार भावें करी ॥७८॥

मित्र-ब्राह्मण झाला गुप्त । जयसिंग बाहेरून येत ॥
ऐकून वृत्त इत्यंभूत । देवा स्वविती अत्यादरें ॥७९॥

कांहीं वर्षें वास काशींत । सोळा वर्षें बाळास होत ॥
त्याचें लग्न कराया निघत । माळवा देशीं आपुल्या ॥८०॥

वाटेंत त्यांना लुबाडून । चोर गेले द्रव्य घेऊन ॥
जयसिंगाचा घेतां प्राण । पतिप्रेमें पत्नी मरे ॥८१॥

भर्तरी बाळ शोक करीत । मातापित्यास अग्नि देत ॥
इतक्यांत त्यामागें येत । व्यापारी तांडा बैलांसह ॥८२॥

भर्तरीस समजावून । दिलें त्यासी प्रेमें भोजन ॥
घेती आपणांकडून ठेवून । व्यापारी दयाळू थोर ते ॥८३॥

भर्तरी तयांसवें जाय । करी उत्तम व्यवसाय ॥
त्यामुळें त्यांना संतोष होय । अवंतीकडे ते चालले ॥८४॥

रात्रीं जेथें वस्तीस राहिले । तेथें जंबूक ओरडले ॥
त्याचा अर्थ भर्तरी बोले । चोर येणार सत्वर ॥८५॥

व्यापारी सावध राहिले । चोरही सवेग पातले ॥
व्यापारी जागृत सगळे । चोर हल्ला परतविती ॥८६॥

ही मध्यरात्रीं झाली मात । पहांटे कोल्हे ओरडत ॥
भर्तरी अर्थ सांगत । अैक तेथील रक्षकही ॥८७॥

एक राक्षस शाप पावून । इकडे उत्तरेकडून ॥
येतसे नररूप धरुन । त्याकडे चार दिव्य रत्नें ॥८८॥

त्याला मारून रत्नें घेत । तो होईल राजा खचित ॥
तसा मग पांथस्थ येत । त्याला रक्षकें मारिलें ॥८९॥

रत्नेंही मिळालीं सुंदर । उद्धरे तो राक्षस नर ॥
चित्रमा गंधर्व सत्वर । बनून गेला स्वर्गासी ॥९०॥

त्यासी पूर्वी शाप होत । एकदां शिवदर्शना जात ॥
भवानीशंकरा नमीत । त्यांनीं जवळ बसविलें ॥९१॥

शिवगौरीचा खेळ चालला । डाव पडला पार्वतीला ॥
परी तेथें संशय आला । चित्रमाला तीं पुसती ॥९२॥

गंधर्व म्हणे शिवडाव । पण तो होता उमाडाव ॥
मोह पावला तो गंधर्व । पार्वती शापी तयासी ॥९३॥

म्हणे मिळेल दैत्ययोनी । चित्रमा जोडी हात दोन्ही ॥
प्रार्थना करी विनवोनी । उ:शाप देई दयाळे ॥९४॥

उ:शाप त्यासी मिळाला । विक्रम जेव्हां मारी तुजला ॥
तेव्हां येशील पूर्वस्थळा । तसेंच विक्रमें मारिलें ॥९५॥

एकदां इंद्राच्या सभेंत । अप्सरा उत्तम नाचत ॥
सुरोचन गंधर्व भुलत । आलिंगी त्वरें अप्सरेला ॥९६॥

इंद्र क्रोधें शाप वदत । गाढव हो मृत्यु लोकांत ॥
गंधर्वा पश्चात्ताप होत । प्रार्थी उ:शाप द्यावया ॥९७॥

देवेंद्र सांगे तुला सुत । विष्णुअंश विक्रम होत ॥
मग येशील तूं स्वर्गांत । गंधर्व खर जाहला ॥९८॥

मथुरापुरींत तो आला । भोगीतसे राजकन्येला ॥
तिला विक्रमपुत्र झाला । तोच अवंतिरक्षक ॥९९॥

दत्तकृपा नाथपंथास । कथा अतर्क्य बहुवस ॥
दत्तार्पण अध्याय चौतीस । भक्तां सौख्य दत्त देती ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ३५ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:॥

सुरोचन गंधर्व खर । पण त्या ज्ञान निरंतर ॥
प्रसंगीं धरी नरशरीर । पुन्हां गर्दभ होतसे ॥१॥

सत्यवर्मा मथुरापती । त्याची मुलगी सत्यवती ॥
गुप्तपणें या गदर्भाप्रती । दिली गंधर्व म्हणून ॥२॥

उज्जयिनीस दे धाडून । गुप्तपणें करी पालन ॥
तिकडे ती बाळंत होऊन । प्रसवे विक्रम शककर्ता ॥३॥

त्याला पाहून सुरोचन । गाढवयोनी दे टाकून ॥
दिव्यदेही गंधर्व होऊन । आशीर्वाद देतसे ॥४॥

सत्यवतीस देई वचन । तुझ्या इच्छेसम येईन ॥
आणि जात स्वर्गीं निघून । अनुभव घेई सत्यवती ॥५॥

नगरपालाची नोकरी । विष्णुअंश विक्रम करी ॥
भर्तरीवचनें दैत्या मारी । मिळवी चार दिव्य रत्नें ॥६॥

भर्तरीचें ज्ञान जाणून । गुप्तपणें व्यापाऱ्यांकडून ॥
विक्रम घेतसे त्या ठेवून । वागवी बंधूप्रमाणें ॥७॥

अवंतिभूप शुभविक्रम । त्याची मुलगी मनोरम ॥
सुमेधावती वर उत्तम । शोधून वरी विक्रमा ॥८॥

शुभविक्रमाचा प्रधान । स्वकन्या पिंगला अर्पून ॥
भर्तरीस जामात करून । सुखी होतसे रविकृपें ॥९॥

सत्यवर्मा मथुराधीश । सुरोचन गंधर्व विशेष ॥
उपस्थित राहून हर्ष । देती सकळां आनंदें ॥१०॥

पतीस पाही सत्यवती । विक्रम नमी पित्याप्रती ॥
पुष्पवृष्टि देव करिती । लग्न सोहळा अपूर्व तो ॥११॥

विक्रमपत्नी एकुलती । तशीच आई सत्यवती ॥
विक्रमा राज्यें दोन्ही मिळती । पुण्य प्रतापी विक्रम ॥१२॥



भर्तरीचे विलास फार ।शककर्ता विक्रम थोर ॥
राज्यही त्याचें समुद्रपार । अरबी कवि गुण गाती ॥१३॥

द्रुमिल नारायण भर्तरी । स्वकाम विसरे अंतरीं ॥
सूर्यपिता विचार करी । सांगे दत्ता नमून हें ॥१४॥

आदित्यासी सांगती दत्त । आहे तिकडे माझें चित्त ॥
एके दिवशीं भर्तरी जात । मृगयेसाठीं काननीं ॥१५॥

उष्मा होतसे तीव्र प्रखर । तृषाक्रांत भर्तरी फार ॥
पर्णकुटी व सरोवर । दत्त निर्मिती मायेनें ॥१६॥

भर्तरी उदकासाठीं येत । कोण कोठील दत्त पुसत ॥
जला स्पर्शूं नको म्हणत । राजा सचिंत जाहला ॥१७॥

सांगे सकळ वर्तमान । दत्त करिती त्याला प्रश्न ॥
कां आलासी अवतरून । दुर्लक्ष करिसी निजकार्या ॥१८॥

भर्तृहरी झाला हिंपुटी । म्हणे करीन खटपटी ॥
संतान नाहीं कांते पोटीं । तें अगोदर होऊं दे ॥१९॥

कासावीस फार होवोनी । सांगे द्या हो मजला पाणी ॥
दत्त घेती संकल्प करूनी । तप करीन बारा वर्षे ॥२०॥

पर्णकुटी व सरोवर । गुप्त झालें सर्व सत्वर ॥
दत्तकृपें दुसरें नीर । पिऊन सर्व तृप्त होती ॥२१॥

संतोषून नगरा जाती । भर्तरी भोगांत रंगती ॥
पिंगला दावी अतिप्रीती । परीक्षा भर्तरी योजी मनीं ॥२२॥

एकदा मृगयेस जाऊन । करी विपरीत वर्तन ॥
हरिणांची शिकार करून । रक्तांत भिजवी स्ववस्त्रें ॥२३॥

मुकुटासह दे धाडून । आणि सेवका सांगे वचन ॥
पिंगलेकडे दे नेऊन । व्याघ्रें मारिलें म्हणावें ॥२४॥

वस्त्रें मुकुट ओळखून । आकांत करिती स्त्रीजन ॥
मुख्य पिंगला प्राण सोडून । जातां दु:ख दुणावलें ॥२५॥

भर्तरी येतसे राज्यांत । पिंगलेवरी प्रेम अत्यंत ॥
जाऊन पाहीं स्मशानांत । तर ती पूर्ण जळाली ॥२६॥

मग तेथेच राही बसून । शोक करीत रात्रंदिन ॥
पिंगलेचे आठवी गुण । म्हणे पिंगला पिंगला ॥२७॥

सर्व करिती समजूत । पण भर्तरी तेंच म्हणत ॥
विक्रमही नित्य भेटत । परंतु उपाय चालेना ॥२८॥

द्वारकेंत कृष्ण वसती । गिरनारीं दत्त रहाती ॥
तेथून कृष्णलीला लक्षिती । प्राचीन स्थान दत्ताचें ॥२९॥

गोरक्ष तीर्थयात्रा करी । एकदां येतसे गिरनारीं ॥
दत्तप्रभूस नमस्कारी । स्वस्तिक्षेम दत्त वदती ॥३०॥

प्रेमें सांगती गोरक्षास । आशीर्वचन भर्तरीस ॥
पूर्वी दिलें त्या आणण्यास । जावें आतांच अवंतिला ॥३१॥

कांतेकरितां स्मशानांत । भर्तरी असें शोक करीत ॥
ऐकतां गोरक्ष त्वरित । दत्तां नमून निघतसे ॥३२॥

भर्तरीची स्थिति पाहून । नाथ म्हणती मूढ मन ॥
वळवावें युक्ति काढून । आणि मडकी आणिली ॥३३॥

ती घेऊन भूवरी पडे । मडकीचे झाले तुकडे ॥
गोरक्ष मग नाटकी रडे । मडकीसाठीं शोक करी ॥३४॥

भर्तरी हंसे हें पाहून । नाथा म्हणे शोक सोडून ॥
खुशाल असा मी देईन । तुम्हां मडक्या कितीतरी ॥३५॥

नाथ म्हणती मडकी बरी । उपयोगी ती नानापरी ॥
जशी राया तुझी सुंदरी । तशीच माझी ही मडकी ॥३६॥

माझी मडकी कशी मिळेल । पिंगला खूप मिळतील ॥
राजा म्हणे कोण देईल । नाथ सांगती देईन मी ॥३७॥

जर पिंगला मम देशील । तर ऐकेन तुझा मी बोल ॥
नाथ म्हणती भाक अढळ । दिल्यास पिंगला आणीन ॥३८॥



राजा देई नाथा वचन । नाथें मग मंत्र जपून ॥
पिंगला दावी खूप आणून । भर्तरी उल्हासे आनंदें ॥३९॥

पिंगला सांगे भर्तरीला । सतीधर्म मी आचरिला ॥
म्हणून गेलें सत्य सुखाला । दु:ख कदा तेथें नसे ॥४०॥

परत यावें संसारांत । तरी होणार देहपात ॥
यावें आपण सुखा शाश्वत । संसारसुखा न भुलावें ॥४१॥

आपला विचार ज्यापरी । तशी वागेन खरोखरी ॥
नाथ बळवंत अपारी । रूपें अमित हीं दिलीं ॥४२॥

पिंगलामुखींचे ते बोल । राजा ऐके गोड प्रेमळ ॥
भाग्याचे विचार तत्काळ । सुचून नाथा शरणागत ॥४३॥

सांगे आतां नको संसार । माझा करावा त्वरें उद्धार ॥
नाथ सांगती विचार कर । सांगे वृत्तांत मूळचा ॥४४॥

या घे बहु तुझ्या पिंगला । यांशीं करीं सुखसोहळा ॥
राया म्हणे हा गलबला । आतां नको मजलागीं ॥४५॥

अदृश्य कराव्या या पिंगला । आणि दाखवा दत्तपदांला ॥
भर्तरीसी भक्तिउमाळा । गोरक्षनाथ सुखावती ॥४६॥

पिंगला अदृश्य करून । निघती भर्तरीसह तेथून ॥
विक्रमाकडे त्वरें जाऊन । सर्ववृत्त सांगितलें ॥४७॥

विक्रमभूप आनंदती । परंतु भर्तरीभार्या रडती ॥
भर्तृहरी पावले विरक्ति । नाथ पहाती परीक्षा ॥४८॥

अन्य बायका करिती शोक । तेथे जावें वैराग्ययुक्त ॥
तुच्छ मानून विषयसुख । भिक्षा मागून आणावी ॥४९॥

यापरी करी भर्तरी । गोरक्ष निघती गिरनारीं ॥
भर्तरी दत्तचरण धरी । दत्त गोरक्ष संतोषले ॥५०॥

श्रीदत्त देती उपदेश । तपा धाडिती भर्तृहरीस ॥
बद्रिकाश्रमीं तप विशेष । करी गुरु आज्ञेसम ॥५१॥



दत्त सांगती गोरक्षास । घेऊन यावें मच्छिंद्रास ॥
भेटूं इच्छितों प्रिय शिष्यास । गोरक्षनाथ आनंदले ॥५२॥

श्रीदत्तात्रेया नमस्कारी । आणि निघती झडकरी ॥
गुरुला वृत्त कथन करी । मच्छिंद्रनाथ सुखावती ॥५३॥

गर्भागिरीहून निघाले । गुरुजी शिष्य महाभले ॥
वैदर्भदेश मार्गांत मिळे । कुंडिनपुरीं तें पातले ॥५४॥

चव्हाट्यावर राजसुत । दिसे हस्तपाद रहित ॥
शशांगर भूप कोपत । आणि तोडले हातपाय ॥५५॥

मत्स्येंद्र सांगती हा निर्दोष । याला देऊया उपदेश ॥
आदिगुरु बाप उमेश । पुण्यवंत हा पुत्र असे ॥५६॥

शशांगरा नव्हता सुत । प्रधानाकडे राज्य देत ॥
राजाराणी तीर्था निघत । श्रीरामेश्वर क्षेत्रासी ॥५७॥

कृष्णा-तुंगभद्रा-संगम । तेथें राजास मनोरम ॥
स्वप्नीं शिववाणी परम । सुखदायीच लाभतसे ॥५८॥

हें रामेश्वर क्षेत्र समज । येथें मिळेल लिंग निज ॥
त्याला भक्तिपूर्वक भज । पुत्र लाधसी नको चिंता ॥५९॥

त्यापरी राया लिंग मिळे । राजदंपत्य संतोषलें ॥
एकाग्रचित्तें भावबळें । सेवितां शंकर प्रसन्न ॥६०॥

तेथें महेशा एक ब्राह्मण । भक्तीनें पूजी प्रतिदिन ॥
शिवप्रसाद त्या होऊन । कन्या झाली सुलक्षणी ॥६१॥

ती कदंबानामें कुमारी । शिवभक्तींत दंग भारी ॥
बारा वर्षांची दिसे नवरी । परंतु नवरा न वरीती ॥६२॥

ती अप्सरा शिवसभेंत । नृत्यगायन असे करीत ॥
एकदां कामानळें चित्त । शंकरावर गुंततसे ॥६३॥

त्यामुळें सहज चांचरली । जाणून सर्वेश्वरें शापिली ॥
जावें सत्वर तूं भूतळीं । ऐकतां अप्सरा ओशाळे ॥६४॥

उःशापर्थ करी प्रार्थना । शिव म्हणती मम कामना ॥
तरी मानून तुला अंगना । स्पर्शतां उद्धार होईल ॥६५॥

तीच अप्सरा कदंबा झाली । संगमेश्वरपूजना गेली ॥
जयजयकारें ती म्हणाली । उमापती तूं पावगा ॥६६॥

ऐकून प्रसन्न उमावर । धरण्या जाती तिचा कर ॥
ती लाजून पळे सत्वर । मागोमाग शिव जाती ॥६७॥

प्रेमें धरितां तिचा कर । कदंबा अप्सरा सत्वर ॥
होऊन करी नमस्कार । गेली निघून शिवलोका ॥६८॥

शंकर होते कामातुर । रेत पडलें भूमीवर ॥
येतां पर्जन्याचा पूर । नदींत वाहून तें गेलें ॥६९॥

राजा होता स्नान करीत । त्याचे हस्तीं वीर्य अवचित ॥
येतां बने पुत्र त्वरित । भूप म्हणे ही शिवकृपा ॥७०॥

राजाराणीला आनंद झाला । भक्तीनें पूजून शिवाला ॥
राज्यीं येऊन बारसा केला । पुत्रा नांव कृष्णागर ॥७१॥

बाळलीला सदोदित । पाहून तोषे राजदंपत्य ॥
कृष्णागर बाळ वाढत । सकळां ओढ त्याची सदा ॥७२॥

राजपत्नी पडे आजारी । आयुष्य संपे भूप दुसरी ॥
भुजावंती भार्या वरी । संसार सुरू जाहला ॥७३॥

एकदां राजा अरण्यांत । शिकारीसाठीं एकटा जात ॥
कृष्णागर तरुण सुत । गृहांत राणी पहातसे ॥७४॥

भुजावंती कामार्त होत । पुत्रा बोलावी महालांत ॥
इच्छा पुरवावी म्हणत । पुत्र धिक्कारी तियेला ॥७५॥

कृष्णागर गेला बाहेर । राणी ओशाळे चिंतातुर ॥
म्हणे भूपा हा सांगणार । घाबरे धीर दे दासी ॥७६॥

ती सांगे तिजला युक्ती । तशी रूसून भुजावंती ॥
पारधीहून येतां नृपती । निजून राही स्फुंदत ॥७७॥



राजा करी समजूत । मग भुजावंती बोलत ॥
पुत्र पातला एकांतांत । रतिइच्छा धरूनिया ॥७८॥

परी त्याला झिडकारून । टाकिलें प्रयासें करून ॥
माझें झालें उदासमन । मरण बरें वाटतें ॥७९॥

वृत्त ऐकतां शशांगर । कोपला जैसा खैरांगार ॥
अतिकडक आज्ञा घोर । देतां झाला कृष्णागरा ॥८०॥

त्यापरी हस्तपाद तोडून । चौरंगावर बसवून ॥
चव्हाट्यावर दिला ठेवून । राजाराणी संतोषलीं ॥८१॥

मत्स्येंद्र गोरक्ष जाऊन । राजाला सांगती वचन ॥
चौरंगावर पुत्र टाकून । दिला तो आम्हां पाहिजे ॥८२॥

राजा म्हणे नमस्कारून । इच्छा असल्या चला घेऊन ॥
चौरंगी नाम त्या ठेवून । नाथ घेऊन निघाले ॥८३॥

बद्रिकाश्रमीं मग जाऊन । मंदरपर्वतीं गुहास्थान ॥
पाहून शिवा नमस्कारून । तपा बसविती प्रेमानें ॥८४॥

कानीं दिला मंत्रोपदेश । सांगती जप अहर्निशा ॥
वर ठेविली शिळा विशेष । तेथें दृष्टि लाव म्हणती ॥८५॥

नित्य फळें येथें मिळती । देहरक्षणा तूं खावीं तीं ॥
तीर्थे करून येऊं म्हणती । तोंपर्यंत वाग असा ॥८६॥

चौरंगी म्हणे त्यां नमून । आज्ञेपरी मी वागेन ॥
कांसव-दृष्टीनें पालन । असाल तेथून करावें ॥८७॥

मग देऊन आशीर्वचन । गुहाद्वारा शिळा लावून ॥
एका चामुंडे बोलावून । सांगती आणावीं नित्यफळें ॥८८॥

चौरंगी करी तप गुहेंत । तेथें ठेवावीं फळें सतत ॥
जुनीं टाकून नवीं हवींत । तें चामुंडा मान्य करी ॥८९॥

यापरी व्यवस्था करून । गुरुशिष्यें केलें गमन ॥
दत्तस्थान दिव्य प्राचीन । गिरनार तेथें दत्तभेट ॥९०॥



दत्तगुरूला नमस्कारून । मच्छिंद्र गेले आनंदून ॥
मत्सेंद्र शिष्यास पाहून । दत्तही प्रेमें गहिंवरले ॥९१॥

गोरक्ष श्रीदत्ता नमिती । मच्छिंद्र गोरक्ष दत्त त्रिमूर्ती ॥
परस्परां सर्व कथिती । प्रेमानंदें करोनियां ॥९२॥

त्यांना करुया नमस्कार । दिव्य क्षेत्र श्रीगिरनार ॥
तेथें श्रीदत्त दगिंबर । उभयनाथां ठेवून घें ॥९३॥

श्रीगुरुदेवदत्तचरण । मच्छिंद्र सेवी प्रतिदिन ॥
दोघांचीही सेवा करुन । गोरक्षनाथ संतोषती ॥९४॥

करावा सदा लोकोद्धार । हाच संतांचा असे संसार ॥
त्यासाठीं ते निरंतर । तीर्थयात्रमिषें फिरती ॥९५॥

देव ऋषि आणि पितर । तीन ऋणें मनुष्यावर ॥
तीं फेडून सद्गति नर । पावे नित्य शास्त्र वदे ॥९६॥

त्याप्रमाणें धर्म पाळून । व्हावया सुखी नानाजन ॥
साधुसंत कृपा करून । अनुभव देती लोकांना ॥९७॥

विविध चमत्कार दावून । आणि लोकांचे क्लेश हरून ॥
धर्माचार योग्य रक्षून । साधु निरिच्छ वर्तती ॥९८॥

दत्त परमात्मा भगवान । उभय नाथां दे धाडून ॥
नाथ करिती तीर्थाटन । प्रयागक्षेत्रीं पोंचले ॥९९॥

योगसिद्धी सदा सतेज । शिष्यांसह श्रीदत्तराज ॥
पस्तीसावा अध्याय निज । हस्तीं घेती भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

# अध्याय ३६वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

गंगा यमुना सरस्वती । संगमतीर्थीं मिळे सद्गती ।।
प्रयागा तीर्थराज म्हणती । करूं नमन अत्यादरें ।।१।।

तीर्थे लोकांचीं पापें धुती । साधु तीर्थक्षेत्रीं फिरती ।।
त्यामुळें तीं पावन होती । संतमहिमा थोर असे ।।२।।

मच्छिंद्र गोरक्ष प्रयागांत । असतां भूपा मरण प्राप्त ।।
सर्वलोक शोकें रडत । पाहून नाथां ये दया ।।३।।

मच्छिंद्र म्हणती मनांत । राजास करावा जिवंत ।।
पण जीव मिळे शिवांत । त्यामुळें उपाय न चाले ।।४।।

गोरक्ष गुरूस सांगती । मृत त्रिविक्रमनृपती ।।
जिवंत करावा लोक रडती । त्यांना सौख्य होऊं दे ।।५।।

परंतु उगी मच्छिंदर । पाहून गोरक्ष वदे सत्वर ।।
आपुलें द्रवे ना अंतर । तर सजीव करतों मीं ।।६।।

जर असें मी न करीन । तर शरीर हें जाळीन ।।
आणि नरकीं मी जाईन । वृथा जल्पसी गुरु म्हणती ।।७।।

राजा ब्रह्मरूपा मिळत । पुन्हां न होई कदा प्राप्त ।।
गोरक्षही विचार करीत । म्हणे सत्य हे गुरुबोल ।।८।।

मग अग्निकाष्ठें भक्षण । करण्या सिद्ध शिष्य बघून ।।
मच्छिंद्र सांगती वचन । सुचे मला एक युक्ती ।।९।।

तुझ्यासाठीं राजशरीरीं । शिरतों आतां मी निर्धारीं ।।
माझा देह रक्षण करीं । द्वादशवर्षें पर्यंत ।।१०।।

मग मी परत येईन । गोरक्षा मानलें वचन ।।
गुरुजी स्वदेह सोडून । राजदेहांत प्रवेशले ।।११।।

राजा स्मशानांत जिवंत । लोक आनंदें अचंबळत ।।
सुवर्णपुतळा मग शास्त्रोक्त । जाळून अंत्यकर्म पुरें ।।१२।।



मच्छिंद्रनाथ थोर ज्ञानी । करी राजकार्यें समजोनी ।।
गोरक्षें गुरविणीस पुसोनी । गुप्तस्थान मिळविलें ।।१३।।

शिवालयीं गुप्त गुहेंत । मच्छिंद्रदेह तो ठेवीत ।।
गुरविणीस सांगे मात । राख गुप्त बारा वर्षे ।।१४।।

मग गुरु स्वदेहीं येती । गुरवीण सांगे नको धास्ती ।।
शिवदर्शना येई नृपती । संकेत सुचवी गोरक्ष ।।१५।।

त्याप्रमाणें लक्ष सतत । त्रिविक्रमही ठेवीन म्हणत ।।
शिवा नमून गोरक्ष निघत । तीर्थयात्रा करावया ।।१६।।

शिष्यभाषण व्हावें सत्य । म्हणून गुरूचें द्रवे चित्त ।।
भोगून भोगही अनित्य । दावी नित्य शिष्यप्रेम ।।१७।।

गोरक्षनाथ तीर्थे करी । फिरत शेतीं गोदातीरीं ।।
येतां भुकावला भारी । जवळ असे भागानगर ।।१८।।

शेतांत माणिक शेतकरी । भोजनाची करी तयारी ।।
ती पाहून नाथ हाकारी । भोजन हवें म्हणतसे ।।१९।।

नाथा दिलें आपुलें अन्न । गोरखनाथ तृप्त जेवून ।।
माणिका सांगती नाथवचन । कांहीं वरदान मागावें ।।२०।।

तें अैकून माणिक हंसे । भीक मागतां म्हणे असे ।।
तुम्ही देणार मला कायसें । तुम्हीच मागा माझ्याकडे ।।२१।।

गोरक्ष म्हणती मनांत । याचें कांहीं हित ।।
मग शेतकऱ्या पुसत । सत्य बोल कराल ना ? ।।२२।।

माणिक वदे सत्यभाषण । नि:शंक मागा मी देईन ।।
नाथ मागती वरदान । मनीं येई तें करूं नको ।।२३।।

सांगे माणिक शेतकरी । सत्य वागेन त्याचपरी ।।
मग तेथून मार्ग धरी । नाथ बद्रिकाश्रमाचा ।।२४।।

माणिकघरीं निघतसे । गवत भारा शिरीं घेतसे ।।
बैलांस वाटे लावीतसे । स्मरण झालें वचनाचें ।।२५।।



मग तेथेंच उभा राही । हालचाल न करी कांहीं ।।
खाणें पिणें कांहींच नाहीं । सत्य करी वचनासी ।।२६।।

थंडी वारा पर्जन्य ऊन । उभा राही सर्व सोसून ।।
देह झाला परम क्षीण । गोरक्ष कृपेंच जिवंत ।।२७।।

बद्रिकाश्रमीं नाथ जाती । चौरंगीची गुहा पहाती ।।
तोंडावरची शिला काढिती । नाथमन हेलावलें ।।२८।।

चौरंगी मुखें जप करी । दृष्टी अेकाग्र शिळेवरी ।।
वारूळ वाढे देहावरी । त्यासी नाथ कुरवाळिती ।।२९।।

हातपाय त्वरें फुटती । चौरंगीबाळ पुष्ट होती ।।
गोरक्ष चामुंडे विचारिती । फळें कां गे न दिलींस ।।३०।।

ती म्हणे मी नित्य देतसें । पण बाळ फळें न घेतसें ।।
चौरंगी म्हणे न खातसें । दृष्टि चळेल वाटे मला ।।३१।।

आपुल्या कृपें मुदित मन । जप होतसे रात्रंदिन ।।
कांहींच आलें नाहीं विघ्न । नाथा नमस्कार करी ।।३२।।

ऐकतां हे प्रेमळ बोल । नाथ आलिंगी त्या तत्काळ ।।
उपदेश करून सकळ । नाथदीक्षा बाळा दिली ।।३३।।

आणि शंकरास नमून । नाथ करिती तीर्थाटन ।।
वैदर्भ प्रांतीं ते येऊन । कुंडिनपुरीं पातले ।।३४।।

चौरंगीस नाथ सांगत । सावत्रमाता फार मस्त ।।
तिचे ऐकून तुला दंडीत । तरी पित्यास बळ दावीं ।।३५।।

मग चौरंगी नाथा नमुनी । वातमंत्र जपे तत्क्षणी ।।
त्यामुळें गेले शीघ्र उडोनी । राजउपवनरक्षक ।।३६।।

शिष्यें पुन्हां मंत्र म्हणोनी । खालीं आणिलें त्यां लागोनी ।।
रक्षक राजाकडे जावोनी । वृत्त कथिती नाथांचें ।।३७।।

अलखनिरंजन वदती । दोन बुवा आले असती ।।
ऐकून म्हणे मनीं नृपती । जाऊं पूजन करावया ।।३८।।

मागचेच हे असतील । सैन्यासह निघे तत्काळ ॥
लवाजमा येतां जवळ । नाथसंकेत शिष्याला ॥३९॥

त्याप्रमाणें चौरंगी करी । सर्वां उडवी नभांतरीं ॥
गर्गर फिरवी अधांतरीं । पुन्हां उतरी खालते ॥४०॥

भूपें नाथांकडे येऊन । नमून केलें प्रेमें स्तवन ॥
गोरक्ष सांगती वर्तमान । पूर्वी कसें काय घडलें ॥४१॥

चौरंगी राजा एकमेकां । भेटताती अतिकौतुका ॥
शिवप्रसाद व्यर्थ फुका । कसा जाईल भूप म्हणे ॥४२॥

राजा भक्तिभावें करून । नाथांचा करी बहु सन्मान ॥
भुजावंतीस शिक्षा करून । नाथकृपा मिळवीतसे ॥४३॥

गोरक्षें भूपा वीर्यवान । करून म्हणे करावें लग्न ॥
होईल उत्तम पुत्ररत्न । ऐकतां भूप आनंदला ॥४४॥

मग प्रेमें निरोप घेऊन । गुरुशिष्य करिती गमन ॥
मार्गातील तीर्थें करून । प्रयाग क्षेत्रीं पातले ॥४५॥

मत्स्येंद्र राजदेहीं शिरे । राणी रेवती मोदभरें ॥
भोगी सौख्य नशीब खरें । पुत्रही झाला धर्मनाथ ॥४६॥

एकदां शिवालयीं गेली । भक्तिभावानें पूजा केली ॥
अखंड सौभाग्य दे म्हणाली । ऐकून हसली गुरवीण ॥४७॥

तें पाहून राणी संचित । गुरविणीस पुसे वृत्त ॥
तिनें सांगून माहिती गुप्त । गुहा दाविली मच्छिंद्राची ॥४८॥

बारा वर्षें भरल्यावर । नाथ सोडील राजशरीर ॥
तूर्त भोगितें पुरुष पर । गुप्त नियोग हा असे ॥४९॥

पुत्र नसतां पति मृत । तरी नियोग आचरीत ॥
पूर्वकाळची मान्य रीत । आपुला अर्धम नव्हे म्हणे ॥५०॥

आणि भोगण्या नाथ सदैव । साहस करी ती अपूर्व ॥
सामसूम असतां सर्व । गुहा उघडी नाथाची ॥५१॥



चिरंजीव नाथशरीर । तेज:पुंज दिसे अमर ॥
त्याला करून नमस्कार । खंड खंड देहकापी ॥५२॥

जवळच्या रानांत नेऊन । मातींत टाकी मिसळून ॥
गुहद्वार बंद करून । मनीं आनंदी जाहली ॥५३॥

नाथ योगीशरीर नाहीं । म्हणून नाथ राजदेही ॥
स्थिर राहील काळजी नाहीं । कोणा न कळे राणी म्हणे ॥५४॥

गोरक्ष येती प्रयागांत । चौरंगीस सर्व सांगत ॥
शिवालयीं वस्ती करीत । तीर्थविधि पूर्ण केला ॥५५॥

द्वादशवर्षें काळ झाला । गोरक्ष पुसती गुरविणीला ॥
ती सांगे अपराध घडला । फक्त राणीस कथिलें मी ॥५६॥

क्षमा करावा अपराध । गोरक्ष जाहले स्तब्ध ॥
गुरुमाऊलीसाठीं शोध । करितां विरोध त्यांना दिसे ॥५७॥

गुहेंत दिसलें नाहीं प्रेत । गुरवीण राणीकडे जात ॥
म्हणे काय जाहलें प्रेत । तुलाच पूर्वीं कथिलें मी ॥५८॥

आतां गोरक्षनाथ आले । ऐकतां राणी सांगे सगळें ॥
मग जाऊन सांगितलें । तिनें गोरक्षा सर्व तें ॥५९॥

ते सांगती चौरंगीस । सूक्ष्म देहानें प्रेततपास ॥
करितों सांभाळ जडदेहास । गाफील शिष्या न रहावें ॥६०॥

चौरंगी सांगे सांभाळीन । मुळींच नको अनमान ॥
सुक्ष्मरूपें करी गमन । जडदेह रक्षी चौरंगी ॥६१॥

गुप्त अस्त्रें लावी विभूती । म्हणून कोणी नोळखती ॥
सर्व लोकीं फिरून जाती । कैलास लोकीं गोरक्ष ॥६२॥

रेवतीनें प्रेत नाशिलें । तें शिवगौरीनें पाहिलें ॥
यक्षिणीचामुंडांस कथिलें । मच्छिंद्र प्रेतकण जमवा ॥६३॥

पुढें गोरक्षनाथ येईल । तो हें प्रेत सर्व नेईल ॥
मच्छिंद्र जिवंत होईल । तरी सर्व कण वेंचा ॥६४॥



त्यांनीं प्रेतकण वेंचून । वीरभद्राकडे नेऊन ॥
देतां बोलती शिवगण । अनायासें नाथ मेला ॥६५॥

वीरभद्र सर्वां सांगत । रक्षण करा नाथप्रेत ॥
बारावर्षें होतां परत । वीरभद्र त्यांना कथी ॥६६॥

इतक्यांत गोरक्ष येईल । तरी सावध सदाकाळ ॥
गोरक्ष ऐके हें सकळ । आणि पाही प्रेतकण ॥६७॥

मग जडशरीरीं आला । चौरंगीस आनंद झाला ॥
दोघे मिळून भास्कराला । खालीं येण्यास प्रार्थिती ॥६८॥

सूर्य येती सौम्य होऊन । दोघे नाथ करिती नमन ॥
गोरक्ष सांगती शिवगण । रक्षिती प्रेत मच्छिंद्राचें ॥६९॥

सकळ माहिति सांगून । प्रार्थिती शिष्टाई करा म्हणून ॥
चढून गेले शिवगण । तरी शांतीनें प्रेत मिळो ॥७०॥

आदित्यदेव रुकार देती । शिवगणां जाऊन सांगती ॥
भैरव चामुंडा म्हणती । प्रेतगोळा न मिळेल ॥७१॥

वीरभद्र कथी कोपून । गोरक्षास पुसतो कोण ॥
त्यांनीं घ्यावें प्रेत लढून । सूर्य म्हणती बरें नव्हे ॥७२॥

नाथ असती बळवंत । त्यांच्यापुढें तुमचा अस्त ॥
वीरभद्र न घे समजून । मग सूर्य म्हणे त्यांनां ॥७३॥

कैलासीं न करावें रण । शिव कोपतील दारुण ॥
तें ऐकून सत्य भाषण । शिवगण येती भूवरी ॥७४॥

रवि नाथांस सांगती । वीरभद्रादि न ऐकती ॥
तरी निश्चिंत असावें चित्तीं । रणीं जयश्री तुमचीच ॥७५॥

आदित्य जाती आकाशांत । शिवगण नाथा झुंजत ॥
शस्त्रअस्त्रयुद्ध चालत । मग गोरक्ष क्रोधावती ॥७६॥

मंत्रबळें दानव निर्मिले । वीरभद्रावरी सोडिले ॥
संजीवन दैत्यां दिधलें । देव प्रार्थिती नारायण ॥७७॥

हरिहरादि देव जमले । गोरक्षास सांगूं लागले ॥
दैत्य निर्मून अनुचित केलें । तरी माघारे बोलाविणें ॥७८॥

गोरक्ष म्हणे आधीं आणा । मच्छिंद्रनाथ देह जाणा ॥
शिव धाडिती प्रेत आणण्या । चामुंडा एक त्यावेळीं ॥७९॥

नाथदेह तिने आणून । केला शंकराच्या स्वाधीन ॥
शिवें नाथाकडे देऊन । दैत्यनाश करीं म्हणे ॥८०॥

गोरक्ष म्हणे शिवादिकां । तुम्ही मारा दानवादिकां ॥
नातरी करून विवेका । वीर-आशा सोडावी ॥८१॥

हें ऐकतां गोरक्षबोल । वीरभद्र-आशा सकळ ॥
शिवें सोडिली तयेवेळ । दानवनाशा कारणें ॥८२॥

मग नाथ वाताकर्षण । दानवांवरी दे सोडून ॥
त्यामुळें दैत्य गतप्राण । वीरासहित जाहले ॥८३॥

अग्निअस्त्र नाथें जपून । सकळांस टाकिलें जाळून ॥
महादेव करी रुदन । वीरभद्र सुतासाठीं ॥८४॥

तें पाहून गोरक्ष म्हणती । जरी वीरअस्थि मिळती ॥
तरी आणीन प्राणज्योती । चिंता कांहीं न करावी ॥८५॥

शिव सांगती शिवगण । देहीं सतत शिवस्मरण ॥
ही जाणून ओळख खूण । मृत वीरअस्थि लाभती ॥८६॥

त्यांवर मंत्र संजीवन । जपून वीरा दिलें जीवन ॥
शिवादिक हर्ष पावून । गोरक्षाला गौरविती ॥८७॥

वीरभद्राचा स्नेह जमला । देव निघाले स्वठायाला ॥
उभयनाथ चरणकमला । आणि देवां नमन असो ॥८८॥

शिवदर्शना नित्य येत । तसा राजा येतां पहात ॥
उभयनाथ देवालयांत । विचार करी एकांतीं ॥८९॥

त्रिविक्रम मग लवकर । पुत्रा बसवी राज्यावर ॥
सांगून नीति न्याय विचार । धर्मनाथा बोध दिला ॥९०॥



सामंत प्रधान प्रजाजन । यानीं स्वधर्म पाळून ॥
ऐहिकसुख मिळवून । अंतीं गतीस पावावें ॥९१॥

असा उपदेश करून । सकळांस प्रेम लावून ॥
राजशरीर दे सोडून । मच्छिंद्रनाथ गुप्तपणें ॥९२॥

हें गोरक्षें ओळखून । मंत्र जपला संजीवन ॥
कण कण एकत्र मिळून । गुरूचा देह सांधला ॥९३॥

त्यांत मच्छिंद्र प्रवेशून । शिवालयीं झाले नाथ तीन ॥
प्रेतसंस्कार होतां दुरून । रेवती राणी पहातसे ॥९४॥

मच्छिंद्रनाथा ओळखून । धर्मनाथा गुप्त सांगून ॥
तीन्ही नाथांस गौरवून । पुत्रा आशीर्वाद मिळवी ॥९५॥

धर्मनाथा नाथ सांगती । पुढें येऊं न करीं खंती ॥
राज्य भोगून सदाचित्तीं । परमेश्वरा आळवावें ॥९६॥

नंतर नाथदीक्षा मिळेल । हे ऐकून प्रेमळ बोल ॥
धर्मनाथा आनंद विमल । त्या पुसून नाथ जाती ॥९७॥

नाथचरित्र फार गहन । सुखी व्हावे संपूर्ण जन ॥
म्हणून योगबल योजून । अलौकिक काम करिती ॥९८॥

आपण निरिच्छ राहून । सदा करिती तीर्थाटन ॥
नित्य सफळ आशीर्वचन । त्यांना नमन सदा असो ॥९९॥

श्रीगुरुदत्ता गुरुराया । जडातीत आपुली काया ॥
कृपें आपुल्या जन ताराया । पूर्ण अध्याय छत्तीस ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय ३७ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

चौरंगी गोरक्ष मच्छिंद्रनाथ । प्रयागाहून तीर्थाटनार्थ ॥
फिरतां करण्या कृतार्थ । माणिकशेतीं पातले ॥१॥

तो शेतकरी अडबंग । त्याचें नांव माणिक चांग ॥
अस्थिचर्म राहिलें अंग । काष्ठापरी उभा असे ॥२॥

गोरक्ष सांगे त्याची कथा । ऐकतां आदर मच्छिंद्रनाथा ॥
म्हणे तप करून सर्वथा । कष्टलासी, पुरे तप ॥३॥

माणिक म्हणे तुमचें यांत । कांहीं तरी असे कीं जात ॥
आपुल्या मार्गे रहा चालत । कोणीं तुम्हां विचारिलें ॥४॥

मच्छिंद्रनाथ पुन्हां सांगती । परी त्याची भाषण रीती ॥
वांकडी पाहून गोरक्ष जती । प्रेमें पुसे अडबंगा ॥५॥

म्हणे तापसी तुम्ही थोर । तसे न पाहिले आजवर ॥
तरी उपदेश मला सत्वर । देऊन उद्धार करावा ॥६॥

अडबंग माणिक म्हणे । दिससी मला मूर्ख जाणें ॥
मजकडून ज्ञान घेणें । तरी तूंच देणें मला ॥७॥

गोरक्षाचें काम साधलें । तत्काळ त्याला ज्ञान दिलें ॥
आपणासम त्यासी केलें । धन्य नाथ कृपाळू ते ॥८॥

माणिकाचा संशय गेला । नमिलें गोरक्षमच्छिंद्रांला ॥
चार नाथांचा मेळ झाला । त्यांना नमन प्रेमभरें ॥९॥

मच्छिंद्रनाथ नांव ठेविती । माणिका अडबंगजती ॥
तीर्थाटना सदा फिरती । प्रयागक्षेत्रीं पातले ॥१०॥

धर्मनाथ करी सत्कार । सांगे करून नमस्कार ॥
लग्न करून झाला कुमार । नाथदीक्षा द्यावी मला ॥११॥

मच्छिंद्रनाथ गोरक्षास । करण्या सांगत उपदेश ॥
मग गोरक्ष धर्मनाथास । उपदेश देता जाहला ॥१२॥

सुरवर तेथें आणिले । प्रजाजनही जमविले ॥
गोरक्षानें सर्वां दिधलें । प्रसादपान स्वहस्तें ॥१३॥

धर्म द्वितीया माघमासीं । उत्सव झाला प्रयागासी ॥
धर्मनाथ, त्रिविक्रमासी । मग बसवी राज्यावर ॥१४॥

राज्याभिषेक स्वपुत्रास । करून निघे जावयास ॥
पांच नाथ बद्रिकाश्रमास । जाऊन शिवा वंदिती ॥१५॥

धर्मनाथा तपा बसवून । नाथ करिती तीर्थाटन ॥
बारा वर्षांनीं तप संपूर्ण । करण्या परत पातले ॥१६॥

देवतादर्शन करवून । धर्मनाथाही केला पूर्ण ॥
पांचही नाथ तीर्थाटन । करीत फिरती सदैव ॥१७॥

नानास्थानीं साक्षात्कार । दावून केला लोकोद्धार ॥
जिकडे तिकडे स्थानें अपार । असती नाथ योग्यांचीं ॥१८॥

त्यांना भजून नरनारी । सुख पावती निरंतरीं ॥
नाथकीर्ति दिगंतरीं । गर्जे त्यांना नमन असो ॥१९॥

ब्रह्मदेव वीर्यजनित । रेवाकांठीं बाळ रेतींत ॥
चमसनारायण जन्मत । रेवणनाथ प्रसिद्ध जे ॥२०॥

रेवानदीच्या तीरावरी । पाणी न्यावया शेतकरी ॥
घेऊन येतां कुंभ करीं । दृष्टि गेली बाळावर ॥२१॥

पहातसे तो विस्मयानें । बाळ दिसे गोजिरवाणें ॥
शेतकरी मग प्रेमानें । आपल्या घरीं त्या नेतसे ॥२२॥

भार्येस सांगे आनंदानें । हें ईश्वराचें असे देणें ॥
त्यास सुमनानें पाळणें । दिव्य बालक हा दिसे ॥२३॥

त्यांचें असे लहान बाळ । आणि दुसरें पाहून बाळ ॥
करिती त्याचाही प्रतिपाळ । आनंदानें पतिपत्नी ॥२४॥

रेवाकांठीं जन्म रेवेंत । म्हणून रेवण नांव ठेवीत ॥
उत्तरोत्तर बाळ वाढत । सर्वां तोषवी लीलांनीं ॥२५॥



शेतकामा मदत करी । गुरें नेऊन रानीं चारी ॥
सदा आनंदे शेतकरी । रेवणकर्तुत्व पाहून ॥२६॥

अेके दिवशीं पहांटेस । बैलां नेई चरावयास ॥
दत्तही जाती त्या वेळेस । त्या वाटेनें स्नान करण्या ॥२७॥

रेवणामागें हळु चालत । रेवण पाठीं पुढें धावत ॥
इकडे तिकडे बैल पळत । त्यांना मार्गीं वळवावया ॥२८॥

तसा मागें सरे रेवण । दत्तां आदळे तो मागून ॥
लगेच चित्तीं उदेलें ज्ञान । लोकोपकारा अवतार ॥२९॥

दत्तचरण तो दृढ धरी । आणि स्तुति अपार करी ॥
मग श्रीदत्त कृपा करी । हस्त मस्तकीं ठेविला ॥३०॥

महिमा सिद्धि सहस्त्रांश । दत्तें दिधला तेव्हां त्यास ॥
रेवण पावून संतोष । दत्ता नमी पुन्हां पुन्हां ॥३१॥

दत्त त्यासी आश्रय देत । उपदेश पुढें देऊं म्हणत ॥
चमसा करण्या जागृत । दत्त दयाळु धावले ॥३२॥

दत्त निघाले स्वठायास । रेवण करी स्वकामास ॥
नमन असो त्या दोघांस । समर्थलिला अतर्क्य ॥३३॥

रेवण नांगरी स्वशेत । मुखें सिद्धिमंत्र म्हणत ॥
प्रत्यक्ष सिद्धि उभी पुढ्यांत । स्त्रीरूपानें राहिली ॥३४॥

रेवण विचारी तूं कोण । ती म्हणे मी सिद्धि जाण ॥
येरू सांगे करीं सुवर्ण । सत्वर खूप या ठायीं ॥३५॥

लगेच सुवर्णाच्या राशी । होतां पाहून रेवणासी ॥
हर्ष अपार म्हणे तिसी । धन्य गे बये अससी तूं ॥३६॥

मग सिद्धि रेवणा सांगे । पुरवीन तुम्हां जें जें लागे ॥
सदा राहीन तुम्हासंगें । गुप्तपणानें सत्य हें ॥३७॥

मग रेवण संतोषला । रात्रीं आपुल्या घरीं गेला ॥
दुसऱ्या दिवशीं राहिला । घरींच शेता न जातां ॥३८॥



बाप विचारी रेवणासी । शेतावर तूं कां न जासी ॥
येरू म्हणे शेतकामासी । कशा करितां मी जावें ॥३९॥

बाप म्हणाले द्रव्यासाठीं । रेवण सांगे पैशासाठीं ॥
यापुढें नको खटापटी । धन अपार मिळविलें ॥४०॥

पहावें घरांत जाऊन । पित्या दिसलें खूप धन ॥
म्हणे रेवण धन्य धन्य । सर्व कुटुंब आनंदले ॥४१॥

दरिद्रीलोकां बोलावून । धन वस्त्रासह भोजन ॥
देई सदा बाळ रेवण । वाटसरूही संतुष्टती ॥४२॥

ज्याची जशी वासना असे । त्यापरी त्याला देत असे ॥
सुखी करून धाडीतसे । कीर्ति सर्वत्र फांकली ॥४३॥

तीर्थयात्रा मच्छिंद्र करी । एकदां येई नर्मदातीरीं ॥
लोक सांगती थोरवी खरी । आदरें रेवणसिद्धाची ॥४४॥

चमस हें नाथास कळे । त्यांनीं पशुपक्षां बोलाविलें ॥
ग्रास चारून पाठविलें । व्याघ्रदिकही नम्र नाथा ॥४५॥

असा पहातां चमत्कार । रेवणासी लोकसत्वर ॥
सांगते झाले अशी खबर । रेवण विचार करीतसे ॥४६॥

मग एकांतीं तो जाऊन । सिद्धीस आणी बोलावून ॥
म्हणे कर मच्छिंद्रसमान । ती म्हणे तें अशक्य मला ॥४७॥

मच्छिंद्र ब्रह्मज्ञानी पूर्ण । तसा तूंही होशील धन्य ॥
दत्त उपदेश तूं घेऊन । समर्थ नाथ बनशील ॥४८॥

हें अैकतां सिद्धिवचन । म्हणे झालें दत्तदर्शन ॥
त्याच ठायीं मी जाऊन । करीन तप आतांच ॥४९॥

कायावाचामनें करून । तप करी दिव्य रेवण ॥
म्हणे व्हावें दत्तदर्शन । उपदेशही हवा मला ॥५०॥

रेवणहेतु ओळखून । घ्यावया श्रीदत्तदर्शन ॥
मच्छिंद्र करिती गमन । श्रीदत्तस्थानीं गिरनारीं ॥५१॥

दत्तचरण भावें नमून । रेवणवृत्त करी कथन ॥
श्रीदत्तदयाळू भगवान । मच्छिंद्रासह निघाले ॥५२॥

रेवण खूप आनंदला । दत्त कुरवाळिती त्याला ॥
उपदेशही त्यास दिला । आत्मज्ञान पूर्ण मिळे ॥५३॥

पूर्वीं दत्ताची भेटी झाली । तेव्हां सिद्धिकला मिळाली ॥
ती परोपकारा योजिली । धर्म केला उत्तमसा ॥५४॥

नंतर केली तपश्चर्या । ब्रह्मज्ञान पूर्ण मिळाया ॥
तें जाणून श्रीदत्तराया । इच्छा पूर्ण त्याची करी ॥५५॥

गिरनारीं तिघेही जाती । रेवणा देवता वर देती ॥
नाथदीक्षा श्रीदत्त देती । धाडिती तीर्थयात्रेला ॥५६॥

मच्छिंद्रासह तीर्थाटन । करी प्रेमें नाथ रेवण ॥
मग अेकटेच फिरून । परोपकार ते करिती ॥५७॥

विटें गांवीं फिरत येत । विप्रगृहीं वारसा असत ॥
पूर्वींचीं सहा मुलें मृत । दहा दिवसांत होत होतीं ॥५८॥

सातवें मूल बारा दिवस । जिवंत म्हणून बारश्यास ॥
इष्टमित्र विप्रादिकांस । बोलावी द्विज आनंदें ॥५९॥

बहु धार्मिक ब्राह्मण । दिसतां सिद्ध नाथ रेवण ॥
नाथांचे धरून चरण । ठेवून घेत अत्यादरें ॥६०॥

बारश्याचा उत्सव झाला । लोक जाती घरा आपुल्या ॥
रेवणनाथ त्या रात्रीला । झोंपती तेथें प्रेमानें ॥६१॥

विप्र नाथांचे पाय चुरी । मनोभावानें सेवा करी ॥
रात्रीं नाथ झोपल्यावरी । सटवी मारी बाळास ॥६२॥

नव बाळा मरण आलें । विप्रकांते रडें फुटलें ॥
ब्राह्मण तिला हळु बोले । रडून बाळ मिळतें का ॥६३॥

पूर्वकर्म असे गहन । म्हणून पुत्रां येई मरण ॥
आणि आतां आक्रोश करून । साधुनिद्रा नको भंगूं ॥६४॥



असो प्रात:काळ झाला । नाथां उठतां प्रकार कळला ॥
अनिवार क्रोध त्यांना आला । ब्राह्मणास ते विचारिती ॥६५॥

द्विज सांगे सकळ वृत्त । नाथ विप्रा अभय देत ॥
सांगती राखा बालप्रेत । दिवस तीन नको चिंता ॥६६॥

आतांच जातों यमलोकांत । घेऊन येतों बाळें सात ॥
नाथा पाहून करी स्वागत । यमधर्म त्यांचें प्रेमानें ॥६७॥

धर्म पुसती काय वासना । नाथ सांगती आलें मना॥
द्यावे सात सुत ब्राह्मणा । तरी व्यवस्था करावी ॥६८॥

यम सांगे मी आज्ञाधारी । सर्वलय शंकर करी ॥
तरी जाऊन शिवपुरीं । विप्रबाळें मिळवावीं ॥६९॥

त्यापरी जाती नाथरेवण । शिवाच्या द्वारीं शिवगण ॥
पुसती नाथा तुम्ही कोण । रेवण सर्व सांगती ॥७०॥

तें अैकून चेष्टा करिती । रेवणनाथ क्रोधावती ॥
स्पर्शअस्त्र नाथ सोडिती । शिवगण डसले भूमीस ॥७१॥

मग अष्टभैरव आले । नाथापुढें तेही हरले ॥
वीरभद्रादि तेथें थकले । शंकर येती युद्धासी ॥७२॥

वाताकर्षण नाथ सोडीत । शंकर झाले निचेष्टित ॥
मग गंधर्व कळवीत । विष्णूस सर्व वृत्त हें ॥७३॥

ते येऊन नाथा पुसती । रेवण स्वहेतु सांगती ॥
माझ्याकडे बाळ असती । देईन म्हणती श्रीविष्णू ॥७४॥

जीवदशा घेऊन जावी । देह निर्मून त्यांत भरावी ॥
शिवादिका आतां उठवीं । नाथ मग तसें करिती ॥७५॥

सर्वांलागीं आनंद झाला । त्यांना पुसून नाथ आला ॥
ब्राह्मणाला सांगता झाला । प्रेत कुटून आणावें ॥७६॥

प्रेत मलिद्याचे भाग सात । करून नाथ देह करीत ॥
जीवदशा घालून त्यांत । केले जिवंत सात बाळ ॥७७॥



नाथप्रताप हा अद्‌भुत । पाहून ब्राह्मण आनंदत ॥
पुढें नाथांचे शिष्य होत । सातही बालक विप्राचे ॥७८॥

रेवणनाथ विटें गांवांत । रहातीं कीर्ति वाढे सतत ॥
भक्तिभावें त्यां प्रणिपात । नाथा कृपा करावी हो ॥७९॥

एकदा ब्रह्मा कामातुर । रेत गळालें भूमीवर ॥
त्याचा अंश नागिणीवर । पडतां प्राशन ती करी ॥८०॥

पांडवपणतू जनमेजय । सर्पसत्र करी निर्भय ॥
तेव्हां आस्तिक द्विजवर्य । रक्षण करी सर्पांचें ॥८१॥

त्यावेळीं तक्षक कन्येस । आस्तिकें कथिलें भविष्य ॥
तुझ्या उदरीं सिद्धपुरुष । वटोदरांत रहा म्हणे ॥८२॥

तक्षक कन्या ती नागीण । जुनाट वृक्ष वट पाहून ॥
बहुत काळ गर्भ पाळून सुखरूपशी रहातसे ॥८३॥

मग अंडें वटोदरांत । टाकून गेली पाताळांत ॥
आविर्होत्र अवतरे त्यांत । वट सिद्ध ते नागनाथ ॥८४॥

कोशधर्म नामें ब्राह्मण । काशींत आचार संपन्न ॥
त्याच वडाकडे गमन । करी पानें आणण्यासी ॥८५॥

त्याचवेळीं वटोदरांत । आविर्होत्र बाळ जन्मत ॥
त्याचें रडें विप्र अैकत । म्हणे बाळ हें कोणाचें ॥८६॥

देव सांगती ब्राह्मणास । घेऊन जावें या बाळास ॥
सुख होईल बहुवस । आणि कथिली माहिती ॥८७॥

ऐकून ब्राह्मण आनंदत । बाळा घेऊन घरीं जात ॥
पत्नीकडे देऊन सांगत । पाळ याला पुत्रासम ॥८८॥

तिलाही मग मोद झाला । प्रेमें पाळिलें त्या बाळाला ॥
बाळ मोठा होऊं लागला । मुंज केली यथाकाळीं ॥८९॥

देव म्हणती बाळ समर्थ । हा वटसिद्ध नागनाथ ॥
ब्राह्मण म्हणे मी कृतार्थ । बाळलीला गहन असे ॥९०॥

गंगाकांठीं मुलें जमती । सदा नाना खेळ चालती ॥
एकदां ते भोजन करिती । रसाळ बोल बोलून ॥९१॥

पानावर पदार्थ वाढीत । म्हणजे नांवें त्यांचीं घेत ॥
नागनाथ आग्रह करीत । मुलें म्हणती पुरे पुरे ॥९२॥

त्यावेळीं दुपारीं काशींत । श्रीदत्त भोजनासाठीं येत ॥
बोलभोजन खेळ समस्त । पाहून कृपा उगवली ॥९३॥

पूर्वीचे नवनारायण । त्यांत आविर्होत्र नारायण ॥
नागनाथ बाळ होऊन । खेळ खेळत बाळां सवें ॥९४॥

बाळ सुरेख होती दत्त । आणि बाळकांपाशीं जात ॥
लटकें भोजन आवडत । नागनाथ वाढती जें ॥९५॥

दत्त बाळ मुलांस सांगे । मला घ्यावा तुमच्या संगें ॥
मुलें म्हणती आम्हां संगें । येऊं नको जा, मागें तूं ॥९६॥

असें म्हणून त्या लोटिती । नागनाथ मुलां म्हणती ॥
कोणी आला जरी अतिथि । त्याला घालवूं नयेच ॥९७॥

नवीनं बाळा आपणांत । आणून त्याची पूजा करीत ॥
भक्तिभावें भोजन देत । दत्त प्रसन्न त्या होती ॥९८॥

गुप्तपणें दे सिद्धिकला । भोजन द्यावें म्हणे सकळां ॥
पण आपण भोजनाला । घेऊं नयेच अन्न तें ॥९९॥

असें सांगून दत्त जाती । नागनाथ मुदित होती ॥
सदतिसावा अध्याय घेती । श्रीदत्त प्रेमें भक्तसुखा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ३८वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः॥

काशींत भागीरथी तीर । नागनाथा सवें कुमार ॥
खेळतां दत्त गूढवर । झाले प्रसन्न नागनाथा ॥१॥

सिद्धि देऊन गेले दत्त । मग चमत्कार घडत ॥
नागनाथ जें जें वदत । तें तें प्रत्यक्ष पानावर ॥२॥

मुलें जेवून होती तृप्त । म्हणून घरीं न जेवीत ॥
घरचे मंडळीस सांगत । खेळांत भोजन नाथ देतो ॥३॥

हळु हळु कोशधर्मासी । हें कळतां पुसे पुत्रासी ॥
बाळ सांगे दत्तें मजसी । सिद्धि अंश दिला असे ॥४॥

आणि सांगे जें जें घडलें । कोशधर्म गहिंवरले ॥
म्हणती तुझें दैव चांगलें । परोपकार करावा ॥५॥

मग नागनाथ सदोदित । मनोभावें तसा वागत ॥
पसरतसे हें नगरांत । इच्छाभोजन नाथ देती ॥६॥

बरवीं मिळती पक्वान्नें । मग लोक घरची अन्नें ॥
न जेवितां नाथपक्वान्नें । सदा जेविती पोटभरी ॥७॥

धनवस्त्र आणि भोजन । नागनाथ सर्वां कारण ॥
देत असे तेणें करून । किर्ती त्याची वाढतसे ॥८॥

मग कांहीं कालानंतर । पित्यास करी नमस्कार ॥
आणि विचारी गूढवर । श्रीदत्त कोठें राहती ॥९॥

तो सांगे तवभाग्य थोर । म्हणून भेटलें गुरुवर ॥
त्यांचें भ्रमण निरंतर । नाना स्थानीं होत असे ॥१०॥

मातापूर पांचाळेश्वर । पंढरपूर कोल्हापूर ॥
वाराणसी मेरूशिखर । सह्यागिरी व गिरनारीं ॥११॥

वगैरे सांगून पिता जात । नित्य काम असे करीत ॥
दत्त दर्शनासाठीं चित्त । नागनाथांचें आतुरलें ॥१२॥



मग कवणा न सांगतां । दत्तदर्शना झाला जाता ॥
करी पूसतपास पत्ता । त्याला कोणी न सांगती ॥१३॥

फिरत फिरत कोल्हापुरांत । येऊन लोकां पुसे मात ॥
येथें वसती श्रीगुरुदत्त । त्यांचें स्थान मज दावा ॥१४॥

लोक सांगती श्रीदत्त येती । येथें भिक्षान्न रोज घेती ॥
परंतु न कळे आम्हांप्रती । नानावेष धरिती ते ॥१५॥

नागनाथें केला विचार । ते सिद्धिअन्न न घेणार ॥
तरी सकळ नारीनर । भोजनासाठीं बोलावुया ॥१६॥

महालक्ष्मी करवीरांत । तिचें दर्शन नाथ घेत ॥
आणि पूजाऱ्यासी म्हणत । गांवजेवण घालावें ॥१७॥

करून सर्वही तयारी । आमंत्रण सांगे पूजारी ॥
सर्व माणसें पोटभरी । इच्छाभोजन रोज करिती ॥१८॥

घरचें रांधप बंद झालें । भिक्षेकऱ्या लोक म्हणाले ॥
गांवजेवण नित्य चाले । तिकडे जावें अंबालयीं ॥१९॥

लोकां सांगे भिक्षेकरी । भिक्षान्न मला प्रिय भारी ॥
तुम्ही जातां भोजना तरी । धान्यभिक्षा मज घाला ॥२०॥

यापरी एक मास गेला । नाथ विचारी मग लोकांला ॥
कोणी येतसे का भिक्षेला । लोक म्हणती होय होय ॥२१॥

कोरान्न घेई भिक्षेकरी । असें ऐकतांच सत्वरी ॥
नाथ दत्तस्मरण करी । विनवी दर्शन द्यावया ॥२२॥

नागनाथ लोकां सांगती । भिक्षेकरी दावा मजप्रती ॥
दुसरें दिनीं लोक दाविती । तेव्हां जाती नाथ तिकडे ॥२३॥

अकस्मात चरण धरी । स्तवूं लागले नानापरी ॥
कृपा करावी मजवरी । म्हणे कष्टलों कळे तुम्हां ॥२४॥

मग दत्त कृपाहस्तानें । नाथा कुरवाळी प्रेमानें ॥
डोळे भरलजे प्रेमाश्रूनें । दत्तभेटींत आनंद ॥२५॥

दत्त नाथास एकांतांत । नेऊन प्रेमें ज्ञान देत ॥
आपणासम त्या करीत । गेले काशीस घेऊन ॥२६॥

पुढें बद्रिकाश्रमीं जात । सुमनें वर देव अर्पित ॥
तेथें नाथा तपा बसवीत । आणि स्वठायीं दत्त गेले ॥२७॥

द्वादश वर्षें तप केलें । दत्तें प्रकटून आलिंगिलें ॥
कृतार्थपूर्ण त्यासी केलें । सांगती जावें तीर्थाटना ॥२८॥

ते वटसिद्ध नागनाथ । नाथदीक्षा घेऊन नाथ ॥
बनून तीर्थयात्रा करीत । बालेघाटीं स्थिर झाले ॥२९॥

दर्शना नाना लोक येती । नाथांकडे वाढली वस्ती ॥
त्या गावांस नांव ठेविती । वडवाळ हें प्रेमानें ॥३०॥

तीर्थें करीत मच्छिंद्रनाथ । येते झालें सहज तेथे ॥
नागनाथा भेटण्या जात । परी शिष्य अडविती ॥३१॥

साधुदर्शना अटक असत । ही व्यवस्था योग्य नसत ॥
म्हणून शिष्यां शिक्षा करीत । शिष्य येती अन्यही ॥३२॥

स्पर्शअस्त्र नाथ जपती । सर्व शिष्य भूमीस डसती ॥
त्यांना मच्छिंद्र मार देती । शिष्य रडती मोठ्यानें ॥३३॥

नागनाथांचें ध्यान भंगत । समाधि मग उतरीत ॥
बाहेर येऊन पहात । मच्छिंद्र ताडी शिष्यांना ॥३४॥

नागनाथ मनीं म्हणती । साधु नाथपंथी दिसती ॥
आणि शिष्यां ताडन करिती । दया अंतरीं दिसेना ॥३५॥

म्हणून शिक्षा करणें यास । असें ठरवून बंध देवांस ॥
घाली अडकी गरुडास्त्रास । विभक्त अस्त्र प्रेरीतसे ॥३६॥

शिष्य सुटून पळत येती । नाथापाठीं सर्व रिघती ॥
दोघेही नाथ युद्ध करिती । नाटोपती ते अेकमेकां ॥३७॥

केले देवतांना बंधन । म्हणून मच्छिंद्रमंत्र क्षीण ॥
नागनाथें सर्पास्त्र सोडून । मच्छिंद्राला चावविलें ॥३८॥



गरुडास्त्रा असे बंधन । मच्छिंद्र करी दत्तस्मरण ॥
नागनाथें त्या सोडवून । युद्ध आंवरी सत्वर ॥३९॥

आदरें पुसे आपण कोण । मच्छिंद्र स्वनाम सांगून ॥
म्हणे दीक्षा प्रथम देऊन । दत्तरायें कृपा केली ॥४०॥

उभय नाथ आनंदती । एकमेकांस गौरविती ॥
नाथा पुसून मच्छिंद. जाती । द्वारपहारा दूर झाला ॥४१॥

तेथें कवण जरी मेला । नागनाथ उठवी त्याला ॥
यमविनंती करी विधीला । त्याची भीड नाथा पडे ॥४२॥

मग बंद असा प्रकार । शिष्यगण वाढे अपार ॥
रोग-विषबाधा-उतार । होतसे नाथस्थानांत ॥४३॥

बहुत प्रकारें लोकहित । व्हावा असा हेतु असत ॥
म्हणून तसे मंत्र रचीत । नाथ समर्थ नागनाथ ॥४४॥

नाथ वटसिद्ध नागनाथ । दत्तकृपें पूर्ण समर्थ ॥
सफळ करी मनोरथ । त्यांना नमस्कार असो ॥४५॥

नानास्थानीं साधु असती । लोकोपकार सदा करिती ॥
मनीं सद्‌गुरुदत्तमूर्ती । स्मरून आदरें वागावें ॥४६॥

पिप्पलायन नारायण । विधिवीर्यें अवतरून ॥
दर्भ मुळांत बाळ होऊन । प्रकटे पुनीत गांवांत ॥४७॥

भागीरथी नदी पावन । सत्यश्रवा आचारवान ॥
ग्रामजोशी करी गमन । दर्भ आणण्या नदीकांठीं ॥४८॥

तेथें सुंदर बाळ रडत । इच्छी न्यावया घराप्रत ॥
पण पातक मनीं येत । अन्याचें बाळ नेऊं कसें ॥४९॥

असें म्हणून जाई निघून । पुष्टवृष्टि नभामधून ॥
बाळावर पडे ती पाहून । म्हणे देव न दिसती ॥५०॥

देववाणी विप्र अैकत । बाळा घेऊन जावें त्वरित ॥
भूतचेष्टा द्विजा भासत । आणि पळे तो घराकडे ॥५१॥



मग नारदा देव धाडिती । ते विप्रवेषें द्विजा सांगती ॥
बाळवेषें सिद्ध जन्मती । नि:शंक पालन करावें ॥५२॥

विमानीं देवांस पाहून । द्विज पावला समाधान ॥
विप्राकडे बाळ देऊन । चरपटी नांव ठेवावें ॥५३॥

असें सांगून नारद जाती । बाळा घेऊन ब्राह्मण येती ॥
भार्येकडे देऊन माहिती । सांगतां पत्नी आनंदली ॥५४॥

सत्यश्रवा नसे संतान । बाळा पाळिती संतोषून ॥
चर्पटीचें उपनयन । उक्तकाळीं विप्र करी ॥५५॥

बाळ करी विद्याध्ययन । पण शिवनारदमन ॥
त्याच्यावर असे खिळून । सांगती दत्ता उपदेशिण्या ॥५६॥

त्यांना दत्त उत्तर देती । उद्विग्न करून बाळाप्रती ॥
बोध ठसेल त्याचे चित्तीं । तरी त्यापरी आणावा ॥५७॥

ठीक आहे म्हणे नारद । बाळवेष घेई समोद ॥
ब्राह्मणाचें नमूद पद । प्रार्थीविद्या शिकवाया ॥५८॥

कुलंब स्वनाम सांगत । सत्यश्रवा मनीं तोषत ॥
पुत्रशिष्या तो पढवीत । शिक्षण उत्तम होतसे ॥५९॥

पुढें एकदां यजमानकृत्य । करण्या त्यांना विप्र धाडीत ॥
पुत्रशिष्य सांग करीत । यजमान देई दक्षिणा ॥६०॥

ती थोडी चर्पटी म्हणाला । यजमानाशीं तंटा चालला ॥
तें सांगण्या सत्यश्रवाला । कुलंब घरीं येतसे ॥६१॥

नंतर ब्राह्मणें जाऊन । श्रीमुखांत भडकावून ॥
चर्पटीस बोल लावून । दक्षिणाभांडण मिटविलें ॥६२॥

परंतु चर्पटी रागावून । दुर्गामंदिरीं दूर जाऊन ॥
एकांतांत करी चिंतन । नारदा संधि सांपडली ॥६३॥

नारद घेई विप्रवेष । दुर्गालयीं करी प्रवेश ॥
देउळीं फिरे सावकाश । भगवतीस नमूनियां ॥६४॥

तेथें त्याला चर्पटी दिसला । त्याला पुसें तूं कोण बाळा ॥
चर्पटी त्याला सांगता झाला । दक्षिणेचें वृत्त सर्व ॥६५॥

विप्र म्हणे बरें न केलें । व्यर्थ बाळा ताडन केलें ॥
प्रेमें करून वागविलें । पाहिजे मुलांस सर्वदा ॥६६॥

तरी मला असें वाटतें । जाऊं नये पितृगृहातें ॥
कोठल्यातरी तूं क्षेत्रातें । जाऊन विद्या शिकावी ॥६७॥

हें ऐकतां विप्रवचन । चर्पटी पावला उत्तेजन ॥
म्हणे मी तसेंच करीन । परंतु मन गोंधळतें ॥६८॥

कुलंबमित्र असे घरीं । तो जरी सांगे यापरी ॥
तरीच निश्चय सत्वरी । माझ्या मनाचा ठसे दृढ ॥६९॥

चर्पटीचें हें वचन । ऐकून वदे तो ब्राह्मण ॥
तूं येथें असशी म्हणून । कुलंबा मी कळवितों ॥७०॥

मग तो येईल तुझ्यापाशीं । करून सर्व विचारासी ॥
ठरवून शिकणें विद्येसी । मी निघतों मम गृहीं ॥७१॥

असें सांगून बाहेर पडे । कांहीं वेळानें चर्पटीकडे ॥
कुलंब बनून मागें पुढें । बघीत बघीत पातला ॥७२॥

चर्पटी सांगे कुलंबास । नको राहुया या गावांस ॥
दुसऱ्या ठायीं विद्याभ्यास । करण्यास आम्ही जाउया ॥७३॥

कुलंब म्हणे याचपरी । मला वाटतें खरोखरी ॥
आम्ही जाउया काशीपुरीं । आणि विद्या शिकूया ॥७४॥

तसे दोघे जाण्या निघती । कुलंब म्हणे मार्गाप्रती ॥
बद्रिकेदार हिमाद्रिक्षेत्रीं । आधीं जाऊन शिवा नमूं ॥७५॥

मग जाउया काशीपुरीं । चर्पटी म्हणे तसें करीं ॥
मग दोघे बद्रिकेदारीं । हळु हळु ते पोंचले ॥७६॥

तेथें होते शंकर दत्त । त्यांना दोघे भावें नमीत ॥
कुलंब नारद बनत । सांगे बाळा मूळ कथा ॥७७॥



प्रार्थून सांगे दत्तराया । उपदेश करा बाळास या ॥
दत्तें बोध करून तया । बारा वर्षे तपा बसवी ॥७८॥

मग तप पूर्ण करून । नाथदीक्षा त्या देऊन ॥
कर म्हणती तीर्थाटन । श्रीदत्त गेले गिरनारीं ॥७९॥

चर्पटी येथील तीर्थे करी । वासना उदेली अंतरीं ॥
मणिकार्णिका तीर्थ थोरी । त्याचें स्नान करावें ॥८०॥

हिमालय उल्लंघीतसे । तेथें नारद भेट होतसे ॥
नारद सकळ दावीतसे । ब्रह्मलोकीं ते गेले ॥८१॥

ब्रह्मदेवा नमन केलें । मनींचे सर्व सांगितलें ॥
विधि बहुत संतोषले । म्हणती रहा येथें सुखें ॥८२॥

पर्वकाळीं करुया स्नान । चर्पटीचें संतुष्ट मन ॥
नारद दावी नंदनवन । स्वर्गादि लोकीं फिरती ते ॥८३॥

तेथील फळें दोघे खाती । चांगलीं फुलें घेऊन जाती ॥
विधिपित्यापुढें ठेविती । देवपूजा करावया ॥८४॥

एकदां वनींचे इंद्रदूत । पाळतीनें नाथा धरीत ॥
नारद गुप्तपणें पहात । दूत ताडिती नाथाला ॥८५॥

त्यामुळें चर्पटी खवळून । मंत्र जपे वाताकर्षण ॥
रक्षकांचा प्राण गळून । निचेष्टित ते पडले ॥८६॥

इंद्र धाडीं युद्धास देव । त्यांना नाथ करी निर्जीव ॥
मग धावून इंद्राव । गौरीशंकरा प्रार्थीतसे ॥८७॥

गणांसह शिव कोपून । युद्धार्थ केलें आगमन ॥
परी सर्व विकळप्राण । वृत्त कळलें विष्णूसी ॥८८॥

सामुग्रीसह ते युद्धास । येतां चर्पटीस संतोष ॥
जपून नाथ मोहनास्त्र । विष्णुचक्रा गोंधळवी ॥८९॥

विष्णुअंश नाथ असत । चक्र आलें नाथकरांत ॥
विष्णु आश्चर्यानें पहात । वाताकर्षण नाथ जपे ॥९०॥



विष्णु पडले निचेष्टित । नारद होते तेथें गुप्त ॥
नाथ अलंकार घेत । विष्णूचे काढून आपणां ॥९१॥

शंख चक्र गदा पद्म । घेऊन नाथ पुरुषोत्तम ॥
वैजयंतीमाला परम । शोभे कौस्तुभमणीही ॥९२॥

मुकुट घाली डोक्यावरी । नटे विष्णूच्या अलंकारीं ॥
जाऊन पित्या नमस्कारी । तो आलिंगी कौतुकानें ॥९३॥

नाथ सांगे सर्व माहिती । ब्रह्मदेव उदास होती ॥
त्यांचेसाठीं नाथ निघती । रणीं येऊन मंत्र काढी ॥९४॥

मग सावध झाले अमर । नाथासह विधिसत्वर ॥
शिव विष्णूस नमस्कार । करून कथिली माहिती ॥९५॥

चर्पटनाथ पिप्पलायन । अलंकार करी अर्पण ॥
विष्णु सांगती संतोषून । महिमा तुझा वाढविला ॥९६॥

देवांचा गर्व घालविण्यास । योजिली ही युक्ति विशेष ॥
नारद पावून संतोष । प्रकटून गाई प्रेमानें ॥९७॥

मग सर्व स्वठाया जाती । विधि-नारदासह जती ॥
मणिकर्णिका स्नान करिती । पर्वकाळीं स्वर्गलोकीं ॥९८॥

देवांचा प्रेमें निरोप घेती । पाताळांतही नाथ जाती ॥
बलिस्वागत स्वीकारीती । नमिती वामना नाथ मुदें ॥९९॥

मग भारतीं नाथ फिरती । दत्तांसह त्यांना प्रणती ॥
अडतिसावा अध्याय घेती । श्रीदत्त प्रेमें भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय ३९ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

नव योगेश्वर विरक्त । लोकोद्धारा पुन्हां जन्मत ॥
त्यांचे गुरु आत्रेय दत्त । नाथपंथ जगीं शोभे ॥१॥

चालू मन्वंतर वेवस्वत । आदियुगीं दत्त जन्मत ॥
तसे याही मन्वंतरांत । अत्रिपुत्र श्रीत्रैमूर्ती ॥२॥

मागील सहा मन्वंतरांत । दत्तलीला ज्या ज्या घडत ॥
त्या त्या बहुतेक गुप्त । चालू मनूंतील मिळती ॥३॥

स्वायंभुव मन्वंतरांत । अत्रिपुत्र श्रीगुरुदत्त ॥
तसे दुर्वासचंद्र जन्मत । त्यांना नमस्कार असो ॥४॥

स्वारोचिष मन्वंतरांत । सप्तर्षींत दत्त असत ॥
शाश्वत श्रीसद्गुरुदत्त । जगदोद्धारक नारायण ॥५॥

वैवस्वत मन्वंतरांत । सोम राजा वलिष्ठ होत ॥
राजसूय यज्ञ करीत । त्याचा प्रसिद्ध चंद्रवंश ॥६॥

त्या वंशीं राजकुलांत । दत्तकृपाझरा वहात ॥
तसेच इतर भक्त तरत । नित्य तारक दत्तगुरु ॥७॥

त्यांच्या कथा केल्या कथन । पुढें नाथपंथ गहन ॥
दत्तगुरु प्रज्ञानघन । शिवसद्गुरु ब्रह्ममय ॥८॥

प्रकाशरूपीं श्रीगुरुदत्त । भक्तजना रूप दावीत ॥
इहजन्मींच्या जीवनांत । दत्तलोकवास घडे ॥९॥

मग परत या लोकांत । नरदेहानें कार्यरत ॥
भवबंध गांठ सुटत । श्रीदत्तबोध ठसतसे ॥१०॥

शिवस्वरूप ज्ञानमय । दत्तात्रेय आनंदमय ॥
नानारूपीं नटे अद्वय । त्यांना नमन करावें ॥११॥

कोठें केव्हांहीं जें चांगलें । तें घेऊन वागणें भलें ॥
मनीं विरक्ति असल्यामुळें । मधुविद्या दे ब्रह्मपद ॥१२॥



हा दत्तपंथ सनातन । भूत भविष्य वर्तमान ॥
कालीं अमर चिरंतन । इहपर क्षेम करणारा ॥१३॥

नाथां उपदेशिती दत्त । त्यामुळें नाथ बळवंत ॥
जाती तेथें गौरव होत । गुरूकृपेच्या सामर्थ्यें ॥१४॥

लोकां नेण्या सत्यसुखासी । साधुसंत येत जन्मासी ॥
झिजविती सदा स्वदेहासी । लोककल्याण करावया ॥१५॥

नाथांचें सामर्थ्य अद्भुत । देवराजा इंद्र सचिंत ॥
गुरु बृहस्पतीला पुसत । उपाय काय करावा ॥१६॥

गुरु सांगती मग इंद्रास । करावा सोमयाग विशेष ॥
मग सांगेन विद्याभ्यास । कसा करावा नाथांकडे ॥१७॥

नाथांचा गौरव करावा । मुख्य मच्छिंद्र संतोषवावा ॥
उपरिचर वसु धाडावा । मग तो आणील सर्वांना ॥१८॥

इंद्रें वसूला पाठविलें । बहुनाथ त्यानें पाहिले ॥
बद्रिकाश्रमीं होते जमले । तेथें वसु उतरती ॥१९॥

मच्छिंद्र करी नमस्कार । सांगूं लागे उपरिचर ॥
स्वर्गांत इंद्र देववर । सोमयाग करूं इच्छी ॥२०॥

त्याचे मनीं नाथआदर । तरी सर्वां घेऊन सत्वर ॥
निघावें आलों येथवर । तुम्हां नेण्यास प्रेमानें ॥२१॥

अैकून मच्छिंद्र पुसत । अन्य तेथें नाथ असत ॥
त्या सर्वांनीं त्या यज्ञाप्रत । जाण्या रूकार दिलासे ॥२२॥

मच्छिंद्र गोरक्ष जालिंदर । कानिफ चौरंगी इतर ॥
गोपीचंदासह सत्वर । विमानीं बसती जावया ॥२३॥

हेलापट्टणीं ते जाऊन । गोपीचंदमाते घेऊन ॥
वडवाळांत ये विमान । नागनाथास न्यावया ॥२४॥

गौतमीतीरीं भर्तृहरी । चर्पटीस अवंतिपुरीं ॥
विट्यांत विमान लौकरी । रेवणनाथा घेतसे ॥२५॥



गहिनीनाथकरवीरांत । सशिष्यनाथ विमानांत ॥
विमान पोंचे स्वर्गलोकांत । देवेंद्र उत्तम सत्कारी ॥२६॥

मच्छिंद्रनाथ बृहस्पती । यज्ञाची जागा ठरविती ॥
सिंहलद्वीपीं स्थान चित्तीं । अटवरानीं योजिलें ॥२७॥

तिकडे सर्व यागा जाती । देवेंद्र यजमान होती ॥
देवगुरुची नामी युक्ती । शिष्यकल्याण मनांत ॥२८॥

बृहस्पति मंत्र म्हणती । नाथ आहुति घालिती ॥
यज्ञकार्य योग्य करिती । नाथमच्छिंद्र मनीं म्हणे ॥२९॥

मैनाकिनी किळोतळा राणी । सिंहल द्विपीं असे स्वस्थानीं ॥
पुत्रासह तिला आणोनी । मीननाथा शिकवावें ॥३०॥

मग तशी व्यवस्था करी । तींही संतोषती अंतरीं ॥
मीननाथास विद्या सारी । एका बाजूस शिकविती ॥३१॥

तोच गुरुचा हेतु होता । गुरु म्हणती इंद्रा आतां ॥
स्वत: उठून पाही सिद्धता । कमी कांहीं पडूं नये ॥३२॥

इंद्र सोडी यज्ञकंकण । उपरीचरा तें बांधून ॥
यज्ञकार्य चालू करून । इंद्र तयारी करीतसे ॥३३॥

गुरुसंकेत ओळखून । मच्छिंद्र देतसे शिक्षण ॥
त्या बाजूस इंद्र जाऊन । मयूरवेष धरीतसे ॥३४॥

झाडावर गुप्त बसून । नाथविद्या घेई शिकून ॥
त्यांचीं अस्त्रें विशेष दोन । वाताकर्षण, स्पर्शास्त्र ॥३५॥

गुरुकृपें तीं मिळवून । इंद्र पावला समाधान ॥
सोमयागही पूर्ण करून । नाथां गौरवी देवेंद्र ॥३६॥

मग जोडून दोन्ही हात । इंद्र नाथां असे स्तवीत ॥
म्हणे अपराधी मी अनंत । तुम्ही समर्थ कृपाळू ॥३७॥

विद्या शिकलों मी चोरून । परी आपुल्या पदीं लीन ॥
आहें शरण, शाप दारुण । देऊं नका क्षमा करा ॥३८॥

सर्वही नाथ क्रोधावती । इंद्रा कपटपटू म्हणती ॥
उपरीचर मध्ये पडती । गुरु शांतविती सर्वांसी ॥३९॥

मग नाथ होती प्रसन्न । मच्छिंद्र देती आश्वासन ॥
नाथां विरोध न करून । बारावर्षे करणें तप ॥४०॥

इंद्रानें हें मान्य करून । सह्यपर्वतावर येऊन ॥
द्वादशवर्षे तप करून । विद्या सफल केलीसे ॥४१॥

तपसांगतां उदक सोडून । इंद्र जात स्वर्गीं निघून ॥
मणिकर्णिका जल घेऊन । नदी पावन होतसे ॥४२॥

इंद्रतपाचें शुद्धपाणी । नदीचें नांव इंद्रायणी ॥
भीमरथीस ती मिळोनी । लोकोद्धार करीतसें ॥४३॥

इंद्रा अटींचे वरदान । देऊन भारतीं आगमन ॥
शिष्यांसह नाथां नमन । करितां नाथ संतोषती ॥४४॥

मच्छिंद्रनाथांस देवता वश । तशाच इतर नाथांस ॥
साबरी मंत्र विशेष । अनुभव येई सत्वर ॥४५॥

सकळजनां सौख्य व्हावें । हें नाथांचें ध्येय बरवें ॥
तेंच ध्येय सर्वांनीं घ्यावें । लोक सुखी करण्याचें ॥४६॥

गर्भगिरींत मच्छिंद्रनाथ । जालिंदर कानिफनाथ ॥
जवळची गहिनीनाथ । यांचीं समाधिठिकाणें ॥४७॥

विटेगांवीं रेवणनाथ । वडवाळांत नागनाथ ॥
गिरनारीं गोरक्षनाथ । पाताळभुवनीं भर्तरी ॥४८॥

गोपीचंद धर्मनाथ । मैनावतीसह वैकुंठांत ॥
मीननाथ स्वर्गलोकांत । परन्तु नाथ चिरंजीव ॥४९॥

चर्पटी चौरंगी अडबंग । हेही धरिती दिव्यांग ॥
नाथस्थानें जगीं अथांग । भक्तां अनुभव येतसे ॥५०॥

सर्वही नाथ प्रकटून । अथवा प्रेरणा करून ॥
नित्य तारिती भक्तजन । मागें आतां पुढें ही ॥५१॥



नाथ शिष्य परंपरेंत । अजून साक्षात्कारीं संत ॥
ठायीं ठायीं प्रकट होत । लोकां आधार वाटतसे ॥५२॥

त्या सर्वांना असो नमन । त्यांचें ग्रंथा आशीर्वचन ॥
नाथांसह दत्तभगवान । असती तारक भक्तांना ॥५३॥

श्रीनवनाथ भक्तिसार । श्रीनाथ लीलामृत सुंदर ॥
श्रीदत्त प्रबोध मनोहर । श्रीदत्त ग्रंथां नमन असो ॥५४॥

श्रीदत्तांचा मोठा महिमा । त्याच्या दासा नसे उपमा ॥
कोणा केव्हां दाविती प्रेमा । नकळे, त्यांना नमस्कार ॥५५॥

सकळ संशय सांडून । भावें स्मरा दत्तचरण ॥
सर्व कामना पुरवून । शाश्वत सुखीं नेईल ॥५६॥

भक्ति करावी दृढतर । मग अनुभव सत्वर ॥
देखून श्रीदत्त दिगंबर । विश्वास मना वाटतो ॥५७॥

त्यांचें चरित्रची गहन । कोणा नकळे वर्तमान ॥
ते सर्वदा भक्तां कारण । इष्ट सर्व देत असती ॥५८॥

त्यांसी भजावें आदरानें । सदोदित हर्षित मनें ॥
भाव तयावरी ठेवणें । मग उपेक्षा न करीच ॥५९॥

सर्वसुखा सदा झटावें । दत्तसाह्य मागत जावें ॥
हें वर्तन असे बरवें । श्रेष्ठ धर्म हा असे ॥६०॥

देवानें ब्रह्मांड निर्मिलें । त्यासी वागवी तो स्वबळें ॥
आम्ही सकळ त्याचीं मुलें । आईबाप तो सकळां ॥६१॥

त्याच्यासम दयाळू कोणी । मिळत नसे त्रिभुवनीं ॥
त्याची भक्ति भावें करोनी । अनुभव घ्यावा लोक हो ॥६२॥

तो भावाचा सदा भुकेला । सर्वां नेई सत्यसुखाला ॥
स्मरणेंच मुक्ति सर्वांला । देतसे तो सदोदित ॥६३॥

इहपर सुख मिळावें । योग्य धर्मे सदा वागावें ॥
हें साधण्या सदा बरवें । दत्तस्मरण करा सदा ॥६४॥



कोणा वाईट इच्छूं नये । कोणा वाईट करूं नये ॥
जरी एकदम न होये । तरी दत्ता स्मरावें ॥६५॥

दृढभावें भजतां त्यासी । दत्त दावी सत्यमार्गासी ॥
प्रत्यय येतंसे भक्तांसी । आजवरी अभंग हा ॥६६॥

परधन पराची कांता । विषासम माना सर्वथा ॥
चिंतून दत्ता टाका चिंता । त्यामुळें शांती मिळेल ॥६७॥

लोकां करावा उपदेश । परी आधीं हवा आदेश ॥
तो मिळाया ईशसंदेश । दत्तभक्ति करा बरी ॥६८॥

आपण तरोनी इतरां । ताराया भक्तिमार्ग बरा ॥
अभंग प्रेमें मार्ग धरा । अवधूतभक्ति उत्तम ॥६९॥

जसा दत्त आदेश देई । त्यापरी सदा वागा पाहीं ॥
मग कोणाचा भय नाहीं । सत्यसुख सुखें मिळे ॥७०॥

दत्तभक्ति दृढ करील । तर असें सत्य होईल ॥
येथें शंका कोणी धरील । तर फसेल ध्यानीं घ्या ॥७१॥

सर्व जनांसी सुख व्हावें । शुद्ध मनें सदा वागावें ॥
कळे त्यांत योग्य करावें । दत्तभक्ति सोडूं नये ॥७२॥

ज्यापरी भक्ति होत जाई । त्याप्रमाणें समजत राही ॥
सत्यमार्गे तो सत्य जाई । शाश्वत सुखा पोंचेल ॥७३॥

नित्य अनुभव येईल । भक्तमनां खूण पटेल ॥
भावें दत्तगुण वर्णील । त्या रक्षील गुरुदत्त ॥७४॥

श्रीदत्त चिंतन करावें । दत्तचरित्र आठवावें ॥
प्रेमानें वाचावें ऐकावें । भावें तरावी भवनदी ॥७५॥

भक्तांचें इष्ट देवोनिया । सर्वजनां सुखवावया ॥
आत्मसुखासी त्यां न्यावया । श्रीदत्त घेती अवतार ॥७६॥

श्रीपाद श्रीवल्लभ मूर्ती । श्रीनरसिंह सरस्वती ॥
राखिती वैदिक संस्कृती । भक्तां तारिती सर्वकाळीं ॥७७॥

यवनमय हा भारत । व्हावयाचा समय प्राप्त ॥
वैदिक आचार लोपत । अशा काळचे अवतार हे ॥७८॥

सर्व अेकच भगवंत । करी सर्व जीवांचें हित ॥
म्हणून नाना साधुसंत । यांचे पंथीं विरोध नको ॥७९॥

सर्व नद्या समुद्रीं जाती । तसे नाना पंथ असती ॥
त्यांच्या धर्मीं कलह नसती । पण शिष्यांत भांडणें ॥८०॥

हें नव्हेची कदा इष्ट । देवांस करी भाव तुष्ट ॥
पूरक वर्तन हवें स्पष्ट । इहपर सौख्य होतसे ॥८१॥

सर्व सत्ता परमेश्वरी । श्रीगुरुदत्त गिरनारीं ॥
अवतरून सर्वां तारी । सांगे वागावें शुद्धभावें ॥८२॥

पीठापूर कुरवपूर । कारंजनगर औदुंबर ॥
नृसिंहवाडी गाणगापूर । अवतार स्थानें पवित्र ॥८३॥

येथे सर्वदा सेवेकरी । सेवा करिती नानापरी ॥
त्यांच्या वासना पूर्ण करी । सदोदित श्रीदत्तगुरु ॥८४॥

त्यांच्या कृपाकटाक्षानें । मुका होता गुरुप्रमाणें ॥
त्यांची लीला कोणी न जाणे । श्रीदत्त गूढ अतर्क्य ॥८५॥

श्रीनृसिंह सरस्वती । गाणगापुरांहून निघती ॥
पुढें श्रीशैलपर्वतीं । गेले चार शिष्यांसह ॥८६॥

सायंदेव शिष्य त्यांतील । त्यांचें वंशीं भक्त प्रेमळ ॥
सरस्वती गंगाधर बाळ । नामधारक प्रसिद्ध ॥८७॥

त्यांना चौथे शिष्य भेटती । प्रेमें गुरलीला सांगती ॥
भक्तिभावें करूं प्रणती । सिद्धनामधारकांना ॥८८॥

करावयास लोकोद्धार । गुरुचरित्र ग्रंथ थोर ॥
लिहिती सरस्वती गंगाधर । प्रसादपूर्ण गुरुकृपें ॥८९॥

गुरुचरित्र ग्रंथ शुद्ध । देई भक्तां आनंदकंद ॥
त्याची थोरवी सुप्रसिद्ध । जाणती भक्त श्रद्धेनें ॥९०॥



त्यांत श्रीपादनृसिंहयती । यांच्या लीला मुख्य असती ॥
भक्तां सुखवूं नको खंती । असें सांगून गेले गुरु ॥९१॥

इतुका कथाभाग असे । मग चरित्र घडतसे ॥
त्याचा संग्रह दिसतसे । श्रीगुरु लीलामृत ग्रंथीं ॥९२॥

श्रीनृसिंह सरस्वती । प्रकटून लोकां तारिती ॥
अक्कलकोटीं समाधि घेती । अक्कलकोट स्वामिराज ॥९३॥

शक तेराशें आंत बाहेर । झाले श्रीपादांचे अवतार ॥
श्रीनृसिंह सरस्वती थोर । भक्तां आधार शाश्वत ॥९४॥

त्यामुळें धीट नारी नर । पाळिती वैदिक आचार ॥
यवन राजेही सत्वर । बनती भक्त श्रीगुरूचे ॥९५॥

श्रीगुरु भक्त अगणित । विविध धर्मीं सांधुसंत ॥
श्रीसद्‌गुरुदत्तावधूत । परमात्मज्योति प्रकाशें ॥९६॥

शक अठरावे शतकांत । सकल मत-प्रस्थापित ॥
प्रभु माणिक श्रीगुरुदत्त । माणिकनगरीं शोभती ॥९७॥

श्रीवासुदेवानंद सरस्वती । वैदिक आचार संपन्न यती ॥
श्रीदत्त अवतार मूर्ती । सर्वां नमस्कार असो ॥९८॥

श्रीगुरुदत्तअवतार । योगी साधुसंत आधार ॥
नारीनर भक्त अपार । निर्भय चित्तीं दत्तकृपें ॥९९॥

योगेश्वर श्रीगुरुदत्त । करी आशीर्वचने तृप्त ॥
अेकोणचाळिसावा करीं घेत । अध्याय प्रेमें भक्तहिता ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु

# अध्याय ४० वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

भीमातीरीं गाणगापूर । नृसिंहयति दत्तावतार ।।
त्यांचे सायंदेव शिष्यवर । कडगंचीस राहती ।।१।।

त्यांचे वंशीं नामधारक । उदास होतां उद्भवे विवेक ।।
गुरुपद सेवावया निक । गाणगापुरा चालले ।।२।।

सदा करितो गुरभक्ति । पण संशय वसे चित्तीं ।।
गुरु काय देईल म्हणती । मार्गी बसती विश्रांतीस ।।३।।

त्या ठिकाणीं झोंप लागली । सिद्धरूपें गुरुमाउली ।।
स्वप्नीं येऊन विभूति लाविली । कृपाहस्तें अभय दे ।।४।।

नामधारक जागे होती । स्वप्नामुळें निरसे भ्रांती ।।
गहिंवरून प्रेमें निघती । पुढें भेटले गुरुशिष्य ।।५।।

ज्यापरी स्वप्नीं दिसे मूर्ती । त्यापरी ती सिद्धमूर्ती ।।
नामधारक सरस्वती । वेगें पाय धरीतसे ।।६।।

स्तुति आरंभी नानापरी । जयजयाजी कृपा करी ।।
मज ताराया लवकरी । आलांत देवा गुरुराया ।।७।।

आपण माझे अश्रयदाते । मला तारा कृपासरिते ।।
सत्य सत्य आशयदाते । कोठोनि आलां दयाळा ।।८।।

महाराजा आपुलें नाम । सांगा कृपाळा ठेवून प्रेम ।।
भक्तिभावें गुरुपादपद्म । वारंवार नमीतसे ।।९।।

सिद्ध म्हणे आपण योगी । फिरतों तीर्थें भूमि स्वर्गीं ।।
नृसिंह सरस्वती जगीं । प्रसिद्ध गुरु त्रिमूर्ती ।।१०।।

ज्याचें स्थान गाणगापुर । भीमाअमरजा संगमतीर ।।
श्रीदत्तमूर्ति यतिवर । श्रीनृसिंह सरस्वती ।।११।।

भक्त तारण्या सदोदित । अवतार घेती श्रीदत्त ।।
त्यासी ध्याती भक्त अमित । भवसागर तरावया ।।१२।।



ऐसा श्रीगुरुकृपासिंधु । भक्तजनां सदा वरदू ।।
अखिल सौख्य प्रियानंदू । देता होय शिष्यवर्गा ।।१३।।

त्याचे भक्तां नसे दैन्य । अखंड लक्ष्मी परिपूर्ण ।।
धनधान्यादि गोधन । अष्टैश्वर्ये नांदती ।।१४।।

त्यांसी नाहीं यमाचें भय । श्रीगुरु राखितो निर्भय ।।
इहपर कल्याण होय । त्यासी भजतां भक्ति भावें ।।१५।।

हें ऐकतां सिद्धवचन । नामधारक करी नमन ।।
आणि म्हणे आम्ही चरण । त्यांचेच ध्यातों वंशोवंशीं ।।१६।।

तरी मजला कष्ट होती । आपुल्या बोला विसंगती ।।
ऐकून त्यां सिद्ध सांगती । दृढनिश्चय मनीं हवा ।।१७।।

सदा धरून सात्त्विक शांती । कलिकाळाची खुंटे गती ।।
संशय असूं नये चित्तीं । अनन्यभावें भजावें ।।१८।।

वेदशास्त्र संमत असे । गुरु भजावा भरवसें ।।
श्रीगुरु शिष्या ज्ञान देतसे । अज्ञान जाळें निरसोनी ।।१९।।

गुरुशिवाय अन्य कोणी । थोर नसे बा त्रिभुवनीं ।।
खऱ्या प्रेमानें त्या भजोनी । आत्महिता साधावें ।।२०।।

विधिहरिहर कोपती । तरीही श्रीगुरु रक्षिती ।।
गुरु कोपांतून जगतीं । कधीं कोणीही न राखी ।।२१।।

गुरु जरी प्रसन्न झाला । तरी सर्वही मिळे त्याला ।।
तो खरोखर मुक्त झाला । गुरूची सरी न कोणा ।।२२।।

कल्पतरूची उपमा सान । तो देतसे इच्छेसमान ।।
परी गुरु शिष्यकल्याण । दक्ष राहुन नित्य करी ।।२३।।

आपणासम गुरु करिती । भजावें त्या लडिवाळ चित्तीं ।।
गुरुपदांवर आसक्ति । मनापासून असावी ।।२४।।

दृढभक्ति भूमि सखोल । गुरुकृपेचें पाणी विपुल ।।
वरवरची भक्ति उथळ । तेथें जल कसें टिके ।।२५।।



नामधारक पुसतसे । अनुभवाने मन विश्वासे ।।
तरी प्रत्यय शास्त्रीं वसे । तो सांगून मज तारा ।।२६।।

मग त्यासी सांगती सिद्ध । प्रत्यय ऐकावा प्रसिद्ध ।।
जेणें होईल मानस शुद्ध । पुराणांतरीं लिहिलासे ।।२७।।

पूर्वी गोदावरीचे तीरीं । ऋषि तप करिती थोरी ।।
त्यांत गुरु विख्यात भारी । वेदधर्म प्रसिद्ध जो ।।२८।।

त्याचे शिष्य असती फार । त्यांत दिपक शिष्य थोर ।।
एकनिष्ठेनें गुरुवर । श्रद्धा ठेवून वागतसे ।।२९।।

वेदधर्म शिष्यां पुसत । सांगा निर्भय आपुलें मत ।।
कांहीं कार्य करणें असत । संतोषून कोण करी ।।३०।।

आनंदें सर्व शिष्य म्हणती । आम्ही करूं प्रेमळचित्तीं ।।
शिरसावंद्य आम्हांप्रती । कार्य नि:शंक सांगावें ।।३१।।

गुरु वेदधर्म म्हणाले । तुम्ही शिष्य सकळ भले ।।
माझें पूर्वपाप उरलें । भोगिल्यावीण न संपे ।।३२।।

तपश्चर्या बहुत केली । तेणें पापा झाडणी झालीं ।।
परी पापपुंजी उरली । कांहीं भोगणें प्राप्त असे ।।३३।।

कुष्टें होईल अंगहीन । आंधळा पांगळा होईन ।।
सेवा करावी सांभाळून । अेकवीस वर्षे पर्यंत ।।३४।।

हें ऐकतां गुरुवचन । दीपक वदे सत्वर जाण ।।
मी तुमचें पाप भोगीन । गुरुजी तुम्ही न भोगा ।।३५।।

मग वेदधर्म सांगत । मीच भोगीन पाप सत्य ।।
पुत्रशिष्या योग्य नसत । आपलें आपण भोगावें ।।३६।।

सदा मला तूं सांभाळावें । हेंच कर्तव्य तूं करावें ।।
शिष्यकाम हेंच बरवें । गुरुशुश्रूषा करावी ।।३७।।

जरी रोगी असे मनुष्य । त्याच्यापेक्षां अधिक क्लेश ।।
प्रतिपाळणारा भोगी अवश्य । ऐक शिष्या संदीपका ।।३८।।

असें सांगून रोगी बनला । शिष्या नेई काशीपुरीला ॥
आनंदें सेवा करूं लागला । तीर्थयात्रा कदा न करी ॥३९॥

गुरुवस्त्रें उत्तम धूत । विष्ठामूत्र दूर टाकीत ॥
मशकादि जीवां निवारीत । रात्रंदिन सेवा करी ॥४०॥

विविध भिक्षान्न आणीतसे । भक्तिभावें भरवीतसे ॥
गुरु सांगती वागे तसें । मनीं क्लेश न करीच ॥४१॥

परी गुरु त्यासी वदत । न धुसी माझें विष्ठामूत्र ॥
शिष्या झालासी फार मस्त । मशकही तूं न वारिसी ॥४२॥

सांगे आणावीं अन्नें सुरस । तींही असावीं बहुवस ॥
तूं देतोसी मजला त्रास । अरे काय म्हणूं तुला ॥४३॥

वेदधर्म उत्तम ऋषी । परी जाहला पापदोषी ॥
पापी गुणांची स्थिति अशी । वोखट वाक्य पापाचें ॥४४॥

एकदां तो असेंही म्हणे । शिणसी तूं मजकारणें ॥
तवोपकार विसरणें ।शिष्या मला शक्य नाहीं ॥४५॥

गुरु बोले बरें वाईट । पण शिष्य न मानी वीट ॥
सदा वागे योग्यसा नीट । क्षेत्रही पहाण्या न जाई ॥४६॥

भक्ति गुरूची दृढ पाहून । विश्वेश सत्वर प्रसन्न ॥
संदीपकापुढें जाऊन । म्हणे इष्ट वर माग ॥४७॥

गुरुभक्ति करिसी छान । म्हणून मी तुला प्रसन्न ॥
दीपक म्हणे नमस्कारून । पुसून गुरूला सांगतों ॥४८॥

जाऊन विचारी गुरूसी । शंकर होऊन संतोषीं ॥
सांगती वर घ्यावयासी । आपोआप न प्रार्थितां ॥४९॥

तरी उपशम व्याधीसी । अथवा दुसऱ्या वरासी ॥
मागूं काय मी त्या शिवासी । श्रीगुरुराया सांगावें ॥५०॥

संदीपक गुरु म्हणती । वरें क्लेश जरी हरती ॥
तरी पापाची निष्कृती । पूर्णपणें होत नसे ॥५१॥



पापाची खुंटावया गती । पापभोग अवश्य असती ॥
जन्मांतरींही न बाधती । पाप संपतें भोगून ॥५२॥

हें ऐकतां गुरुवचन । सांगे शिष्य शिवा नमून ॥
गुरुआज्ञा नाहीं म्हणून । वर मागत मी नाहीं ॥५३॥

गुरुजी मला सर्व देतील । अैकुन शिष्याचे हे बोल ॥
शिव जाऊन देवां सकळ । कथी श्रेष्ठ गुरुभक्ति ॥५४॥

भगवान विष्णु नारायण । येऊन करिती निरीक्षण ॥
प्रसन्न होऊन भाषण । करिती दर्शन देऊन ॥५५॥

संदीपका तूं शिष्य धन्य । आजवरी न पाहिला अन्य ॥
उमाशंकर होसी मान्य । मलाही उत्तम वाटसी ॥५६॥

तरी कांहीं मागून घ्यावें । शिष्य नमून सांगे भावें ॥
नारायणें प्रसन्न व्हावें । अशी भक्ति माझी नसे ॥५७॥

जे करिती दिव्य तपासी । ते उदास नित्य मानसीं ॥
मी न स्मरें मुळींच तुजसी । परी प्रसन्न नवल गमे ॥५८॥

श्रीविष्णु आनंदें सांगती । करिसी तूं गुरूची भक्ती ॥
ती पाहून संतोष चित्तीं । माझीच भक्ति ती असे ॥५९॥

जे सेविती मातापित्यासी । स्त्रिया सेविती स्वपतीसी ॥
कोणी नर भल्या विप्रासी । सेवी तरी ती मम भक्ति ॥६०॥

यतियोगेश्वर तापसी । गो अतिथि साधु संतांसी ॥
सेवितां सर्व पोंचे मजसी । मानवतां चित्तीं हवी ॥६१॥

ऐकून सांगे संदीपक । भगवंता सांगतों अैक ॥
शिक्षण वेदशास्त्रदिक । सर्व आम्हां गुरु देती ॥६२॥

त्रैमूर्ति आमुच्या स्वाधीन । सकळ देव तीर्थें पावन ॥
मातापिता आनंदघन । सर्व कांहीं माझे गुरु ॥६३॥

हें ऐकतां दीपकबोल । विष्णु प्रसन्न प्रेमळ ॥
म्हणती कांही तरी बोल । देईन तुला निश्चयें ॥६४॥



दीपक म्हणे श्रीविष्णूसी । जरी देणार वर मजसी ॥
गुरुभक्ति अधिक मानसीं । होई असें ज्ञान द्यावें ॥६५॥

गुरूचें रुप मी ओळखें । यापरी ज्ञान देईं सुखें ॥
या परतें न मागें आणिकें । आणि चरणीं लागला ॥६६॥

तथास्तु म्हणे शार्ङ्गपाणी । अरे दीपका शिरोमणी ॥
मम सखा तूं पूर्णपणीं । क्षेम तुझें असावें ॥६७॥

तुवां ओळखिलें गुरूसी । तूं देखिलें परब्रह्मासी ॥
आणि जरी मातें पुससी । सांगतों स्वस्थ ऐकावें ॥६८॥

लौकिक सुबुद्धि बारे जशी । धर्माधर्म सुमनें तशीं ॥
उत्कृष्टांहुनी उत्कृष्टेसी । स्तुति करावी अहर्निश ॥६९॥

जे जे समयीं श्रीगुरूसी । तूं भक्तीनें स्तुति करिसी ॥
तेणें संतोष मम मानसीं । माझी स्तुतीच ती असे ॥७०॥

बोलताती वेदसिद्धांत । गुरुब्रह्म असें म्हणत ॥
तरी गुरु भजतां सत्य । सर्वदेवता वश होती ॥७१॥

गुरु शद्व अक्षरें दोन । अमृताचा समुद्र जाण ॥
त्याला भजे तो पूज्य मान । सर्वकाळीं सर्वस्थळीं ॥७२॥

यापरी विष्णु वर देती । दीपकाचा निरोप घेती ॥
शिष्य येतां गुरु पुसती । वैकुंठपतीनें काय दिलें ॥७३॥

गुरुला शिष्य कथी नमून । गुरुभक्ति व्हावी म्हणून ॥
मागितलें मी वरदान । तथास्तु भगवंत म्हणाले ॥७४॥

माझा भाव तुम्हां जडला । हें ऐकतां संतोष झाला ॥
वेदधर्म झाला चांगला । त्यासी पाप असे कैचें ॥७५॥

शिष्यपरीक्षा पहावयास । रोगी होऊन भोगी क्लेश ॥
शिष्य उतरे परीक्षेस । वर देतसे प्रसन्नपणें ॥७६॥

संदीपका तूं शिष्य थोर । काशीपुरीं रहावें स्थिर ॥
वश झाले तुला अमर । तुझ्या वचना सिद्धि असे ॥७७॥

नवनिधि तुझ्या घरांत । तुला स्मरतां कष्ट संपत ॥
सर्व सौख्य लाभे सतत । ऐकतां दीपक आनंदला ॥७८॥

दीपके केली दृढभक्ति । म्हणून गुरु वर देती ॥
श्रद्धा धरून तशी चित्तीं । नामधारका वागावें ॥७९॥

त्रिकरणासह मानसी । दृढभक्तीनें आत्मत्वासी ॥
पोचे भक्त ईशपदांसी । ईश्वर त्याच्या स्वाधीन ॥८०॥

असे ऐकतां सिद्धबोल । नमी नामधारक बाळ ॥
म्हणे शंका माझी सकळ । आपण आज फेडिली ॥८१॥

गुरुभक्तीचें तत्त्व कथिलें । माझें मानस आनंदले ॥
तव वृत्त सांगा सगळें । आर्जवें दास करा म्हणे ॥८२॥

कृपासमुद्र सिद्धमुनी । नामधारका आलिंगोनी ॥
प्रेमें आशीर्वाद देवोनी । सांगे आपुला वृत्तांत ॥८३॥

सदा तीर्थयात्रा करणें । ग्रास आम्हां गुरुस्मरणें ॥
श्रीगुरुसी सदा सेवणें । म्हणून पुस्तक दाखविलें ॥८४॥

भुक्तिमुक्ति परमार्थ । जें जें वांछी आपलें चित्त ॥
तें तें देई गुरुचरित्र । लक्ष सर्वदा तेथें हवें ॥८५॥

धनार्थी त्याला मिळे धन । पुत्रपौत्रादिक गोधन ॥
ऐहिक कामना साधून । ज्ञानसिद्धि लाभतसे ॥८६॥

ग्रहरोगादिक पीडन । आधी व्याधी सर्व निरसून ॥
अनिष्ट असेल बंधन । सुटेल चरित्र ऐकतां ॥८७॥

ब्रह्महत्त्यादिक पापही । एकचित्तें तें ऐकतां जाई ॥
तेथें इतर सांगों कांही । अवर्णनीय तें असे ॥८८॥

मग शिष्य स्वती तयासी । सिद्ध नेती नामधारकासी ॥
संगमीं अश्वत्थ वृक्षासी । अभयकर शिष्या दिला ॥८९॥

नामधारक प्रार्थीतसे । गुरुचरित्र सांगा असें ॥
म्हणे मानस वेधतसे । गुरुचरित्र अैकावया ॥९०॥



प्रेमें सिद्ध सांगती त्यासी । ऐकावें गुरुचरित्रासी ॥
लक्ष तुझें गुरुचरणासी । त्यामुळेंच तूं तरशील ॥९१॥

फिरून आलों सर्व क्षिति । परी न कोणा अशी मति ॥
तूं गुरूचा दास निश्चितीं । तेणें इच्छा अशी दिसे ॥९२॥

गुरूचें वर्णन करावया । सामर्थ्य नाहीं जिव्हेंत या ॥
तुझा भाव गुरूच्या पायां । पाहून कथितों थोडेंसें ॥९३॥

कृत त्रेता द्वापार कलि । धर्मविचार खालीं खालीं ॥
लिंग जिव्हा स्वाधीन भली । ठेवितां सौख्य होतसे ॥९४॥

कलिकाचा अडसर । मानवतेनें होई दूर ॥
आत्ममतत्त्व एक अमर । तें साकारे गुरुरूपें ॥९५॥

गुरुपासून शिष्या ज्ञान । होई गुरूचा स्पर्श होऊन ॥
किंवा शिष्याकडे बघून । शिष्य ज्ञानी बनतसे ॥९६॥

स्थल काळाचा नसे अडसर । सर्व व्यापी आत्मा अमर ॥
कल्याण चिंतून गुरुवर । शिष्याचें क्षेम करिताती ॥९७॥

किंवा उपदेशही करून । शिष्यास गुरु करी पावन ॥
संकल्प दीक्षाही देऊन । कृतार्थ शिष्य गुरुकृपें ॥९८॥

गुरुच्या ज्ञानाचा प्रवाह । शिष्यांत उतरी अनुग्रह ॥
गुरुभक्तीनें शिष्य सदेह । विदेह मुक्ति पावतसे ॥९९॥

सिद्ध नामधारका नमन । सनाथ गुरूसी वंदन ॥
अध्याय चाळीस दत्तार्पण । श्रीदत्त घेती लोकहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ४१ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:।

सिद्ध नामधारका सांगत । निर्गुण निराकार दत्त ॥
भक्तांसाठीं प्रकट होत । परीक्षा गूढ तयाची ॥१॥

पूर्वीं पृथ्वी नव्हती कांहीं । जलमय होतें सर्वही ॥
वडाच्या पानावर पाहीं । बाल मूर्ति विष्णु असे ॥२॥

त्यानें आपल्या नाभींतून । कमळ निर्मिलें गहन ॥
त्या नाभिकमळामधून । ब्रह्मदेव जन्मा ये ॥३॥

महाविष्णु त्याच्याकडून । हें विश्व उपजवी जाण ॥
महेश्वर होत उत्पन्न । त्यांचीं कामें श्रवण कर ॥४॥

ब्रह्मदेव सर्व निर्मितो । विष्णु त्याचें पोषण करितो ॥
शंकर सर्व संहारितो । रज सत्त्व तम हे तिघे ॥५॥

आदिपुरुष परब्रह्म । त्याची शक्ति ती माया जाण ॥
तिच्या साह्यानें तिघेजण । सदा करिती स्वकार्यें ॥६॥

लोकांलागीं सुख व्हावया । सदा जन्मती नाना ठाया ॥
कार्या कारण भिन्न काया । पण एकच असती ते ॥७॥

ब्रह्मदेवाचे पुत्र अत्री । निरसावया अज्ञानरात्री ॥
तप करून केली खात्री । मग प्रसन्न तिन्ही देव ॥८॥

अत्रिवरद दत्तात्रेय । नररूपानें दृश्य होय ॥
अत्रिऋषि तपास जाय । अनसूया घरीं होती ॥९॥

अतिथि ब्राह्मण आले तीन । मागती इच्छित भिक्षान्न ॥
पण तेंही पवित्र नग्न । बनून दिलें पाहिजे ॥१०॥

अनसूया अत्रीची जाया । म्हणे आले चित्त बघाया ॥
परंतु खलकाम अपाया । नाहीं करणार कांहींच ॥११॥

पतिचरणीं माझी निष्ठा । म्हणून सत्त्वास प्रतिष्ठा ॥
अन्य विचार जशी विष्ठा । अंतर्बाह्य पतिऐक्य ॥१२॥

मनोवृत्तिप्रमाणें सजीव । देहाचे होती हावभाव ॥
विप्र असती सत्यदेव । आले परीक्षा पहावया ॥१३॥

अतिथींस म्हणाली सती । मिळेल अभीष्ट अन्नप्राप्ती ॥
अतिथी आसनीं बैसती । सती चित्तीं बाळ समजे ॥१४॥

अतिथि झाले बाळ सान । पाजी सती होऊन नग्न ॥
पतिभक्ति तिची अनन्य । दूधही उत्पन्न जाहलें ॥१५॥

स्तनपानें बालक तृप्त । मग ती वसनें नेसत ॥
तीनही बाळां गाई गीत । निजवी मातृप्रेमानें ॥१६॥

अत्रि पातले इतक्यांत । म्हणती ज्ञानें देव सत्य ॥
भक्तिभावानें प्रणिपात । करून दंपती स्तवीतसे ॥१७॥

अत्रिअनूसया पवित्र । त्यांचे साक्षात देव पुत्र ॥
क्षेम करिती इहपरत्र । सर्वां नमस्कार असो ॥१८॥

ब्रह्माविष्णुमहेशत्रय । प्रकट होती आनंदमय ॥
सांगती आम्हीच तनय । तुमचे शाश्वत लोकहिता ॥१९॥

दुर्वांस तापसी शिवांश । विष्णुअंश दत्तयोगेश ॥
चंद्र जाणावा विधिअंश । दत्त त्रैमूर्ति रूप धरी ॥२०॥

स्वस्थानीं गेले तिन्ही देव । भूमीवर बाळ मानव ॥
दुर्वास तापसी सदैव । त्रिभुवनीं फिरती श्रेष्ठ ते ॥२१॥

देवादिकही त्यांना भिती । लोकहित मनीं धरिती ॥
भगवंताचे भक्तां छळिती । भक्तमहिमा वाढविण्या ॥२२॥

थोर अंबरीष भूपती । त्याची भक्ती श्रेष्ठ अती ॥
स्वयें विष्णु वैकुंठपती । अंतर्बाह्य रक्षी तया ॥२३॥

नृप करी द्वादशीव्रत । दुर्वास येती अकस्मात ॥
राजा करी योग्य स्वागत । मनीं वासना काय पुसे ॥२४॥

ऋषि म्हणती दे भोजन । भूप सांगे अवश्य नमून ॥
स्नानसंध्या यावें करून । असे द्वादशीव्रत आज ॥२५॥



करणें एकादशी पारणा । तिथि द्वादशी थोडी जाणा ॥
यास्तव सत्वर भोजना । अगत्य यावें ऋषिवर्य ॥२६॥

दुर्वासऋषि महाज्ञानी । भूपपरीक्षा घ्यावी मनीं ॥
करी आन्हिक स्वस्थपणीं । इकडे राजा चिंतावला ॥२७॥

न येती मुनी अजून । द्वादशी जातसे निघून ॥
व्रतभंग घडे म्हणून । तीर्थे पारणा तो करी ॥२८॥

इतक्यांत दुर्वास आले । म्हणती तूं भोजन केले ॥
हें मुळींचे योग्य न झालें । तरी शाप घे माझा ॥२९॥

तुला चुकेना जन्ममरण । शाप माझा हा दारुण ॥
अंबरीष करी स्मरण । भक्तवत्सल विष्णूचें ॥३०॥

विष्णूचें चक्र सुदर्शन । नृपतीचें करी रक्षण ॥
कष्टला दुर्वास ब्राह्मण । अंबरीष करी प्रार्थना ॥३१॥

दुर्वासही करी स्तवन । म्हणे तूंच श्रीभगवान ॥
दीर्घकाळ तप करून । दर्शन सुद्धां न देशी ॥३२॥

आम्ही ऋषि तुझेच भक्त । बदविसी तेच शब्द येत ॥
टाकून दे प्राकृत अर्थ । आणि तत्त्वार्थ स्वीकारीं ॥३३॥

महाविष्णु संतुष्ट झाले । उभयतांना अभय दिलें ॥
भक्तासाठीं कळवळले । भक्ताभिमानी श्रीविष्णु ॥३४॥

रज आणि तमोगुण । यांना नमवी सत्त्वगुण ॥
तेच श्रीविष्णु भगवान । जगदोद्धारा अवतरती ॥३५॥

भक्तांचा जन्ममरण फेरा । निरसन करी माधवसारा ॥
वारंवार स्वयें अवतारा । घेऊन रक्षी भक्तांना ॥३६॥

अंबरीषगृहीं भोजन । ऋषि करी मनापासून ॥
भक्तांसाठी तो भगवान । दावी लीला सगुणत्वें ॥३७॥

जे सात्त्विकपणें वर्तती । तेच देवास आवडती ॥
त्यांचा छळ दुष्ट करिती । तरी त्यां रक्षी गोविंद ॥३८॥



शुद्धमनें प्रेमळपणीं । पानफूल फळ वा पाणी ॥
भक्त अर्पितां चक्रपाणी । पुष्कळ मानी करी कृपा ॥३९॥

सर्वत्र समान भगवंत । परी भक्तांसाठी तो भगवंत ॥
सदा पक्षपाती बनत । भक्तमहिमा जन गाती ॥४०॥

त्रिगुणी व त्रिगुणातीत । त्रैमूर्ति गुरुदेवदत्त ॥
सदा तीर्थयात्रा करीत । दीक्षा द्यावया साधुजना ॥४१॥

त्याची लीला कोणा न कळे । त्रिविधताप हरी सगळे ॥
त्याचे भक्त निर्मळ भले । निर्धास्त सदा वर्तती ॥४२॥

मद्रप्रदेशीं पीठापूर । श्रीदत्तस्थान पूर्वापार ॥
श्रीदेवदत्त दिगंबर । भक्तां अभीष्ट देतसे ॥४३॥

तेथें आपळराजा ब्राह्मण । त्याची पत्नी सुमता म्हणून ॥
आराधितसे मनापासून । श्रीदत्तचरण भक्तीनें ॥४४॥

महासाध्वी ती पतिव्रता । सुमता अतिथि अभ्यागता ॥
सहर्ष सदा करी स्वागता । तिचें भाग्य उगवलें ॥४५॥

त्यांचे घरीं अमावास्येसी । विप्र करी पितृश्राद्धासी ॥
दत्त येती अतिथिवेषी । भिक्षा घाली पतिव्रता ॥४६॥

भिक्षा घालतां दत्तगुरु । प्रसन्न झाले साक्षात्कारू ॥
रूप दाविलें गहन थोरू । दत्तात्रेय त्रयमूर्ती ॥४७॥

दत्ता पाहतां विप्रनारी । करुणा भाकी नानापरी ॥
दत्त संतोषले अपारी । प्रेमें पुसती तियेला ॥४८॥

प्रसन्न पूर्ण इच्छा काय । सांग जननी सफल होय ॥
सती म्हणे नमून पाय । जननी बोल सत्य असो ॥४९॥

मज पुत्र बहुत झालें । त्यांमधून दोन वांचले ॥
परी ते आंधळे पांगळे । काय करावे हे सुत ॥५०॥

तरी आता माझी विनंती । पुत्र असावा मजप्रती ॥
तुम्हां सारखा सदय चित्तीं । माता शब्ध खरा असो ॥५१॥

अैकून सुमतीचें वचन । दत्त देती आशीर्वचन ॥
पुढें असे कार्यकारण । दीक्षार्थ भक्तजनांसी ॥५२॥

येणे आहे अवतरून । ख्यातिवंत पुत्र होईन ॥
तुमचें दैन्यदु:ख हरीन । निश्चिंत मनीं असावें ॥५३॥

तुम्ही असावें पुत्रबोलीं । एऱ्हवी न राहे जवळी ॥
ज्ञानमार्गीं संपूर्ण बळी । सांगून दत्त गुप्त होती ॥५४॥

सुमताचित्त आनंदले । पतीला सर्व सांगितलें ॥
ब्राह्मण म्हणे भलें केलें । श्रीदत्तपुत्र होणार ॥५५॥

पितृकर्म श्रद्धा धरून । विष्णूस होतें समर्पण ॥
तेच भिक्षा घेत येऊन । पितर सत्य उद्धरले ॥५६॥

माहुरकाशी करवीर । पांचालेश्वर गिरनार ॥
दत्तक्षेत्रें असती फार । पीठापूरही प्रसिद्ध ॥५७॥

आमचें दिसे पुण्य थोर । म्हणून येती येथवर ॥
भिक्षानिमित्तें देती वर । नमस्कार त्यांस असो ॥५८॥

श्रीदत्त सर्वत्र फिरती । संतसज्जना उद्धरिती ॥
त्यांना भिक्षान्न प्रिय अती । प्रिये अससी भाग्यखाणी ॥५९॥

मग सती गर्भिणी झाली । ज्ञानकांति अंगीं चढली ॥
श्रीदत्तयोगी चंद्रमौली । तेथें उणे कधीं न पडे ॥६०॥

विप्रदंपती आनंदित । सदा दत्तस्मरण होत ॥
दिव्यपुत्र जन्मास येत । विप्र जातकर्म करी ॥६१॥

ज्योतिषी जातक वर्तविती । दिसे अवतारी सत्यमूर्ती ॥
साधुसंतांस दीक्षा देती । थोर तपस्वी बाळ होई ॥६२॥

दत्तप्रसादें झाला पुत्र । आनंद भरला सर्वत्र ॥
पिता ठेवी नाम पवित्र । श्रीपाद असें प्रेमानें ॥६३॥

शुद्ध चतुर्थी भाद्रपदांत । सूर्योदयापूर्वी जन्मत ॥
म्हणून तसा उत्सव होत । कन्या राशी कर्क लग्न ॥६४॥



आपळराजा सुमता धन्य । बाळलीला अतर्क्य गहन ॥
सकळां सद्भावें नमन । दत्ता कृपा असावी ॥६५॥

उक्तकालीं मौंजी बंधन । होतां मुखीं वेद ऐकून ॥
विस्मित झाले सकळजन । म्हणती धन्य ब्रह्मचारी ॥६६॥

आचार व्यवहार प्रायश्चित्त । सांगे मीमांसा तर्क समस्त ॥
चार वेदांचा अर्थ गुप्त । तसा शब्दार्थ बाळ सांगे ॥६७॥

मोठमोठे पंडितजन । नानाविध करिती प्रश्न ॥
श्रीपाद करिती समाधान । सर्व शरण श्रीपादा ॥६८॥

मातापिता आनंदघन । सोळावर्षे होतां लग्न ॥
करून आणूं म्हणती सून । बाळा विचार कळविला ॥६९॥

श्रीपाद म्हणे मातापित्यासी । मी वरिलें वैराग्यस्त्रीसी ॥
माझें काम तिच्याचपाशीं । अन्यस्त्रिया माते सम ॥७०॥

मी श्रीपाद श्रिया वल्लभ । सर्वत्र गमन जसें नभ ॥
निरसावया हवा दंभ । उत्तर यात्रे निघतों मी ॥७१॥

दीक्षा द्यावया साधुजनां । जाणें आहे कार्य कारणा ॥
ऐकून मातापित्याचे मना । दत्त भाषण आठवलें ॥७२॥

बाळ सांगे तसें वर्तन । करावें म्हणती आपण ॥
श्रीपादा सांगती वचन । आम्ही आतां वृद्ध झालों ॥७३॥

तूं तर आतां तीर्था जासी । अंधु पंगु भ्राते तुजसी ॥
विचार करावा मानसीं । सांग करावें काय आम्ही ॥७४॥

श्रीपादाचें द्रवलें चित्त । कृपेनें बंधुकडे पहात ॥
दृष्टि येऊन उत्तम होत । देह सर्व योग्य बने ॥७५॥

वेदशास्त्रादि व्याकरण । सर्वही म्हणती तत्क्षण ॥
वंदिती श्रीपादचरण । दोघे बंधु भक्तिभावें ॥७६॥

दिला सप्रेमें आशीर्वाद । पुत्र पौत्र होती सुखद ॥
संसारीं श्रीमंत शास्त्रशुद्ध । नांदा श्रीपाद सांगती ॥७७॥



माझी कृपा नित्य राहील । मातापित्या सदाकाळ ॥
सेवा भावें इथें मंगल । पावून अंतीं मुक्ति मिळे ॥७८॥

आईजनका आश्वासून । केलें त्यांचें संतुष्ट मन ॥
लगेच अदृश्य होऊन । काशीपुरीं प्रकटले ॥७९॥

श्रीपाद योगी दत्तावतार । मनोवेगें फिरती भूवर ॥
बद्रिनारायण केदार । हिमालयतीर्थे करी ॥८०॥

उत्तर पूर्वापर दक्षिण । तीर्थयात्रा करून पूर्ण ॥
गोकर्णीं गिरिजारमण । सागरतीरीं पातले ॥८१॥

नामधारक हें अैकून । सिद्ध पुसती नमस्कारून ॥
श्रीपाद योगेश असून । तीर्थे कशास हिंडती ॥८२॥

प्रेमें सिद्ध त्यासी म्हणती । सर्व सांगतों तुजप्रती ॥
गुरुचरित्रीं तुझी मती । ओढ घेतसे वाटतें ॥८३॥

दत्तात्रेय श्रीपाद जाण । तीर्थे हिंडती तें कारण ॥
उद्धारावया भक्तजन । तीर्थमळही घालविण्या ॥८४॥

गोकर्णीं प्रत्यक्ष शंकर । श्रीपाद त्याचे अवतार ॥
म्हणून प्रेम तेथें फार । दत्त तेच शंकरही ॥८५॥

विधिविष्णुशंकरांश । ज्ञानी योगी दत्त विशेष ॥
दीक्षा देऊन साधुमनास । शुद्ध निर्भय ते करिती ॥८६॥

तोच आचार अवतारास । धर्मनिष्ठां देत विश्वास ॥
चरित्र त्यांचें बहुवस । थोडें थोडें सांगतसें ॥८७॥

समस्त चरित्र सांगावयासी । शक्ति नाहीं बा आम्हासीं ॥
अनंतइच्छा जनमानसीं । त्या पुरविती दत्तगुरु ॥८८॥

सिद्ध सरस्वतीस नमन । त्यांच्या कृपें होत लेखन ॥
दत्तनिर्गुण भगवान । भक्तासाठीं सगुण बने ॥८९॥

लोकांच्या विविध वासना । त्यांच्यामुळें भावना नाना ॥
पुरविण्यास त्या कामना । मार्गही त्यांचे विभिन्न ॥९०॥

आपल्या प्रारब्धानुसार । वर्तती जन निरंतर ॥
परंतु ज्यांचें भाग्य थोर । तेच वळती गुरुचरणां ॥९१॥

दत्तसेवेंत एकाग्रता । निरसी प्रारब्धाची व्यथा ॥
इष्ट कामना येतां हाता । विसरे भक्ति दत्ताची ॥९२॥

स्वाभाविक अंकुर दैवा । अनिष्ट फळें भोगावी जीवा ॥
म्हणे नारायणा केशवा । कसा परता लोटिला तूं ॥९३॥

दत्त आणी दैवा क्षीणता । सदा भक्तां इच्छित देता ॥
तें भोगतां स्मरणें दत्ता । दैवबंध मग नाहीं ॥९४॥

मोक्षप्राप्ति येतां घडून । दैवाचें पूर्ण निरसन ॥
मध्यंतरीं दुर्दैव क्षीण । करून सुख दत्त देई ॥९५॥

म्हणून दत्तपदीं मन । ठेवून करावें वर्तन ॥
वागणें मानवता धरून । मग अधोगति नाहीं ॥९६॥

करितां दत्ताचें चिंतन । तेथें उभा तो भगवान ॥
भक्तांच्या इच्छा पुरवून । कल्याणमार्ग दाखवी ॥९७॥

तसें वागावें अनुदिन । दत्तात्रेय दयेची खाण ॥
सर्वांतर्यामी भगवान । कोण फसवी दत्ताला ॥९८॥

सर्वकाळीं सर्व ठिकाणीं । दत्त असती पूर्णपणीं ॥
निष्कपटें दत्तचरणीं । श्रद्धा ठेवून भजावें ॥९९॥

अपाय ते उपाय होती । सभक्त दत्तात्रेय प्रणती ॥
अेकेचाळिसावा अध्यायघेती । स्वहस्तींभक्तकल्याणा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

**श्री दत्तचरित्रसार अध्याय ४१ वा**

# अध्याय ४२ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।

विधायक इच्छा धरून । प्रेमें करावें दत्तस्तवन ॥
मग श्रीदत्तभगवान । दाविती मार्ग भक्ताला ॥१॥

कपटाचें अंत:करण । अथवा सूडबुद्धि धरून ॥
सेवितां श्रीदत्तचरण । शुद्ध होण्या प्रयास पडे ॥२॥

बरें वाईट भोगवून । दावी दत्तलीला गहन ॥
सर्व एक आहे म्हणून । प्रेम सकळां मनीं हवें ॥३॥

मग मानस होई शुद्ध । दुर्वासना त्यजावा मद ॥
भक्तिभावें श्रीदत्तपद । स्मरून असक्त रहावें ॥४॥

तो देई तें स्वीकारून । सदा संतुष्ट ठेवणें मन ॥
जो करितो जग उत्पन्न । तोच चालवी स्वबलें त्या ॥५॥

आपणां नको अभिमान । दत्तचरणीं व्हावें लीन ॥
तत्कृपे मिळे तें घेऊन । श्री दत्तचरणीं अर्पावें ॥६॥

त्याला आहे काळजी पूर्ण । श्रोते संत जग संपूर्ण ॥
शिवरूप क्षेत्र गोकर्ण । सर्वां नमस्कार असो ॥७॥

नामधारका सिद्ध सांगती । रावणमाता कैकसी चित्तीं ॥
भक्तीनें स्मरें शिवाप्रती । पूजेवीण न घे अन्न ॥८॥

एके दिवशीं न मिळे लिंग । मग मातीचें करी लिंग ॥
शिवपूजन करी सांग । मातृदर्शना रावण ये ॥९॥

म्हणे आपण ऐश्वर्यवान । करिसी मृत्तिकालिंगपूजन ॥
हें मजला असे लांछन । सांग पूजेनें काय मिळे ॥१०॥

माता म्हणाली रावणाला । इथें ऐश्वर्य बहुतकाला ॥
अंती जावें कैलासपदाला । रावणा गर्व फार असे ॥११॥

म्हणे कैलास इथें आणीन । स्वस्थ करावें शिवपूजन ॥
सोडावें मृत्तिकापूजन । असें सांगून निघाला ॥१२॥



कैलासपर्वतीं जाऊन । उपटीतसे तो हालवून ॥
हालतां उमा शिवगण । शिवा प्रार्थिती कृपा करा ॥१३॥

शंकर सांगती सर्वांसी । धीर धरा तुम्हीं मानसीं ॥
भक्त रावण पर्वतासी । खेळ त्याचा भय नाहीं ॥१४॥

वामहस्तें शिव दडपीत । पर्वताखालीं रावण मस्त ॥
चिरडतां तो शिवा प्रार्थीत । धांव पावगा चंद्रमौळी ॥१५॥

शंकरें त्या बाहेर काढिलें । रावणें स्तवन आरंभिलें ॥
शिर छेदून तंतू काढिले । वाद्या लाविले स्वर साधना ॥१६॥

भावें रागदारी समस्त । सामवेद ही सुस्वर गात ॥
भोळा शंकर प्रसन्न होत । रावणा म्हणे वर माग ॥१७॥

राक्षसराजा होई लीन । सांगे माता तव पूजन ॥
करी म्हणून कैलासभुवन । मला पाहिजे सत्वर ॥१८॥

शिव सांगती पूजेकारण । आत्मलिंग जा घेऊन ॥
तीन वर्षें लिंगपूजन । करितां शिव बनशील ॥१९॥

तुझें नगर कैलासभुवन । होईल कर सावध गमन ॥
लिंग न्यावें शुद्ध राहून । भुमीवरही ठेवूं नको ॥२०॥

रावण झाला आनंदित । नमून शिवा निघे त्वरित ॥
नारदा कळे इत्यंभूत । वेगें इंद्रातें कळविलें ॥२१॥

त्यामुळें इंद्र गडबडले । इंद्र नारद विधीकडे ॥
जाऊन सांगती जें घडे । ब्रह्मदेव चिंतावती ॥२२॥

मग ते तिघे विष्णूपाशीं । जाते झाले लगबगेंसी ॥
विष्णु अैके सर्व कथेसी । चौघेही जाती शिवाकडे ॥२३॥

नारायण शिवा विचारी । रावण दैत्य नष्ट थोरी ॥
देवांनरां छळितो भारी । त्यासी लिंग कां दिधलें ॥२४॥

ते म्हणती भुलीं पडली । भक्ति त्यानें अपार केली ॥
सांगे सर्व जी गोष्ट घडली । उपाय शीघ्र करा म्हणे ॥२५॥



श्रीविष्णूनीं काढिली युक्ती । नारदा पुढें पाठविती ॥
मागून गणेशा धाडिती । विघ्न रावणा करावया ॥२६॥

सूर्याआड सुदर्शन । माधवें धाडितां अस्तमान ॥
होतां सचिंत रावण । म्हणे काय करूं आतां ॥२७॥

रावणा विलंब होण्यासाठीं । नारद सांगे लिंगगोष्टी ॥
तुझी पुण्याई दिसे मोठी । संध्येस गेला निघून ॥२८॥

दैत्या संध्येची तळमळ । देखिला कुमार जवळ ॥
गणपती होतसे बाळ । रावणा विश्वास वाटला ॥२९॥

रावण वैदिक ब्राह्मण । करी नियमें आचरण ॥
मंत्रदेवता स्वाधीन पूर्ण । पण गर्विष्ठ तामसी ॥३०॥

म्हणे बाळा इकडे यावें । लिंग जरा जवळ घ्यावें ॥
तुझी इच्छा पुरवीन भावें । संध्या करणें असे मला ॥३१॥

बालक सांगे मी अज्ञान । लिंग दिसे जड म्हणून ॥
नको सांगूं मजलागून । रात्र होईल घरीं जातो ॥३२॥

रावणाचा आग्रह पडला । म्हणे दिससी तूं बाळ भला ॥
संध्येसाठीं वेळ जाहला । लिंग विश्वासें देतसे ॥३३॥

सांगे सत्वर मी येईन । बाळ म्हणे मी बोलावीन ॥
तीन वेळा भरतां ठेवीन । खालीं मला दोष नको ॥३४॥

रावणासी मान्यवचन । सागरतीरीं शुद्धस्थान ॥
पाहून करी संध्यावंदन । अर्ध्यप्रदान देत असे ॥३५॥

बाळें बोलाविलें सत्वर । येतों म्हणे खुणें असुर ॥
परत बोलावी कुमार । रावण स्वस्थ संध्येंत ॥३६॥

मग बाळ पुन्हां बोलावी । रावणा विलंब दुर्दैवीं ॥
विष्णुस्मरणें बाळ ठेवी । खालीं शिवाचें आत्मलिंग ॥३७॥

पुष्पें वर्षती सुरवर । लिंग खोलावें भूमीवर ॥
पाहाता आला दैत्यवर । क्रोधें बाळा तीव्र वदे ॥३८॥

वेगें उचलीतसे लिंग । दैत्यबळाचा झाला भंग ॥
मुरडितांही तें अभंग । लिंग गोकर्णाकार बने ॥३९॥

महाबळीसी न हाललें । म्हणून नांव तसें मिळालें ॥
गोकर्ण महाबळेश्वर भलें । क्षेत्र पश्चिम भारतीं ॥४०॥

प्रत्यक्ष भवानी शंकर । तेथें श्रीपाद गुरुवर ॥
होती गुप्त तीन वत्सर । शंकर दत्ता नमन असो ॥४१॥

संन्यासी यति अवधूत । नाना ऋषिमुनी संत ॥
देवादिकही नित्य येत । शिवपूजना अत्यादरें ॥४२॥

रावणाचें तप महान । सर्वां स्वर्ग मोक्षसाधन ॥
लाधे अनायासें करून । अखिल प्राणी उद्धरती ॥४३॥

श्रीविद्यारण्य शंकराचार्य । त्यांना प्रसन्न श्रीपादराय ॥
कृतज्ञतेचे शब्द द्वय । विद्यारण्य श्रीपादमुनी ॥४४॥

श्रीपादें तीर्थें क्षेत्रें फिरून । संन्यासी यति साधुजन ॥
निर्भय केलें त्यां बोधून । वैदिक संस्कृति रक्षिलि ॥४५॥

श्रीपादांचें गूढ चरित्र । सांगे ग्रंथ गुरुचरित्र ॥
ध्यानीं आणावा अर्थ पवित्र । मग विस्तार समजेल ॥४६॥

शक बारा तेरा शतकांत । धर्मग्लानि अपार होत ॥
तेव्हां प्रकटले श्रीदत्त । श्रीपादयोगी थोर भाग्यें ॥४७॥

अनाचारीं आचार दावी । आचारांत प्रगति करवी ॥
भक्तजनां गति बरवी । देती, सुखानें सुखरुप ॥४८॥

दत्तात्रेया श्रीपादराया । कोणा कळे आपुली माया ॥
पद स्थापुनी नाना ठायां । करितां उद्धार दीनांचा ॥४९॥

दत्तगुरो तुम्हां नमन । सद्भावें तव चरणीं लीन ॥
घ्यावें अक्षय सुधारून । सर्वात्मका नमन तुला ॥५०॥

नामधारक तन्मय झाले । सिद्धा भावें प्रार्थूं लागले ॥
क्षेत्रमहात्म्य सांगा भलें । मानस हर्षोत्फुल्ल माझें ॥५१॥



सिद्धगुरुजी सुखावून । नामधारका आश्वासून ॥
सांगती कृपेनें द्रवून । महात्म्य गोकर्ण क्षेत्राचें ॥५२॥

मित्रासह सूर्यवंशांत । भूपति असे बळवंत ॥
पारधीसी जात वनांत । तेथें राक्षस देखिला ॥५३॥

दैत्य निष्ठुर भयंकर । भूपें सोडून तीव्र शर ॥
राक्षसा पाडिलें भूमीवर । त्याचा बंधु जवळी असे ॥५४॥

मरतां सांगे तो बंधूस । सूड उगव तूं बहुवस ॥
येरु म्हणे ठेव विश्वास । मग दानव निमाला ॥५५॥

दैत्य धरी नर शरीर । राजयाचा होत चाकर ॥
कांहीं दिवस नृपवर । पारध करी काननीं ॥५६॥

नंतर ये राजधानींत । संगें होता कपटी दूत ॥
राजयाची कृपा अमित । म्हणे नोकर विश्वासू ॥५७॥

आला पितृश्राद्ध दिवस । नृप बोलावी पुरोहितास ॥
सामुग्री देण्या आचाऱ्यास । कपटी दूता भूप कथी ॥५८॥

तो नरमांस आणवुन । करवी श्राद्धान्न पक्वान्न ॥
पानावर वाढतां बघून । गुरु वसिष्ठ कोपले ॥५९॥

शाप दिधला भूपतीस । नरमांस वाढिलें आम्हांस ॥
तरी व्हावें ब्रह्मराक्षस । अैकता राजा क्रोधावला ॥६०॥

म्हणे माझा निरोप नाहीं । उलट माझा शाप घेई ॥
पण हें वर्तन अनिष्ट पाहीं । सांगून पत्नी शांतवी ॥६१॥

गुरुजींची क्षमा मागून । मिळालें उ:शाप वचन ॥
ब्रह्मराक्षस योनींतून । बारा वर्षांनी पुन्हां येसी ॥६२॥

राजा पोचला अरण्यांत । कल्माषपाद त्याला म्हणत ॥
अनेकप्राणी तो भक्षीत । ब्रह्मराक्षस भयंकर ॥६३॥

एकदां त्या रानामधून । ब्राह्मण तरुण विद्वान ॥
पत्नीसह करी गमन ।मार्गीं राक्षस देखिला ॥६४॥



विप्रा धरी ब्रह्मराक्षस । विप्रकांता विनवी त्यास ॥
मारूं नका मम पतीस । आचार संपन्न तो असे ॥६५॥

ब्रह्महत्या फार वाईट । पतीवर प्रेम अवीट ॥
संतानाची आमची वाट । अजून चालू न जाहली ॥६६॥

तरी करा थोर विचार । मजला द्यावा माझा वर ॥
आपुली दया जन्मभर । कृतज्ञतेनें स्मरेन मी ॥६७॥

समजा मला स्वदुहिता । सोडा सुकुमार जामाता ॥
माझी पुरवावी आर्ता । कामविकार जाणावा ॥६८॥

राक्षसा विचार न सुचे । विप्रा मारितां पतिव्रतेचें ॥
शापवचन दुर्दैवाचें । कल्माषपादा मिळालें ॥६९॥

ब्राह्मणीचा होत आकांत । म्हणे भक्षिला माझा कांत ॥
माझें पतिप्रेम अत्यंत । निष्ठुरा तुवां नाशिलें ॥७०॥

सूर्यवंशींचा तूं भूपती । भोगसी येथें शापगती ॥
बारा वर्षांनीं राज्यप्राप्ती । पुढें होणार आहे तुला ॥७१॥

परंतु रमतां स्त्रियेसवें । प्राण जाईल स्वभावें ॥
अनाथा भक्षिसी दुष्ट भावें । दुरात्म्या तूं राक्षसा ॥७२॥

आकांतीं तिला ज्ञान झालें । शापवचन तोंड वदलें ॥
पति अस्थींना जमविलें । सतीं गेली त्यांच्या सह ॥७३॥

बारा वर्षांचा शाप संपला । ब्रह्मराक्षस राजा झाला ॥
पण दमयंतीराणीला । सांगे शाप ब्राह्मणीचा ॥७४॥

मग वंशार्थ हवा सुत । नियोग आचरी पुरोहित ॥
राणी गर्भिणी काळ बहुत । हत्या पीडी राजकुळीं ॥७५॥

दगडाचें शस्त्र घेऊन । वसिष्ठें राणीचें पोट फाडून ॥
सुपुत्र बाहेर काढून । अश्मक नांव ठेविलें ॥७६॥

ब्राह्मणांना राजा विचारी । ब्रह्महत्या घडली थोरी ॥
सदा सान्निध त्रासवी भारी । तरी उपाय सांगा मला ॥७७॥

ते म्हणती तीर्थे करावीं । मनोभावानें आचरावीं ॥
ब्रह्महत्ये गति बरवी । मिळून शुद्धता येईल ॥७८॥

तशी तीर्थे राजा आचरी । परी हत्या जाईना दुरी ॥
मुक्काम असतां मिथिला पुरीं । गौतमऋषि भेटले ॥७९॥

राजा पुसे त्यांना नमून । ब्रह्महत्या पाप गहन ॥
मुक्त होईन मी त्यांतून । असा उपाय सांगा मला ॥८०॥

गौतम राजेंद्रा सांगत । गोकर्णीं प्रत्यक्ष उमाकांत ॥
तेथें जाऊन पापमुक्त । होसी चिंता न करावी ॥८१॥

भूपति होऊन हर्षित । एखादा प्रत्यय सांगा म्हणत ॥
त्यामुळें दृढ बनेल चित । श्रद्धेनें तिकडे जावया ॥८२॥

गौतम प्रत्यय सांगत । आम्ही असतां गोकर्णांत ॥
एक चांडाळी झाली मृत । तेव्हां शिवदूत नेती तिला ॥८३॥

हें पाहून पुसिलें त्यांसी । कोणत्या पुण्यें नेतां इसी ॥
दिसे केवळ पातक राशी । वृद्ध अंध महारोगी ॥८४॥

मग शिवदूत सांगती । पूर्वीं ब्राह्मणकन्या होती ॥
दिसे छान लावण्यवती । पूर्ववयांत पती मरे ॥८५॥

परी बाळी कामविकार । न आंवरी तो अनिवार ॥
गुप्तपणें पुरुषपर । भोगी सावध आनंदें ॥८६॥

पण पाप न राही गुप्त । त्यजिती निंदून स्वजन आप्त ॥
मग उघड नगरीं रमत । सुंदर वैश्यपत्नी बने ॥८७॥

स्त्रिया नासती काम वेगें । ब्राह्मण नासे नीच संगें ॥
द्विजक्षोभें राज्यही भंगे । यति विषयसेवनें ॥८८॥

मद्यमांस तिचा आहार । धुंदींत राही निरंतर ॥
मेष म्हणुन गोवत्सा ठार । करी मांस भक्षावया ॥८९॥

संध्याकाळीं गोदोहना जात । वत्सस्थानीं मेष दिसत ॥
शिव शिव हें अनुचित । म्हणे गोवत्सखुणा गाडिल्या ॥९१॥



व्याघ्रें वत्स नेलें म्हणून । पतीस सांगे कळवळून ॥
बायकोचें कपटी वचन । वैश्याला खरें वाटले ॥९२॥

नित्य संसारीं ती रमत । पुढें मरण तिला प्राप्त ॥
चांडाळगृहीं ती जन्मत । दरिद्री अंध दुःख भोगी ॥९३॥

वृद्धा महारोगी बनली । भिक्षा मागे फार कष्टली ॥
शिवरात्रीस यात्रा चालली । ही ही निघाली बरोबर ॥९४॥

सुदैवें गोकर्णा पातली । काल भिक्षा नाहीं मिळाली ॥
त्यामुळें भूक फार लागली । एकदां पडलीं लिंगावर ॥९५॥

उपासामुळें जागरण । बिल्वपत्रें लिंगपूजन ॥
आज व्याकूळ गतप्राण । म्हणून बने ही शिवप्रिया ॥९६॥

असे संगून शिवदूत । शिवलोकीं घेऊन जात ॥
तूं ही राजा होशील मुक्त । गोकर्णक्षेत्री निःशंक जा ॥९७॥

गौतम ऋषींस वंदून । मित्रसह गेला निघून ॥
पापमोचन विधि करून । शुद्ध जाहला शिवकृपें ॥९८॥

सिद्ध नामधारका सांगती । दोघे प्रेमें गहिवरती ॥
भवानी शंकरा प्रणती । श्रीपादांसह नमन सर्वां ॥९९॥

श्रीपाद श्रीवल्लभदत्त । दिसती मना प्रसन्न चित्त ॥
बेचाळिसावा अर्पितादत्त । स्वीकारीअध्यायभक्तसुखा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ४३वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः।

नामधारका सिद्ध सांगती । गोकर्णाहून श्रीपादयती ॥
चारमास गिरिपर्वतीं । राहून पुढें निघाले ॥१॥

निवृत्ति संगम कुरवपूर । राहती श्रीपाद गुरुवर ॥
तेथील महिमा अपार । किती म्हणून वर्णावा ॥२॥

भीमा कृष्णा संगमापुढें । कृष्णाप्रवाहीं बेट घडे ॥
तें एकांत स्थान आवडे । श्रीपाद गुरुमूर्तीसी ॥३॥

शिवाभद्रा भोगावती । कुंभी नदी सरस्वती ॥
एक होतां तिला म्हणती । पंचगंगा मातोश्री ॥४॥

कृष्णा वेणी नद्या पावन । त्यांचा प्रवाह एक होऊन ॥
पुढें पंचगंगा मिळून । संगम पवित्र झालासे ॥५॥

पूर्वेकडचें संगमतीर । अमरापूर गौरीपूर ॥
पश्चिमेकडे कुरवपूर । कुरुंदवाड प्रसिद्ध जनीं ॥६॥

तेथें श्रीपाददत्त जाती । नानाविध लीला करिती ॥
कुरुंदवाडीं दत्त वसती । त्यांना नमस्कार असो ॥७॥

कृष्णा उगमापासून । क्षेत्रें तीर्थे फार पावन ॥
बहु नद्या तिला मिळून । पूर्वसागरीं कृष्णा मिळे ॥८॥

त्या सर्वांना असो नमन । कुरवपुरें स्थानें दोन ॥
पुढील अवतारीं स्थान । कुरुंदवाडाकडे केलें ॥९॥

कुरुगड्डी कुरवपूर । कृष्णानदी सभोंवार ॥
दशदिशांना वाहे नीर । अवघड स्थान स्थिर केलें ॥१०॥

गोदावरी मुखाजवळ । पीठापूर क्षेत्र विमल ॥
श्रीदत्तगुरुंचे प्रियस्थळ । प्राचीन कालापासून ॥११॥

तेथें अवतार धरून । केलें भारतीं तीर्थाटन ॥
सर्व देवतांना भेटून । दीक्षा दिली साधुजनां ॥१२॥

नाना वासना संसारांत । श्रीपादकृपें सदा पुरत ॥
महिमा वाढला बहुत । श्रीपादश्रिया वल्लभाचा ॥१३॥

त्याचे कृपेनें पुत्रप्राप्ती । श्रीपाद नाम त्या ठेविती ॥
कोणी वल्लभ पुत्रा म्हणती । श्रीपादभक्ति वाढतसे ॥१४॥

श्रीपाद महिमा अपरंपार । पण चरित्र गुप्त फार ॥
त्यांना करून नमस्कार । सुख लाभतें वंशोवंशीं ॥१५॥

बारा तेरा शक शतकांत । भारता थोर अपघात ॥
यावनी सत्ता प्रस्थापित । धर्मछलन उद्भवलें ॥१६॥

माणुसकीचा व्यवहार । चालविण्यासाठीं राजाधिकार ॥
लोपून गेला त्याला वर । संतसाधूच काढिती ॥१७॥

अध्यात्मविद्येचा सुकाळ । भारतीं पसरे सुमंगल ॥
ठायीं ठायीं भक्त प्रेमळ । झेंडा रोविती धर्माचा ॥१८॥

केवढाही असला कोण । तरी मानवी अंत:करण ॥
विश्वात्मका ठायीं लीन । ठेवून मानवता हवी ॥१९॥

विश्वीं आत्मतत्त्व भरून । एकेच एक विराजे पूर्ण ॥
मनांत तत्त्व स्थिर ठेवून । ही मानवता साधते ॥२०॥

मनोवृत्ति अशी करून । हवें अंतर्बाह्य वर्तन ॥
हेंच धर्म संरक्षण । नाना आचार धर्मसूत्रीं ॥२१॥

लौकिक आचार विचार । प्रसंगासम निरंतर ॥
आत्मतत्त्व एक अमर । मनीं दृढश्रद्धा हवी ॥२२॥

असेंच साधु शिकविती । ही धर्माची अमर ज्योती ॥
त्यासाठींच श्रीपादयति । अवतरले या भूवरीं ॥२३॥

मंत्र तंत्र नानासाधनें । साधून लोकां सुख देणें ॥
संसाराचा ताप हरणें । साधुकार्यांत जमा असे ॥२४॥

जेथें जेथें तेज विशेष । तेथें तेथें देव प्रकर्ष ॥
लोक भजती भावें सहर्ष । हें सर्वही योग्य असे ॥२५॥



परंतु मानवता सोडून । स्वत:ची प्रतिष्ठा वाढवून ॥
घेती त्यांना भोंदू म्हणून । शासन करणें योग्य ठरे ॥२६॥

सर्वांसाठीं तप करून । विरक्तता पूर्ण धरून ॥
ईश्वरी संदेशासमान । वागणें ही दत्तकृपा ॥२७॥

प्रसंग आला जरी कसाही । तरी अढळ सर्वदा राही ॥
मृत्यूचा तेथें प्रश्न नाहीं । तत्त्वनिष्ठा अमर हवी ॥२८॥

अशा संतांना अभयता । असे श्रीदत्त सदा देता ॥
मनींची त्यजून अहंता । शरण जावें दत्तपदां ॥२९॥

साधुजनांस संरक्षण । भोंदूंस करण्या ताडण ॥
श्रीदत्तगुरु समर्थ पूर्ण । त्यांना नमस्कार असो ॥३०॥

गहिनीनाथ दीक्षेमधील । ज्ञानेश्वर गुरु दयाळ ॥
नामदेव भक्त प्रेमळ । दोघे निघाले तीर्थाटना ॥३१॥

नानास्थानीं देवता भिन्न । पण ईश्वर एक म्हणून ॥
साक्षात्कार जनां दावून । धर्मश्रद्धा टिकविली ॥३२॥

भक्ति कोणत्याही देवतेची । गुरुपरंपरा श्रीदत्ताची ॥
कीर्ती फांकली नामदेवाची । विठ्ठलभक्ति पसरली ॥३३॥

यावनी सत्ता फार निष्ठुर । प्राणघेणा प्रसंग दुर्धर ॥
परंतु पांडुरंग रमावर । तारी त्याला कवण मारी ॥३४॥

विठ्ठल भक्त नामदेव । पंजाबीं पांडुरंग वैभव ॥
दावी वाढवी भक्तिभाव । क्रूर यावनी सत्तेंतही ॥३५॥

शीखग्रंथसाहेबांत । नामदेव अभंग असत ॥
अजुन नामदेव चरित । गाती भारतीं नमन सर्वां ॥३६॥

भारताचा भविष्यकाळ । ओळखून दत्तदयाळ ॥
भिक्षा घेऊन आई प्रेमळ । पीठापुरांत योजिली ॥३७॥

शक बारा शतकमध्यांत । अवतरले श्रीपाद दत्त ॥
सर्व तीर्थयात्रा करीत । अभय देती साधुजनां ॥३८॥



त्यामुळें धर्मसंरक्षण । आपोआप येत घडून ॥
श्रीपाद चरित्र गहन । शुद्ध विचारें जाणावें ॥३९॥

ज्याच्या चित्तीं श्रीपाद दत्त । तो होतसे संकटमुक्त ॥
संसारीं होई सौख्यप्राप्त । श्रीदत्तप्रेमा वर्धतो ॥४०॥

असा अनुभव घेऊन । सुखीं नांदती भक्त अजून ॥
श्रीपादांचे कार्य विस्तीर्ण । त्यांना भावें नमन असो ॥४१॥

विद्यारण्य श्रीपादमुनी । नांव सांगतें पूर्णपर्णी ॥
श्रीपादाची थोर करणी । प्रसिद्ध दक्षिणभारतीं ॥४२॥

हरिहरबुक्क यांचेकडून । नवीन राज्य उभारून ॥
यावनी लाट थोपवून । दिसलें कर्तुत्व स्वामींचें ॥४३॥

वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण । क्षत्रिय पराक्रमी महान ॥
व्यापारी कनकसंपन्न । सर्व जनता सुखी असे ॥४४॥

त्यावेळच्या ज्ञात जगांत । विजयानगर सुखी श्रीमंत ॥
सबंध भारत वर्षात । वैदिक ध्वज फडकतसे ॥४५॥

असलीं प्रवास वर्णनें । दूरस्थांचीही आढळणें ॥
त्यावरून कळून येणें । ऐश्वर्य वैदिक राज्याचें ॥४६॥

येथील इतिहासावरून । विजयानगर राज्य संपन्न ॥
विद्याकला पराक्रम धन्य । असेंच सार्थ वाटतसे ॥४७॥

प्रतिकूलतेंतही संरक्षण । पुण्यबळानें विद्यारण्य ॥
करिती भूपालांकडून । श्रीपादकृपा स्वामींना ॥४८॥

अनुकूल प्रतिकूल काळ । प्रत्येका असे सदा काळ ॥
परंतु व्यवहारकुशल । प्रवृत्ति ईशकृपें हवी ॥४९॥

मग होतसे भरभराट । नातरी उधळतसे पट ॥
प्रसंग जरी बरा वाईट । ईशचिंतनीं स्थिरता हवी ॥५०॥

मग जेव्हां होतसे शीण । सुदर्शन करी रक्षण ॥
आर्य चाणक्य चाणाक्षपण । राज्यवर्धना उपयोगी ॥५१॥

प्रथम देवसेवा करून । मिळवावें आशीर्वचन ॥
मग राजकारण पाहून । सावधपणें वर्तावें ॥५२॥

ईशस्मरण सदोदित । भगवंतांचें कार्य समस्त ॥
अशी श्रद्धा ठेवून वागत । तोच भक्त उत्तमसा ॥५३॥

गीतेंत सांगे भगवंता । अनुस्मरणें वागा सतत ॥
मम जाणीव ठेवी चित्त । त्याला अधोगती कैची ॥५४॥

त्याची उन्नति होई सतत । श्रीभगवंत श्रीपाद दत्त ॥
भावी योजना ठरवून गुप्त । भक्त जनांना संरक्षिती ॥५५॥

त्यांना कोण देणार काय । त्यांचेच चाले सदा कार्य ॥
त्यांचे वंदून नित्य पाय । वागणें हेंच कर्तव्य असे ॥५६॥

आपल्या जन्म धर्मासाठीं । नाहींच क्षुद्रसुखासाठीं ॥
ही जाणीव मनांत मोठी । सद्गुरुकृपें जन्मतसे ॥५७॥

जो करी धर्माचें रक्षण । त्याचें करी धर्मरक्षण ॥
वैदिकधर्म सनातन । त्याचेसाठीं झटणें सदा ॥५८॥

सिद्ध नामधारका सांगत । त्या कुरवपूर ग्रामांत ॥
वेदशास्त्र संपन्न असत । आचार निष्ठ विप्र अेक ॥५९॥

त्याची भार्या अंबिका नाम । तिची पुत्रा माया परम ॥
पूर्वसुतां नेतसे यम । मतिमंद बहिरा वांचला ॥६०॥

फार परिश्रम घेऊन । बाप देतसे नित्य शिक्षण ॥
परंतु त्याला विस्मरण । लक्षांत कांहीं न राही ॥६१॥

मग पिता करी ताडण । अंबिका सांगे विनवून ॥
तीर्थयात्रादि आचरून । हाच एक बाळ वांचें ॥६२॥

आमचें नशीब तसलें । मग मुला ज्ञान कसलें ॥
शिक्षेनें माझें मन त्रासलें । जीव द्यावा वाटे मला ॥६३॥

ब्राह्मण उगी हें अैकून । कांहीं गेले असेच दिन ॥
दैवयोगें जात मरून । मातासुत निराश्रय ॥६४॥



पोटासाठीं काष्ठें विकित । लोक म्हणती व्यर्थ जीवित ॥
बाप विद्वान मूर्ख सुत । हीनोद्योग करितोसी ॥६५॥

लाज तुला न वाटे कशी । गंगेंत जीव कां न देसी ॥
असें निंदितां लोक त्यासी । पुत्र अंतरीं खोंचला ॥६६॥

आईस सांगे झाली मात । दोघें जीव देण्या निघत ॥
जेव्हां गंगेकडे पोंचत । दिसले श्रीपाद स्नान करितां ॥६७॥

अंबिका भावें नमी त्यांसी । म्हणे आत्महत्त्या दोषी ॥
म्हणून पुसतें आपणासी । गुरु पुसती काय हवें ॥६८॥

ब्राह्मणी सांगे वृत्त सकळ । हवा पुढील जन्मीं बाळ ॥
आपुल्यासम त्याचें बळ । समर्था वर द्यावा मला ॥६९॥

श्रीपाद म्हणती अंबिकेसी । भवानीशंकर प्रदोषीं ॥
पूर्जी विशेष शनिप्रदोषीं । मजसम पुत्र होईल ॥७०॥

याची कथा ऐक प्राचीन । अवंतीभूप चंद्रसेन ॥
त्यासी शंभु होत प्रसन्न । दिव्य माणिक देत असे ॥७१॥

तें रत्न इच्छित देतसे । जिकडे तिकडे हें कळतसे ॥
राजे लोकांचे मनीं येतसे । आपणां हवे माणिक तें ॥७२॥

कित्येक मित्रत्वें मागती । कांहीं युद्धाचा भय घालिती ॥
पण राजा निर्धास्त चित्तीं । माणिक ठेवी आस्थेनें ॥७३॥

धाकामुळेहीं अैकत नाहीं । रणा शिवाय उपाय नाहीं ॥
मग जमाव करून पाहीं । युद्धार्थ राजे पातले ॥७४॥

राजा निस्सीम शिवभक्त । शनि प्रदोष तेव्हां येत ॥
भावें करी एकाग्र चित्त । महा काळेश्वरा पूजी ॥७५॥

राजोपचारीं शिवपूजन । गौळीबालकांनीं पाहून ॥
मनीं संतोष पावून । ठरविती पूजा करावी ॥७६॥

खूप पाषाण जमविती । लिंग करून त्या पूजिती ॥
भोजना बाळां आया नेती । एक बाळ न जातसे ॥७७॥



त्याची माता मोडी पूजन । आणि घरीं गेली निघून ॥
बालक मूर्च्छित होऊन । शिवचिंतनें पडियेला ॥७८॥

त्याचे शिवप्रेम अपार । प्रकटे तेथें गौरीशंकर ॥
म्हणे बालका माग वर । प्रसन्न तुजला मी झालों ॥७९॥

बाळें प्रार्थिलें शंकरासी । क्षमा करा मम मातेसी ॥
शिव सांगती मी संतोषी । तव भक्तीनें जाहलों ॥८०॥

करूं नको चिंता मानसीं । वर देतों तव मातेसी ॥
श्रीकृष्ण पुत्र पुढे तिसी । तूं ही सुखी अंतीं गतीं ॥८१॥

शिव पावले अंतर्धान । मंदिर जाहलें उत्पन्न ॥
दिसे अमित प्रकाशमान । सर्वां आश्चर्य वाटले ॥८२॥

राजेलोक मनीं म्हणत । येथींल राजा पुण्यवंत ॥
रात्रीची नगरी प्रकाशत । दिवे कोठें न दिसती ॥८३॥

मग स्नेहभाव धरून । चंद्रसेना भेट देऊन ॥
प्रकाशाचें मूळ ठिकाण । गौळीसदन पाहती ॥८४॥

अैकती वार्ता बाळाकडून । राजे पावले समाधान ॥
बाळा कांहीं राज्य देऊन । भूपति गेले स्वस्थळीं ॥८५॥

गौळीबालकाची जननी । गोकुळीं यशोदा गौळणी ॥
श्रीकृष्ण पुत्राचे पालनीं । घेत आराम शाश्वत ॥८६॥

अगे अंबिके ब्राह्मणी । तूं निश्चिंत रहा मनीं ॥
प्रदोषीं शिवास पूजोनी । मजसम पुत्र लाभेल ॥८७॥

तिच्या बाळाच्या मस्तकावर । श्रीपाद ठेविती कृपाकर ॥
म्हणूं लागला वेद चार । बनला विद्यासंपन्न ॥८८॥

श्रीपाद समजून देव । नित्य धरून भक्तिभाव ॥
पूजा करी अंबिका सदैव । शनिप्रदोषीं अधिकत्वें ॥८९॥

विप्रबाळका श्रीपादयती । कृपेनें आशीर्वाद देती ॥
त्यामुळें त्याच्या वंशाप्रती । सुख अखंड होतसे ॥९०॥

हें ऐकून सिद्धवचन । नामधारक करी नमन ॥
सांगे, गुरुचरित्रकथन । खूप खूपच आवडे ॥९१॥

सिद्ध पुढें कथा सांगती । श्रीपाद त्रिकाळ स्नान करिती ॥
लोक व्यवहारीं पुरविती । भक्तजनांच्या वासना ॥९२॥

रजक झाडी गुरुअंगण । त्याला मिळे राज्य म्हणून ॥
गुरु देती आशीर्वचन । रजकमन आनंदलें ॥९३॥

गुरु गंगास्नान करीत । रजक तीरीं वस्त्रें धूत ॥
कृष्णेमधून रमत येत । म्लेंच्छ राजा निजैश्वर्ये ॥९४॥

त्याला पाहुन रजक चित्तीं । म्हणे उत्तम दैवगती ॥
कोण देव प्रसन्न होती। राज्यसुख फार नामी ॥९५॥

रजकभाव ओळखून । गुरु पुसती त्यास हंसून ॥
अरे चाले काय चिंतन । राज्यभोग कधीं हवा ॥९६॥

रजक म्हणे चरण सेवा । हीच मला आवडे देवा ॥
या पाहून राजवैभवा । आपला आशीर्वाद स्मरे ॥९७॥

गुरु म्हणती राज्य दिलें । कधीं भोगसी सांग भलें ॥
येरू म्हणे दिसे चांगलें । जन्मापासून राज्यसुख ॥९८॥

जन्मांतरीं राज्य भोगिसी । विदुरा नगरीं राजा होसी ॥
यवनराजकुळीं जन्मसी । गुरु सांगती रजकाला ॥९९॥

श्रीपाददत्त सुप्रसन्न । भक्तां करी सुखसंपन्न ॥
त्रेचाळिसावा अध्याय पूर्ण । श्रीदत्त घेती लोक सुखा ॥१००॥

श्री गुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ४४ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।

जयजयाजी श्रीपादराया । अवतरसी जग ताराया ॥
शुद्धमनांच्या भक्तां सदया । देसी अभया अविनाशा ॥१॥

ज्ञानमार्गी तूं अतुर्बळी । दीक्षा देऊन साधुमंडळी ॥
संरक्षावया भीषण काळीं । येसी दत्ता नमन तुला ॥२॥

तूंच कृपाळु जगद्गुरु । सदा ठेवून कृपाकरू ॥
अनिष्टकाळीं चमत्कारू । दाविला करुणें विश्वेशा ॥३॥

तुझा न लागे अंतपार । सर्व श्रेष्ठ तूं योगेश्वर ॥
जग संपूर्ण कलेवर । त्यांत चैतन्य तूं दत्त ॥४॥

सम निर्दोष असे ब्रह्म । तेंच तूं बा पुरुषोत्तम ॥
दत्त वैभव अनुपम । नमस्कार तव पायां ॥५॥

श्रीपादांची प्रेमळवाणी । ऐकून रजक जोडी पाणी ॥
माझा भाव तुझ्या चरणीं । दूर लोटूं नको मला ॥६॥

चिंता नको गुरु म्हणती । दर्शन होईल पुढती ॥
अवतार घेऊं वेषयती । होईल भेटी जा आतां ॥७॥

इंद्रियें निववासीं सकळ । नातरी नव्हे मोक्ष निर्मळ ॥
बाधा करिती पुढें सबळ । भोग राज्य म्लेंछवंशीं ॥८॥

रजकमन आनंदलें । वृद्ध शरीर गळून पडलें ॥
म्लेंछकुळीं जनन झालें । पुढें कथानक येईल ॥९॥

अपार श्रीपादमहिमान । दर्शनें जनां समाधान ॥
दीक्षा देऊन साधुजन । समर्थ बनविती लोकहिता ॥१०॥

स्थान झालें फार प्रख्यात । भक्त तेथें येत अमित ॥
भक्तकामना पूर्ण होत । धन्यधन्य श्रीपाद ते ॥११॥

भक्तांसाठीं गुरुमाऊली । कुरवपुरीं कृपा साउली ॥
करी, नित्य भक्तमंडळी । भजून तरे सर्वस्थळीं ॥१२॥



त्यांना भावें असो प्रणती । श्रीपादयति कृपामूर्ती ॥
पुढें अवतार धरिती । त्यांना नमस्कार असो ॥१३॥

दक्षिणेंत मार्ग लागला । वैदिकधर्म स्थिरावला ॥
दीक्षार्थ भौतिक देह धरिला । तो गुप्त केला गंगेंत ॥१४॥

श्रीपाद जडदेह अदृश्य । पण गुप्त प्रकट दृश्य ॥
भक्तासांठीं होत अवश्य । भक्त कळवळा अंतरीं ॥१५॥

आश्विनवद्य द्वादशी । मघा नक्षत्र मृगराज राशी ॥
गंगा वाहात दाही दिशीं । श्रीपाद पुण्यतिथि असे ॥१६॥

गुरुद्वादशी जनीं प्रसिद्ध । उत्सव करून आनंदकंद ॥
मिळवी सदा भक्तवृंद । सर्वां नमस्कार असो ॥१७॥

प्रेमळ अखंड आशीर्वाद । भक्तां असे सदा सुखद ॥
सिद्धनाम धारक संवाद । भक्तां संरक्षी दत्तकृपें ॥१८॥

भक्तां सदा प्रसन्नचित्त । श्रीपाद श्रीवल्लभदत्त ॥
सौख्य देऊन अंतीं मुक्त । करी सप्रेमें नित्य भक्तां ॥१९॥

श्रीपाद नांवें पुत्रांप्रत । ठेविती भावें श्रीपादभक्त ॥
तसा वल्लभेश विप्र येत । गुरुद्वादशीं उत्सवा ॥२०॥

व्यापार उदीम करून । चालवी आपुलें जीवन ॥
एकदां नवस करून । प्रार्थी श्रीपादगुरूंना ॥२१॥

विशेष लाभ व्यवसायांत । श्रीगुरुदेवा व्हावा प्राप्त ॥
मग घालीन भक्तियुक्त । सहस्त्रब्राह्मणभोजन ॥२२॥

तसा वल्लभेश भक्तास । लाभ जाहला बहुवस ॥
गुरुद्वादशी उत्सवास । निघे हर्षित मानसें ॥२३॥

हें वृत्त चोरां समजलें । तेही समागमें निघाले ॥
ब्राह्मणा तस्कर म्हणाले । यात्रेस आम्ही जातसों ॥२४॥

प्रतिवर्षी आमुचा नेम । वल्लभेश भक्त उत्तम ॥
हे कपटी लोक परम । चोर म्हणून तो नेणे ॥२५॥

धार्मिक विप्र साधा सरळ । तस्करांचे बोल रसाळ ॥
दोन तीन दिन संगें चाल । प्रभातीं वधिलें धनिका त्या ॥२६॥

धडापासून शिर वेगळें । द्रव्य वांटून घेऊं लागले ॥
श्रीपाद दत्त कळवळले । धांवले त्रिशूळ घेऊन ॥२७॥

जटाधारी भस्मांकित । श्रीपाद तस्करां वधीत ॥
एक चोर शरण येत । प्रार्थी जिवंत राखा मला ॥२८॥

अपराध मी नाहीं केला । साधुपुरुषा कळे तुला ॥
भक्तिभाव माझा चांगला । श्रीपाद जवळी बोलाविती ॥२९॥

त्याच्या हस्तीं विभूति देती । विप्रावरी टाक म्हणती ॥
विप्रशिर धडा लाविती । श्रीगुरु श्रीपाद स्वहस्तें ॥३०॥

श्रीपादांची कृपा गहन । विप्र जिवंत पूर्वीसमान ॥
दत्त पावले अंतर्धान ।सूर्य उदया पातला ॥३१॥

वल्लभेश म्हणे चोरासी । कोणी वधिलें तस्करांसी ॥
त्यानें कथिलें सर्व कथेसी । भक्ता आनंद जाहला ॥३२॥

ब्राह्मण गहिवर दाटला । द्रव्य घेऊन तो निघाला ॥
कुरवपुरा शीघ्र पोंचला । पूजा करी बरवेपरी ॥३३॥

गुरुवर त्याचा विश्वास । चार सहस्त्र ब्राह्मणांस ॥
भोजन घातलें सुग्रास । नवस उत्तम फेडिला ॥३४॥

श्रीपादाचे आठवी गुण । त्याचे चरणीं अंत:करण ॥
ठेवून करी कालक्रमण । इहपर सौख्य होतसे ॥३५॥

त्याच्यावंशीं श्रीपादभक्ति । अजून सौख्य देतसे ती ॥
हेडगेवारकुलीं स्मृती । वल्लभेश पूर्वजाची ॥३६॥

भक्तांसाठीं श्रीपाददत्त । चिरंजीव राहून गुप्त ॥
भक्तकळवळा दाखवीत । जाणती नित्य भक्तगण ॥३७॥

गोड सुखद प्रसाद शब्द । नामधारकसिद्ध-संवाद ॥
त्यांच्यासह सच्चिदानंद । श्रीपाद दत्ता नमन असो ॥३८॥



सर्वचालक भगवंत । अनंतकोटी ब्रह्मांड दत्त ॥
भूगोलही आपला त्यांत । वागे दत्त प्रेरणेनें ॥३९॥

या भूगोलावर सर्वत्र । वैदिकसंस्कृति विराजत ॥
असें अवशेष सांगत । भारतीं परंपरा राहिली ॥४०॥

इतर स्थानीं संस्कारगुप्त । नाना स्थित्यंतरें घडत ॥
म्हणून धागा नोळखत । पण ओळख सूक्ष्मसूत्रें ॥४१॥

आसुरी दैवी संस्कृती । समन्वयानें न नांदती ॥
त्यामुळें इतिहास घडती । सहज प्रवृत्तिप्रेरक ॥४२॥

जगीं सर्वत्र भगवान । साधुलोकां करी उत्पन्न ॥
ईश्वर आहे चैतन्यघन । त्याला भजा सांगती ते ॥४३॥

यायावर काश्मीर ब्राह्मण । गेले पश्चिमेस निघून ॥
सूर्योपासक ते महान । यजनदेव येहोबा ॥४४॥

त्यांतून यहुदी निर्माण । हवनीं देवा मानवून ॥
करिती मांसादिक भोजन । यय नाम सूर्या असे ॥४५॥

या धातूचा अर्थ गमन । ययदेवा सूर्या नमन ॥
यज्ञसंस्कृती असे प्राचीन । भूगोलीं सर्वत्र ती असे ॥४६॥

उत्तरायण दक्षिणायन । बिंदूचें लोकां सूक्ष्मज्ञान ॥
उदगयन आरंभदिन । लोक उत्साहें पाळिती ॥४७॥

दहामास सूर्य दिसत । हा देश उत्तर आशियांत ॥
दक्षिणेकडे सूर्य वळत । दृश्य सूर्य षष्ठमासीं ॥४८॥

पुढील चारमास अंबर । सप्त अष्ट नवदश नंतर ॥
मास दोन गुप्त भास्कर । दक्षिण अंबरीं अर्यमीं ॥४९॥

मघा पुढें तारा अर्जुनी । त्याच तारका फाल्गुनी ॥
सूर्य असतां त्या चौकोनी । उत्तरायण होतसे ॥५०॥

त्यावेळीं उत्तर भागांत । उत्पन्न होतसे अतिशीत ॥
म्हणून गुरें वळवीत । त्याचे खालच्या प्रदेशीं ॥५१॥



तो उल्लेख ऋग्वेदीं येत । मघा नक्षत्रीं सूर्य दिसत ॥
दक्षिणायन मग संपत । सुमारें एक महिन्यानें ॥५२॥

नाना जाती नाना आचार । त्यांचा असे ग्रंथीं आदर ॥
हाताळून नाना प्रकार । विधायक वृत्ति दिसतसे ॥५३॥

हिमप्रलयापूर्वील काळ । आतां अठरासहस्त्र होईल ॥
वेदवर्णन अेक काळ । नाहीं चित्तांत पाहिजे ॥५४॥

नाना काल विविध स्थळ । एकत्रीकरण मंगल ॥
कितीतरी ज्ञान अमल । स्फुरे दिसे योगीजनां ॥५५॥

प्राचीन संस्कृति अवशेष । स्पष्ट दावी भारतवर्ष ॥
इतरही बाहेर देश । संस्कृतिसूत्र दाविती ॥५६॥

गौतमबुद्ध धर्मकाळ । नंदराजे क्षत्रियकुळ ॥
त्यांतून राजे मौर्यकुल । धर्म पसरी चोंहीकडे ॥५७॥

सर्वांतर्यामी एक तत्त्व । पण बुद्धी शून्य म्हणत ॥
परस्पर व्यवहारतत्त्व । विचारीजनां युक्त असे ॥५८॥

हिंसासंकोच व्हावा म्हणून । यज्ञांत आचार सांगून ॥
उपनिषदतत्त्वज्ञान । वैदिक धर्म दाखवीं ॥५९॥

यहुदी लोकांमधें जन्मत । प्रेमविवाहें येशूख्रिस्त ॥
शिक्षण घेतलें भारतांत । संशोधक सांगतीं ॥६०॥

पुढे तीस वयानंतर । पुन्हां जाऊन केला प्रचार ॥
दावून नाना चमत्कार । मानवतेनें वागा म्हणे ॥६१॥

परंतु भूपति रोमक । निर्बंध बनला जाचक ॥
क्रूसावर चढवून धाक । घातला अेशूउपदेशा ॥६२॥

त्याप्रमाणें झाली व्यवस्था । शिष्याची जाणून अवस्था ॥
योगी गुरु धरिती आस्था । काश्मीरांत त्या नेती ॥६३॥

सतत वाहती निर्झर । जिकडे तिकडे हिरवेंगार ॥
तेथें म्हणती तपी शरीर । ठेवून इसा स्वर्गलोकीं ॥६४॥

त्याचा उपदेश बळावला । रोमक राज्या अवकळा ॥
राजधानीच्या पुण्यस्थळा । इसाधर्म गुरु स्थान ॥६५॥

यहुदी साधूंत समावेश । अेशूचा अैकून उपदेश ॥
शिष्य करिती गाऊन यश । भूमध्यसागरपरिसरी ॥६६॥

भारत आणि अर्बस्थान । सिंधुसागर मध्यें महान ॥
त्यांतून चाले पर्यटन । असुररक्त उपसमुद्र ॥६७॥

भूमध्यसागर पूर्वतीर । यहुदी संस्कृति दिसे स्थिर ॥
भोंवतीं बुद्ध धर्मप्रसार । अेशू धर्मही पसरतसे ॥६८॥

दिसे अर्बी काव्यामधून । चार वेदांचें अध्ययन ॥
लाबी वगैरे कवि प्राचीन । भारत ऋषींना गौरविती ॥६९॥

उदगयनींचा भास्कर । उत्सव सर्वत्र भूवर ॥
म्हणून इसा जन्मवत्सर । उदगयनीं गणताती ॥७०॥

मकादेवता मानकरी । यांचा तंटा वाढला भारी ॥
तो मिटवून प्रसिद्धी फारी । त्यांतील अेका व्यक्तीची ॥७१॥

इसाई वचनें पढून । स्वत:चे देवही स्मरून ॥
नित्य चाले ईशचिंतन । मन ओढाळ देवाकडे ॥७२॥

मग होतसे ईश्वरीज्ञान । ईश निराकार निर्गुण ॥
त्याला जावें भावें शरण । तसा बोध जनां करी ॥७३॥

कांहीं अरब देती त्रास । मग वाटलें पैगंबरास ॥
शस्त्रें जिंकून शत्रूंस । धर्मप्रसार करावा ॥७४॥

मका मुक्तेश तीर्थ प्राचीन । तेथें करणें राज्य जिंकून ॥
अथवा जावें स्वर्गीं निघून । युद्ध लढून प्राणान्त ॥७५॥

साधावया सर्वभूतहित । हवें समन्वयाचें तत्त्व ॥
ईश्वर निर्मी वस्तुजात । त्याला शरण रिघावें ॥७६॥

मग साम दाम दंड भेदानें । राज्य व्यवहारीं वर्तणें ॥
सज्ञान करून सोडणें । या साठींच राजसत्ता ॥७७॥



पण दैवीआसुरी मती । लोकीं झगडा माजविती ॥
तेणे नको त्या येत आपत्ती । असें इतिहास दाखवी ॥७८॥

ज्ञातावरून अज्ञात कळे । सदा तसें शिक्षण चाले ॥
सगुणभक्ति तंत्र पहिलें । निर्गुणांत क्लेश जास्ती ॥७९॥

काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह रिपु अनिवार ॥
स्वाधीन ठेवून निरंतर । निर्गुणी मन प्रवेशे ॥८०॥

सर्व जगत आत्मवत । जाणून मानवता साधत ॥
कर्म करून चाले जीवित । वचनें गीतेंत बोधाचीं ॥८१॥

जर प्रजेचे परिश्रम । राज्यकार्यीं न घेतां श्रम ॥
राज्यधारक मनोरम । भोगिती, तर तें अनिष्ट ॥८२॥

हेंच इतरां उदाहरण । हवें सदा स्वावलंबन ॥
परस्पर पूरक वर्तन । करून व्यवहार करावा ॥८३॥

ज्यांनीं सोडला स्वसंसार । त्याला गृहस्थ सर्व देणार ॥
मनवाणी तसें शरीर । सदा लोकहिता लावणें ॥८४॥

भिक्षान्न खाणें लाजिरवाणें । संसारी जनां कारणें ॥
परंतु तें अमृत होणें । परोपकारी जनां सदा ॥८५॥

आयचित्तही कांहीं प्राप्ती । फुकट स्वीकारूं नयेच ती ॥
उभयतांना सुखस्थिती । अशी धर्मवृत्ति हवी ॥८६॥

राजगुरूत्व धर्मयुक्त । राजसत्ता निर्बंध युक्त ॥
मग प्रजा उत्कर्ष युक्त । इहपर क्षेम मिळवीतसे ॥८७॥

नरें बनावें पुरुषोत्तम । वैदिक धर्म वर्णाश्रम ॥
यवन म्लेंछादिकांचे धर्म । भीष्म प्रभृती सांगती ॥८८॥

भारतीय भूपती जाती । बाहेर म्लेंछादि जेथें वस्ती ॥
त्या त्या स्थळीं राज्य करिती । माहिती पुराणीं आढळे ॥८९॥

नानास्थानीं विविधजन । भिन्न नाम रूपें भजून ॥
भोगिती सुख समाधान । नमन दत्ता सर्वात्मका ॥९०॥



समर्थ सहिष्णु धर्मतत्त्व । पाळून संतुष्ट श्रीदत्त ॥
सर्वांतर्यामी अेकदत्त । पुरुषार्थ चारी साधविती ॥९१॥

अशा दत्ता तुला नमन । तूंच देवा जगज्जीवन ॥
तुझें स्मरण सदा मन । भावें करीत राहूं दे ॥९२॥

यादव राज्यानंतर । पूर्वापार सीमा सागर ॥
महाराष्ट्रीं म्लेंछनिष्ठुर । धर्मछलक भूपती ॥९३॥

नाना जाती वर्तती जन । त्यांचा समन्वय साधून ॥
जगीं शोभतो सनातन । वैदिक धर्म ईश्वरी ॥९४॥

हें दृष्टीच्या आडकरून । धर्मासाठीं राजे यवन ॥
प्रजेंत भेद माजवून । राज्य करिती अनिष्ट हें ॥९५॥

राज्य व्हावयास सुस्थिर । हवे वैदिकधर्मी नर ॥
हें जाणून मनीं चतुर । कांहीं दिसले म्लेंछराजे ॥९६॥

अति तेथें होतसे माती । ही जाणून व्यवहार नीती ॥
दाखवून जनताप्रीती । राज्य करिती धूर्त नृप ॥९७॥

वैदिक धर्म सनातन । त्याला छळिती राजे यवन ॥
तेव्हां अवतार नूतन । घेती श्रीपाद श्रीगुरु ॥९८॥

शतक शक चतुर्दश । अधिकारी पुण्यपुरुष ॥
अभय देती अविनाश । त्यांना वंदन नित्य असो ॥९९॥

श्रीपाद श्रीवल्लभयती । श्रीनृसिंह सरस्वती ॥
चवेचाळिसावा अध्याय घेती । श्रीदत्तप्रेमें लोकहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु